सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# अभिजात मराठी भाषा समिती अहवाल - २०१३


## मराठी भाषा विभाग

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : २२०२७६४९ / फॅक्स क्रमांक : २२८३६८७७
e-mail ID – marathibhasha.123@gmail.Com

# अभिजात मराठी भाषा समिती

<table>
<tr><td colspan="2">अध्यक्ष<br>प्रा.रंगनाथ पठारे,<br>सदस्य</td></tr>
<tr><td>प्रा.हरी नरके,</td><td>डॉ.नागनाथ कोतापल्ले,</td></tr>
<tr><td>डॉ.श्रीकांत बहुलकर,</td><td>प्रा.मधुकर वाकोडे,</td></tr>
<tr><td>श्री.सतीश काळसेकर,</td><td>डॉ.कल्याण काळे,</td></tr>
<tr><td>प्रा.आनंद उबाळे,</td><td>डॉ.मैत्रेयी देशपांडे,</td></tr>
<tr><td>श्री.परशुराम पाटील,</td><td>संचालक, भाषा संचालनालय, मुंबई,</td></tr>
<tr><td>संचालक,<br>राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,</td><td>संचालक,<br>दर्शनिका विभाग, मुंबई,</td></tr>
<tr><td>सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई,</td><td>सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,</td></tr>
<tr><td colspan="2">सदस्य सचिव,<br>अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.</td></tr>
</table>

## **मसुदा उपसमिती**

अध्यक्ष

प्रा.रंगनाथ पठारे

समन्वयक

प्रा.हरी नरके

सदस्य

डॉ.श्रीकांत बहुलकर,

डॉ.मैत्रेयी देशपांडे.

## प्रस्तावना

केंद्र सरकारने आजवर तमिळ, संस्कृत, तेलगु, कन्नड व मल्याळम या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे. या दर्जामुळे त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून भरीव अनुदान मिळते. भाषेची प्रतिष्ठा वाढते. भाषेच्या श्रेष्ठतेवर राजमान्यतेची मोहोर उमटते. भाषेच्या विकास कार्यास अधिक चालना मिळते.

मराठीलाही हा दर्जा मिळावा अशी तमाम मराठी भाषकांची इच्छा आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी सखोल संशोधन व अभ्यास करून पुरावे एकत्रित करण्यासाठी व विहित नमुन्यात प्रस्ताव तयार करण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १० जानेवारी, २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समितीची स्थापना केली. सदर समितीस शासनाने ३ महिन्यांची मुदत दिली होती. या समितीमध्ये प्रा.हरी नरके, डॉ.नागनाथ कोतापल्ले, डॉ.श्रीकांत बहुलकर, प्रा.मधुकर वाकोडे, श्री.सतीश काळसेकर, डॉ.कल्याण काळे, प्रा.आनंद उबाळे, डॉ.मैत्रेयी देशपांडे, श्री.परशुराम पाटील या अशासकीय सदस्यांसह संचालक, भाषा संचालनालय, मुंबई; संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई; संचालक, दर्शनिका विभाग, मुंबई; सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई आणि सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई या राज्य शासनाच्या भाषाविषयक काम करणाऱ्या संस्थांचा समावेश करण्यात आला. समितीचे सदस्य सचिव म्हणून मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई येथील अवर सचिव यांनी काम पाहिले. समितीच्या समन्वयक पदाची जबाबदारी प्रा.हरी नरके यांनी सांभाळली. समितीला १८ जून, २०१२, १४ ऑगस्ट, २०१२ व १२ मार्च, २०१३ रोजी मुदतवाढ देऊन ३१ मे, २०१३ पर्यंत अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन प्रस्ताव तयार करून तो शासनाच्या मान्यतेने केंद्र शासनास सादर करण्यासाठी व त्याचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी नेमण्यात आलेल्या या समितीच्या एकूण ७ बैठका घेण्यात आल्या.

केंद्र सरकारच्या निकषानुसार प्रस्ताव तयार करून, तपासून त्या अनुषंगाने उचित शिफारशी शासनास करण्यासाठी समितीने सखोल चर्चा करून या प्रस्तावामध्ये समाविष्ट करावयाच्या बाबींचा एक आराखडा तयार केला. त्यात वेळोवेळी भर टाकण्यात आली. दिनांक १४ मार्च, २०१२ रोजी मसुदा उपसमितीची स्थापना करून अहवाल लेखनाचे काम तिच्याकडे सोपविण्यात आले.

मसुदा उपसमितीच्या १९ बैठका घेण्यात आल्या. प्रा.हरी नरके यांचा लोकराज्य मासिकाच्या २०११ च्या दिवाळी अंकात ‘अभिजात मराठी’ हा लेख प्रसिध्द झाला होता. फेब्रुवारी २०१२ च्या लोकराज्यमध्ये हा लेख पुनर्मुद्रित करण्यात आला. या लेखाचा बीजनिबंध म्हणून उपयोग झाला. दरम्यानच्या काळात समितीने केलेल्या या विषयावरील अभ्यासाचा धावता आलेख फेब्रुवारी, २०१३ च्या त्यांच्या 'लोकराज्य' मधील लेखामध्ये आला आहे. सदस्यांनी बैठकीमध्ये केलेल्या चर्चा, सूचना, लिहिलेल्या टिप्पण्या यांच्या आधारे हा मसुदा तयार करण्यात आला.

मसुदा उपसमितीने विविध मान्यवर भाषातज्ञ, साहित्य संस्था आणि भाषाविषयक काम करणारे कार्यकर्ते व नागरिक यांच्या भेटी-गाठी घेऊन त्यांची याबाबतची मते जाणून घेतली. आवश्यक ते सर्व संदर्भ ग्रंथ मिळवून त्यांचे सखोल वाचन करण्यात आले. त्यावरून या प्रस्तावासाठी उपयुक्त ठरणारी त्याची विस्तृत टिप्पणी तयार करण्यात आली. राज्यातील विविध संस्थांनी या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन याबाबतची माहिती नागरिकांसमोर ठेवली. व या विषयावरील जनमत तयार करण्यासाठी विविध नियतकालिके व वर्तमानपत्रांमधून लेखन करण्यात आले. सर्व विद्यापीठे, साहित्य संस्था, अखिल भारतीय साहित्य महामंडळ व राज्यातील मान्यवर साहित्यिक यांना पत्रे लिहून त्यांच्याकडून सूचना मागविण्यात आल्या. प्रसार माध्यमांमधून या विषयाबाबतचे पुरावे आणि साहित्य समितीकडे पाठविण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले. त्याला खूप मोठा प्रतिसाद मिळाला. विविध वाहिन्यांनी या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम सादर करून याबाबत जनमताचा कौल अजमावला. राज्यभरातील संशोधक, अभ्यासक, नागरिक आणि विद्यार्थी यांनी

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी सर्वप्रकारचे सहकार्य देऊ केले. राज्य शासनाच्या या समितीच्या प्रयत्नांना मिळालेला हा भरीव प्रतिसाद उत्साहवर्धक होता.

मसुदा उपसमितीने तयार केलेला आराखडा मुख्य समितीला सादर करण्यात आला. या मसुद्यावर साधकबाधक चर्चा करून सदस्यांनी आपले अभिप्राय दिले. त्या सूचनांचा विचार करून मसुद्यात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यात आल्या.

समितीचा अंतरिम अहवाल जानेवारी, २०१३ मध्ये तर अंतिम अहवाल मे, २०१३ मध्ये शासनाला सादर करण्यात आला. या अहवालाचे इंग्रजी भाषांतर श्री.अविनाश पंडित यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांच्याशी वेळोवेळी चर्चा करून दर्जेदार भाषांतर होण्यासाठी त्यांना माहिती पुरविण्यात आली.

शासनाने सोपविलेली जबाबदारी सक्षमरीत्या निभावण्यासाठी मुख्य समिती आणि मसुदा उपसमिती यांच्यामार्फत आम्ही सर्व मराठी भाषकांच्या वतीने हा अंतिम प्रस्ताव तयार करून राज्य शासनास सादर करीत आहोत. हा मसुदा तयार करण्यात सर्व सदस्यांचे मन:पुर्वक सहकार्य लाभले. प्रत्यक्ष मसुदा तयार करण्याचे किचकट आणि बौद्धिक परिश्रमांची मागणी करणारे काम अतिशय मन:पुर्वक प्रा.हरी नरके यांनी केले हे मी खास करुन नमूद करतो.

या कामी राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी आस्थेवाईकपणे व्यक्तिश: रस घेऊन आम्हाला मार्गदर्शन केले. ते समितीच्या बैठकांना स्वत: उपस्थित राहिले आणि त्यांनी समितीच्या कामकाजाचा सखोल आढावा घेतला. ज्येष्ठ भाषातज्ञ डॉ.भालचंद्र नेमाडे, डॉ.अशोक केळकर, डॉ.ब्रम्हानंद देशपांडे, डॉ.ग.उ.थिटे, प्रा.प्र.ना.परांजपे, प्रा.श्रीपाद जोशी, श्री.लक्ष्मण गायकवाड, डॉ.नलिनी जोशी, डॉ.मधुकर ढवळीकर, डॉ.श्रीनंद बापट आदीं मान्यवरांशी केलेल्या चर्चांचा आम्हांला खूप उपयोग झाला.

भाषा विभागाचे तत्कालीन सचिव, श्री. विजय नाहटा यांनी या कामात रस घेतला. समितीचे समन्वयक प्रा.हरी नरके यांच्या समवेत श्री.नाहटा दिल्लीला

गेले. तेथे जाऊन साहित्य अकादमीचे तत्कालीन सचिव श्री.अग्रहार कृष्णमूर्ती यांच्याशी त्यांनी चर्चा करून संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड या भाषांनी या संदर्भात सादर केलेल्या प्रस्तावांची त्यांनी माहिती घेतली. श्री.नाहटा हे समितीच्या बैठकांना वेळोवेळी स्वत: उपस्थित राहत असत.

भाषा विभागाचे विद्यमान सचिव श्री.प्रमोद नलावडे यांनीही समितीचे समन्वयक श्री.नरके यांच्याशी वेळोवेळी चर्चा करून उपयुक्त सूचना केल्या. उप सचिव, श्रीमती ललिता देठे, तत्कालीन अवर सचिव, श्री.किशोर कुलकर्णी, श्री. सुरेश पेडगांवकर व विद्यमान श्री.धा.र.चिंदरकर, कक्ष अधिकारी श्री.मं.हिं.बनसोडे व त्यांचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य मोलाचे ठरले. तत्कालीन निम्नश्रेणी लघुलेखक श्री.प्रविण रूपवते आणि विद्यमान उच्चश्रेणी लघुलेखक, श्री. रमेश महाजन यांनी मसुदा लेखनाच्या कामी अचूक प्रस्ताव तयार होण्यासाठी मन:पूर्वक सहकार्य दिल्याची नोंद मी करू इच्छितो.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला पाहिजे या सदिच्छेपोटी आम्हांला असंख्य लोकांचे सहकार्य मिळाल्यामुळेच आम्ही हे काम पूर्ण करू शकलो. या कामात माझे सर्व सहकारी आणि जनतेने दिलेल्या पाठिंब्याबद्दल व सूचनांबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करून हा अहवाल पुढील कार्यवाहीस्तव राज्य शासनाकडे सुपूर्द करीत आहे.

दिनांक : ३१ मे, २०१३.

प्रा.रंगनाथ पठारे,
अध्यक्ष,
अभिजात मराठी भाषा समिती

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| | **प्रकरण-१** | ११ |
| १ | केंद्र सरकारचे निकष | ११ |
| २ | तीन वेगवेगळ्या भाषा नव्हेत | १२ |
| ३ | मराठीचे वय २५०० वर्षे असल्याचा पुरावा | १३ |
| ४ | गाथासप्तशती,  रावणवहो आणि महाराष्ट्र | १४ |
| ५ | महाराष्ट्राश्रयां भाषा | १५ |
| ६ | महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य | १६ |
| ७ | प्राचीन महाराष्ट्र | १८ |
| | **प्रकरण-२** | १९ |
| ८ | मराठी भाषा : उत्पत्तीविषयीची मते | १९ |
| ९ | एकाच भाषेची तीन रूपे | २१ |
| १० | महाराष्ट्री, अपभ्रंश आणि मऱ्हाठी एकच | २१ |
| ११ | महाराष्ट्रचूडामणी | २२ |
| १२ | महाराष्ट्री भाषा | २३ |
| | **प्रकरण-३** | २५ |
| १३ | सप्तशतीतील मराठी | २५ |
| १४ | प्राकृतप्रकाश | २६ |

| | | |
|---|---|---|
| १५ | शेषं महाराष्ट्रीवत् | २६ |
| १६ | समरादित्याची कथा | २७ |
| १७ | अपभ्रंशापासून मराठी | २९ |
| १८ | तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणे गा | ३० |
| १९ | कुवलयमालेतील मरहट्ठे | ३० |
| २० | मराठी पर्यावरण | ३१ |
| २१ | जैन महाराष्ट्री | ३५ |
| २२ | विश्वातील भाषा आणि 'प्राकृत' | ३५ |
| २३ | महाराष्ट्री प्राकृतातील उपलब्ध साहित्य | ३६ |
| २४ | महाराष्ट्री आणि जैन महाराष्ट्री | ३७ |
| २५ | अभिजातत्व जन्मसिद्धच | ४० |
| २६ | प्राकृत व्याकरणकार आणि महाराष्ट्री | ४१ |
| २७ | अभिजात संस्कृत - नाटक - महाराष्ट्री | ४१ |
| २८ | प्राकृतनाट्य, लोकनाट्य | ४२ |
| २९ | कुवलयमाला आणि अठरा देशी भाषा | ४३ |
| ३० | 'गाथा' शब्दाची प्राचीनता | ४४ |
| ३१ | गाथा सप्तशती आणि जैन आचार्य पादलिप्त | ४५ |
| ३२ | महाराष्ट्री आणि जैन महाराष्ट्रीची आकलनसुलभता | ४६ |
| ३३ | महाराष्ट्री — अपभ्रंश भाषेला जैनांचे योगदान | ४८ |

| | | |
|---|---|---|
| | **प्रकरण-४** | ४९ |
| ३४ | डॉ.कृ.पां.कुलकर्णी | ४९ |
| ३५ | गुणाढ्याची बृहत्कथा | ५१ |
| ३६ | राजारामशास्त्री भागवत | ५३ |
| ३७ | यज्ञात महाराष्ट्रीला मज्जाव | ५७ |
| ३८ | मराठी लोकांची संस्कृती | ५७ |
| ३९ | डॉ.शं.गो.तुळपुळे | ६१ |
| ४० | दीपवंश व महावंश | ६४ |
| ४१ | महाराष्ट्र — व्युत्पत्ती | ६६ |
| ४२ | साळैचे घर मेणाचे | ७४ |
| ४३ | शिलालेख व ताम्रपट | ७५ |
| ४४ | काही प्राचीन मराठी कोरीव लेख | ७७ |
| | **प्रकरण-५** | ८० |
| ४५ | राजकीय इतिहास | ८० |
| ४६ | महाराष्ट्रीय लोक, प्राचीन | ८२ |
| ४७ | छत्रपती शिवाजी महाराज | ८६ |
| | **प्रकरण-६** | ९० |
| ४८ | देशभर मराठी | ९० |
| ४९ | रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र | ९० |
| ५० | मराठी - आदिकाळ, मध्यकाळ | ९१ |

| | | |
|---|---|---|
| ५१ | आजची मराठी | ९३ |
| ५२ | महात्मा जोतीराव फुले | ९४ |
| ५३ | परिणत अवस्था | ९६ |
| ५४ | संत तुकाराम | ९७ |
| ५५ | दलित साहित्याचे योगदान | ९८ |
| ५६ | महानुभाव पंथाचे साहित्य | १०३ |
| ५७ | जागतिक दर्जाचे श्रेष्ठ ग्रंथ | १०४ |
| ५८ | रामायण महाभारतात मराठी | १०५ |
| | **प्रकरण-७**<br>**समारोप** | १०७ |
| ५९ | मराठीचा प्रवास | १०७ |
| ६० | विनयपीटक, दीपवंश, महावंश | १०८ |
| ६१ | मराठी साहित्याची थोरवी | १०९ |
| ६२ | अभिजात भाषा | १११ |
| ६३ | अकरा कोटी लोकांची मराठी | ११४ |

| | | |
|---|---|---|
| | ग्रंथसूची | ११७ |
| | इंग्रजी ग्रंथ | ११७ |
| | हिंदी ग्रंथ | १२३ |
| | मराठी ग्रंथ | १२३ |
| | नियतकालिके | १२६ |

# अभिजात मराठी

# प्रकरण-१

## १. केंद्र सरकारचे निकष :

भाषेच्या अभिजातपणासंबंधीचे केंद्र सरकारचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

**१. High antiquity of its early texts/recorded history over a period of १५००-२००० years.**

**२. A body of ancient literature / texts, which is considered a valuable heritage by generations of speakers.**

**३. The literary tradition be original and not borrowed from another speech community.**

**४. The Classical language and literature being distinct from modern, there may also be a discontinuity between the Classical language and its later forms of its offshoots.**

उपरोक्त निकषात खालीलप्रमाणे चार महत्त्वाचे मुद्दे उपस्थित होतात.

१) भाषेची प्राचीनता.

२) भाषेची मौलिकता आणि सलगता.

३) भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूपण.

४) प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यांच्यात पडू शकणाऱ्या खंडासह जोडलेले / असलेले नाते.

## २. तीन वेगवेगळया भाषा नव्हेत :

या निकषांच्या व मुद्द्यांच्या अनुषंगाने विचार करताना मराठी भाषा ही अभिजात भाषा आहे हे सबळ पुराव्यानिशी सिद्ध करता येते अशी आमची नम्र धारणा आहे.

प्राचीन महारट्ठी, मरहट्ठी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा असा मराठीचा प्रवास आहे. महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश आणि मराठी या तीन वेगवेगळया भाषा नसून ती एकाच भाषेची तीन रूपे आहेत. मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ 'गाथासप्तशती ' हा सुमारे २००० वर्षे जुना आहे. ‘लीळाचरित्र’ आणि ‘ज्ञानेश्वरी’ हे मराठी भाषा अतिशय प्रगल्भ झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. भाषा काही एकाएकी प्रगल्भ होत नाही. ती तशी होण्यासाठी अनेक शतके जावी लागतात. हे जागतिक तोडीचे ग्रंथ आठशे वर्षांपूर्वी ज्या भाषेत लिहिले गेले, ती त्याच्या आधी बारा-पंधराशे वर्षे अत्यंत समृद्ध भाषा होती याचे शेकडो शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखित ग्रांथिक पुरावे आज उपलब्ध झालेले आहेत.

नाणेघाटातील ब्राम्ही लिपीतील २२२० वर्षांपूर्वीच्या शिलालेखातील ‘महारठ्ठीनो’ हा उल्लेख, विनयपीटक, दीपवंश, महावंश या ग्रंथातील महाराष्ट्राचे उल्लेख, हालसातवाहनाच्या गाथासप्तशतीतील श्रेष्ठ दर्जाचे मराठी काव्य, रामायण, महाभारत आणि गुणाढ्याच्या बृहत्कथेत येणारे असंख्य मराठी शब्द, वररुचीचे प्राकृतप्रकाश, हेमचंद्राची देशीनाममाला, शाकुंतल, मृच्छकटिकातील अनेक पात्रांच्या तोंडचे प्राचीन मराठीतील संवाद यावरून मराठीची प्राचीनता निर्विवादपणे सिद्ध होते.

पतंजली, कौटिल्य, टॉलेमी, वराहमिहीर, चिनी प्रवासी ह्युएन त्संग अल्बेरुनी यांचे लेखन आणि थोर संशोधक श्री. व्यं. केतकर, राजारामशास्त्री भागवत, रावसाहेब वि. ना. मंडलीक, महापंडित राहुल सांकृत्यायन, डॉ. रा. गो. भांडारकर, डॉ. वेबर, डॉ. ए. एम. घाटगे, नारायण विष्णू बापट, वि. का. राजवाडे, इरावती कर्वे, कृ. पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि.ल. भावे, शं.गो.तुळपुळे, ॲन फेल्डहाऊस, रा. भि. जोशी आदींच्या संशोधनाच्या आधारे आधुनिक दृष्टीतून एक सुसंगत आराखडा मांडायचा झाल्यास महारठ्ठी किंवा महाराष्ट्री म्हणजेच मराठी भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव, कवी चोंभा, एकनाथ, तुकाराम, वि.स.खांडेकर, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, नारायण सुर्वे, मनोहर शहाणे आदींचे श्रेष्ठ लेखन आणि राजारामशास्त्री भागवत, श्रीधर व्यंकटेश केतकर, शं.गो.तुळपुळे, ल.रा.पांगारकर यांनी मराठी भाषेच्या निर्मितीबाबत केलेले विवेचन पाहता सारांशाने असे म्हणता येते की प्राचीनता, मौलिकता, श्रेष्ठ साहित्याची परंपरा, भौगोलिक विस्तार या सर्व अंगांनी विचार करता मराठी ही अभिजात भाषा असून तिचे अभिजातपण स्वयंसिद्ध आहे.

## ३. मराठीचे वय २५०० वर्षे असल्याचे पुरावे :

मराठी भाषेतील पहिला शिलालेख २२२० वर्षांपूर्वीचा आहे. तो ब्राह्मी लिपीतील असून तो पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळच्या नाणेघाटातील आहे. या शिलालेखात '**महारठिनो**' असा स्पष्ट उल्लेख आहे. या शिलालेखाच्या तिसऱ्या

ओळीतील काही मजकूर दिसत नाही. मात्र, महारठिनो हा शब्द स्पष्ट दिसतो. डॉ. वा. वि. मिराशी यांनी आपल्या 'सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख', या ग्रंथात हा शिलालेख प्रकाशित केला आहे. ("... य महरठिनो अंगियकुलवधनस सगरगिरिवलयाय पथविय पथमवीरस वस... य महतो मह...."), (डॉ. वा. वि. मिराशी, नागपूर, १९५४, पृ.१०) डॉ. मिराशी यांनी या ओळीचा अनुवाद पुढील प्रमाणे दिला आहे. ".... महारठी अंगिय कुलोत्पन्न गिरिसमुद्रवलयांकित पृथ्वीवरील वीरश्रेष्ठ.... महान अशा पुरुषात श्रेष्ठ अशा ..." (डॉ. वा. वि. मिराशी, नागपूर, १९५४, पृ.१४) या नोंदींवरून असे सिद्ध होते की, महारठी भाषा बोलणारे ते महारठी लोक आणि ही भाषा बोलणाऱ्यांचा प्रदेश तो महारठी प्रदेश म्हणजेच महाराष्ट्र प्रदेश. ज्या महारठी भाषेत हा शिलालेख लिहिला गेला आहे ती त्याआधी किमान २०० ते ३०० वर्षे अस्तित्वात असली पाहिजे. यावरून मराठीचे वय किमान अडीच हजार वर्षे असले पाहिजे.

## ४. गाथासप्तशती, रावणवहो आणि महाराष्ट्र :

महाराष्ट्र या देशनामापेक्षा महाराष्ट्री भाषा जुनी आहे. अश्मक, कुंतल, अपरान्त, विदर्भ या प्रदेशात प्राकृत महाराष्ट्री प्रचारात होती. इतकेच नाही तर सातवाहनांच्या राजवटीत (इ.स.पूर्व २ रे शतक ते इ.स.२ रे शतक) त्यांचा राज्यविस्तार कुरुक्षेत्र, पेशावर इथपर्यंत झाल्यामुळे ती भारताच्या बऱ्याच मोठया भूभागात प्रचलित होती. म्हणूनच 'गाहासत्तसई' उर्फ 'गाथासप्तशती' या हालसातवाहन राजाने संकलित केलेल्या गाथांच्या प्रतींची हस्तलिखिते देशभर अनेक ठिकाणी सापडलेली आहेत.

'गाथासप्तशती' हा महाराष्ट्री भाषेतील ज्ञात आद्य ग्रंथ होय. महारट्ठी-मरहट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा उच्चारभ्रमाचा प्रवास. 'महाराष्ट्री हे महारट्ठी' चे नामकरण संस्कृत भाषेने, तिच्यातल्या पंडितांनी केले. संस्कृत भाषेला संस्कृत हे नाव मिळण्याआधी महाराष्ट्री भाषा अस्तित्वात होती, एवढेच नाही तर ती प्रगल्भ झालेली होती. इसवी सनाचे पहिले शतक हा गाथासप्तशतीच्या निर्मिताचा काळ आहे हे आता विद्वानांमध्ये मान्य झालेले आहे. हालसातवाहनाची 'सत्तसई' जयवल्लभाचा 'वज्जालग्ग' हा सुभाषित कोश, प्रवरसेन वाकाटकाचे 'रावणवहो' वाक्पतिराजाचे 'गऊडवहो' ही महाकाव्ये हे महाराष्ट्री प्राकृतातील मुख्य ग्रंथ. पैकी सत्तसई व रावणवहो नि:संशय महाराष्ट्रात लिहिले गेले.

## ५. <u>महाराष्ट्राश्रयां भाषा</u> :

"महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदु:।" म्हणूनच महाराष्ट्री प्राकृत हा महाराष्ट्रीयांचा अभिमानविषय आहे. मूलत: ही भाषा महाराष्ट्राचीच, हे नि:संशय. शिवाय प्रचलित मराठीशी महाराष्ट्रीचे निकटचे नाते व साम्य आहे हे अनेक उदाहरणांवरून व व्युत्पत्त्यांवरून सिद्ध होते (श्री. घाटगे). महाकवी बाणभट्ट (सातव्या शतकाचा प्रथमार्ध) याने हर्षचरिताच्या प्रास्ताविकात गाथाकोशाचा उल्लेख केला आहे.

संदर्भ : श्री.घाटगे

अविनाशिनमग्राम्यमकरोत्सातवाहन:।

विशुद्धजातिभि: कोशं रत्नेरिव सुभाषितै:।

याचे महामहोपाध्याय मिराशी यांनी (युगवाणी: मार्च १९४६) भाषांतर असे दिले आहे: "एखादा राजा अत्यंत शुद्ध जातीच्या रत्नांनी खेडेगावात न होणारा असा अक्षय्य निधी करतो, त्याप्रमाणे सातवाहन राजाने अत्यंत निर्दोष अशा व जातिछंदात रचलेल्या सुभाषितांनी अविनाशी व सोज्वळ असा कोश रचला." (स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.५६) यानंतर गाथासप्तशतीचा महत्त्वाचा उल्लेख राजशेखराने (इ.स. ८८० ते ९२०) केलेला आहे. [भगदत्त जल्हण – विरचिता सूक्ति मुक्तावली, Gaekwad's Oriental Series, पृ.४३]

तो सांगतो;

जगत्यां (पृथिव्यां ) ग्रथिता गाथा: सातवाहनभूभुजा।

व्यदधुर्धृतेस्तु विस्तारमहोचित्रपरंपरा॥

सातवाहन राजाने अनेक ठिकाणांहून गाथा जमवून त्यांचा संग्रह केला. यामुळे लोकांचा आनंद संकोच पावला नाही, उलट विस्तार पावला. केवढी ही आश्चर्याची परंपरा'. (स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.५२)

## ६. <u>महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य :</u>

गाथासप्तशती हे महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य आहे. गाथासप्तशतीतील भौगोलिक स्थाने, नद्या सारे महाराष्ट्र देशातीलच आहेत. गिरणा, गोदावरी, तापी, नर्मदा, मुळा या नद्या आहेत. यमुना नदी, मन्दार पर्वत, मलय पर्वत यांचे उल्लेख सांकेतिक मात्र आहेत. बहुसंख्य उल्लेख गोदावरी नदीचे

आहेत. त्र्यंबकेश्वर,  पैठण यांचे उल्लेख आहेत. गाथासप्तशती हे महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य आहे. त्यात काव्यगत कृत्रिमता अजिबात नाही. जीवनाची करुण, दारुण व हृदयस्पर्शी अशी सर्व अंगे सारख्याच कुशलतेने तिच्यात रेखाटलेली आहेत. निसर्गाप्रमाणे मानवी कृतींची व पशुपक्ष्यांच्या जीवनाचीही लोभसवाणी चित्रणे तिथे भरपूर आहेत. खेळकर विनोद हेही त्यांचे वैशिष्ट्य आहे. मराठी स्वभावातला रोखठोकपणा आणि कोमलता हे दोन्ही विशेष त्यात प्रतिबिंबित झालेले आहेत. 'गृहिणी, विरहिणी, खंडित नायिका यांच्या आविष्कारांची चित्रणे आहेत. सज्जन प्रशंसा, दुर्जननिंदा, भरघोस पीक पाहून चांदण्यात स्वच्छंद गाणारा शेतकरी, मृत पत्नीसाठी विलाप करणारा हलिकपुत्र, पशुपक्ष्यांचे निरुपाधिक जीवन, त्यांचा निरागस प्रणय, यौवनात पदार्पण केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलीचे मुग्ध व वेधक सौंदर्य याविषयीची चित्रणे मानवी भावना हेलावून सोडणारी आहेत.

एक दोन गाथा नमुन्यादाखल:

“किं रुअसि ओणअमुही धवलाअन्तेसु सालिच्छित्तेसु?।
हरिआलमण्डिअमुही णडि व्व सणवाडिआ जाआ॥”

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, गाथा क्र. ९, पृ.११)

साळीचे शेत पिकून पांढरे झाले आहे म्हणून मान खाली घालून का रडते आहेस? नटीने मुखाला हरितालाचा रंग लावून सज्ज व्हावे त्याप्रमाणे तागाचे शेत पिवळ्याधमक फुलांनी नटले आहे.

“अमअमअ गअणसेहर रअणीमुहतिलअ चन्द दे छिवसु।

छित्तो जेहिँ पिअअमो ममं पि तेहिं विअ करेहिं॥”

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, गाथा क्र. १६, पृ.१७)

हे चंद्रा, तू अमृतमय आहेस, गगनाचा मुकुट आहेस, रजनीच्या मुखावरील तिलक आहेस. प्रियकराला स्पर्श करशील त्याच किरणांनी मलाही स्पर्श कर.

## ७. प्राचीन महाराष्ट्र :

'गाथासप्तशती' चा संग्रह हाल या सातवाहन राजाने इसवी सनाच्या पहिल्या शतकात केला. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या प्राचीन महाराष्ट्र या ग्रंथात केतकरांनी प्राकृत-मराठी-संस्कृत असा शब्दकोश गाथासप्तशतीला अनुसरून तयार करून दिला आहे. त्यातून महाराष्ट्री आणि आजची मराठी यांच्यातील नाते उत्तम प्रकट होते. संस्कृत शब्द पुष्कळदा पुष्कळच वेगळे पडतात (श्रीधर व्यंकटेश केतकर, पुणे, १९२७ पृ. ३३७ ते ३४०).

# प्रकरण-२

## ८. मराठी भाषा : उत्पत्तीविषयीची मते :

मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी विविध मतमतांतरे आहेत. इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या मते मराठीची उत्पत्ती "पाणिनिपूर्वकालीन आर्य भाषा त्याहीपूर्वीची पूर्ववैदिक भाषा" ह्यांच्यापासून झाली. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी राजवाडयांची ही उपपत्ती 'वास्तवाला सोडून' असल्याचे म्हटले आहे. याउलट ग्रियर्सन (A Linguistic Survey of India, Volume I, Part I, Chapter XII) आणि डॉ. कृ. पां. कुलकर्णी यांनी आजच्या इंडो आर्यन भाषांच्या विकासाचा आलेख मांडलेला आहे. तो वास्तवाला धरून आणि अधिक विश्वासार्ह आहे असे म्हणता येईल. ग्रियर्सनच्या मते वेदपूर्वकालीन किंवा वैदिक हीसुद्धा एकच भाषा नसून ते विविध बोलींचे समूह होते. या विषयाचे विस्तृत विवेचन हार्वर्ड विश्वविद्यालयातील संस्कृत भाषेचे व्यासंगी विद्वान प्रा.मिखाएल विट्झेल (Michael Witzel) यांनी केले आहे. यापैकी एका उत्तरकालीन वैदिक बोलींचे व्याकरण रचून पाणिनीने तिला स्थिर आणि नियमबद्ध रूप दिले. तीच आपल्याला माहीत असलेली संस्कृत भाषा आहे. ह्या भाषेत अनेक ग्रंथ रचले गेले आणि ती विद्वानांची भाषा म्हणून मान्य झाली. मात्र, संस्कृत प्रस्थापित झाल्यानंतरही लोकांच्या बोलण्यातल्या 'पाणिनिपूर्वकालीन भाषा किंवा बोली अस्तित्वात राहिल्या आणि त्यांचा विकास आणि विस्तार होत गेला. ह्याच वेगवेगळया प्राकृत भाषा होत. ह्या प्राकृतांमध्येही ग्रंथ रचना होऊ लागल्या आणि त्यांचेही व्याकरण तयार झाले. ह्या प्राकृतांचे पश्चिमेकडील प्राकृत आणि पूर्वेकडील प्राकृत हे मुख्य दोन प्रकार होते. पश्चिमेकडील प्राकृत म्हणजे शौरसेनी

आणि पूर्वेकडील प्राकृत म्हणजे मागधी. ह्या दोन्हींच्यात आढळणारी प्राकृत म्हणजे अर्धमागधी. अर्धमागधीचा प्रदेश हा साधारण आजच्या मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश राज्यादरम्यानचा मध्यवर्ती प्रदेश होता. याच्या दक्षिणेकडील म्हणजे आजच्या मध्यप्रदेशातील दक्षिण भाग आणि महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाड्यातील भाग या प्रदेशात महाराष्ट्री प्राकृतचा उदय झाला. काळाच्या ओघात तिलाही वाङ्मयीन रूप प्राप्त झाले. ह्या प्राकृत भाषेदरम्यानच्या कालिक तसेच प्रादेशिक सीमारेषा निश्चितपणे सांगता येत नाहीत. जसजशी त्यांच्यात वाङ्मयनिर्मिती होऊन त्यांना ग्रांथिक स्वरूप येत गेले (ह्याचे दर्शन आपल्याला संस्कृत नाटकांतील स्त्री पात्रांच्या आणि इतर गौण पात्रांच्या तोंडी असलेल्या संवादातून घडते) तसेतसे लोकांच्या प्रत्यक्ष बोलण्याच्या भाषेचे रूप पुन्हा बदलत गेले आणि काही काळाने त्यांच्यातून अपभ्रंश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाषा उगम पावल्या. यातही 'नागर' या अपभ्रंशाला वाङ्.मयीन प्रतिष्ठा प्राप्त झाली. हेमचंद्र या वैयाकरणाने त्याचे व्याकरण बाराव्या शतकात लिहिले.

बाराव्या शतकात महानुभाव पंथ महाराष्ट्रात अस्तित्वात होता त्या काळी बोलली जाणारी मराठी लीळाचरित्र व इतर अनेक महानुभावी ग्रंथात बद्ध झालेली आहे. मराठीपुरते बोलायचे तर नर्मदा नदीच्या दक्षिणेकडे आजच्या विदर्भ मराठवाड्याच्या प्रदेशात नागर, वैदर्भ, दाक्षिणात्य, महाराष्ट्र या विविध अपभ्रंशापासून मराठीची उत्पत्ती झाली. अपभ्रंश आणि तिचे आजच्या मराठीशी नाते असलेली भाषा एकाच वेळी प्रचारात होत्या. भाषा एकाच वेळी अनेक रूपात प्रचारात असणे स्वाभाविक आहे. आजही विदर्भ-खानदेशातील मराठी आणि सांगली-कोल्हापूर भागातील मराठी पुष्कळ भिन्न वाटण्याजोग्या आहेत. पालघरपासून बांद्यापर्यंत बोलली जाणारी कोकणी बोली आणखी वेगळी आहे.

## ९. एकाच भाषेची तीन रूपे :

वि. का. राजवाडयांनी त्यांच्या उपर्युक्त ग्रंथात मराठीचा जन्मकाळ इसवी सनाचे पाचवे शतक हा सांगितला आहे. असेच काहीसे मत कृ. पां. कुलकर्णी यांचेही आहे. शं.गो.तुळपुळे व ग्रियर्सन यांची मते विचारात घेतली तरी त्यापूर्वीच्या अपभ्रंश आणि महाराष्ट्री अपभ्रंश यांचा सुद्धा आधार मराठीच्या उत्पत्तीला झालाच हे विसरून चालणार नाही. आजच्या मराठीची सुरुवात जरी आठव्या शतकात झाली असे मानले तरी त्या पूर्वीच्या अपभ्रंश आणि महाराष्ट्री प्राकृत ह्या भाषा मराठीचीच आधीची रूपे होत. त्यामुळे या आधीच्या भाषांचा काळाच्या दृष्टीने आढावा घेणे हे देखील मराठी भाषेच्या इतिहासासाठी आवश्यकच आहे.

## १०. महाराष्ट्री, अपभ्रंश आणि मऱ्हाठी एकच :

सातवाहनकालीन महाराष्ट्री भाषा ही ज्ञानेश्वरकालीन मराठीचेच जुने रूप आहे. शालिवाहनाच्या आरंभी लोक जी महाराष्ट्री बोलत तीच वाढत वाढत बाराव्या शतकात नागर मऱ्हाठी झाली. हजार बाराशे वर्षे मराठी भाषा बनत बनत चालली होती. ओघ एकच पण पूर्वी जिला महाराष्ट्री म्हणत तिलाच सुसंपन्न स्थितीत मऱ्हाठी म्हणू लागले. ल. रा. पांगारकर हे राजवाडे आणि इतर विद्वानांच्या मताचा संदर्भ घेऊन म्हणतात की तीनही भाषा (महाराष्ट्री, अपभ्रंश आणि मऱ्हाठी) भिन्न नसून काल आणि व्यवहार यांच्या योगाने पालटत जाणाऱ्या एकाच भाषेची ही तीन रूपे आहेत किंवा तीनही मिळून एकच भाषा आहे. जिला

पूर्वी महाराष्ट्री म्हणत तिलाच दहाव्या, अकराव्या शतकात मऱ्हाटी म्हणू लागले. मुकुंदराज, भास्कर, ज्ञानेश्वर, नामदेव, यांच्यापूर्वी कित्येक शतके मराठी भाषा हळूहळू बनत चालली होती. मुकुंदराज किंवा ज्ञानेश्वर यांनी ज्या 'नागरी बोलीत' आपले ग्रंथ रचले ती साधारण त्या स्वरूपात आठव्या, नवव्या शतकापासून आली असली पाहिजे.

## ११. महाराष्ट्रचूडामणी :

राजशेखराचा 'कर्पूरमंजरी' नावाचा महाराष्ट्री भाषेतला ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा कवी इ. स. ८८४ ते ९५९ या काळात होऊन गेला. राजशेखराचे बाल रामायण, बाल भारत, विद्धशालभंजिका आणि कर्पूरमंजरी असे चार ग्रंथ प्रसिद्ध आहेत. राजशेखर हा महाराष्ट्रीय ब्राह्मण होता. त्याने बालरामायणात आपल्या पणजाला 'महाराष्ट्रचूडामणी' असे म्हटले आहे. या पदाचा अर्थ महाराष्ट्री भाषेचा महापंडित असाही होऊ शकतो. तथापि, महाराष्ट्र भाषेचा पंडित महाराष्ट्रीयच असावा असे अनुमान काढता येण्यासारखे आहे. कर्पूरमंजिरीत सूत्रधाराच्या तोंडी 'वीणा मिअंग' (मृदंग) व 'कांस्यताल' (काश्यांच्या धातूचे टाळ) ह्या महाराष्ट्री वाद्यांचा उल्लेख आहे. मृदंग, वीणा, टाळ ही कीर्तनाची सामग्री ९ व्या शतकातच महाराष्ट्रीयात प्रसारात होती असे दिसते. संस्कृत शब्दाचे महाराष्ट्रीत अपभ्रंश कसे होत चालले होते हे राजशेखराच्या कर्पूरमंजिरीतील काही शब्दांवरून कळून येते.

## १२. महाराष्ट्री भाषा :

महाराष्ट्री 'टप्परकण्णा' याचा मराठीत 'टोपलीएवढे कान' असा अर्थ आहे.

| संस्कृत | महाराष्ट्री | संस्कृत | महाराष्ट्री |
|---|---|---|---|
| आत्मा | अप्पा | धन | धण |
| स्थान | ठाण | द्वि | दो |
| स्नेहग्रंथि: | णेहगण्ठि | स्तन | थण (थान) |
| अस्मादृशा: | अहमारिसो | युगलम् | जुअलम् (जुळे) |
| मातृष्वसा | माउस्सिंआ (मावशी) | प्रसाद | प्पसाद (पसायं) |
| कर्पूर | कप्पूर (कापूर) | नित्यं | णिच्चं (नीच, नीच) |
| लक्ष्मी | लच्छी | लक्ष्मण | लछमन |
| चंद्र | चंद (चांद) | गर्भ | गब्भ (गाभा) |
| सप्त | सत्त (सात) | शर्करा | सक्करा (साखर) |
| नास्ति | णत्थि, नाथी (नाही) | हस्त | हत्थ (हात) |
| मधुर | महुर | मुख | मुह |
| मेघ | मेह | आर्द्र | ओल्लं (ओले) |
| आद्रक | आले | अद्य | अज्ज (आज) |
| चतुर्दशी | चउद्दसी (चौदा, चौथ) | पार्श्वे | पासे, पासम्मि (पास, पाशी) |
| कनिष्ठ भगिनी | कणिट्ठ बहिणी | पतन्ति | पडन्ति |
| पतन | पडण | | |

महाराष्ट्री भाषेतल्या सप्तशती या हालसातवाहन राजाच्या ग्रंथाचा काळ विन्सेन्ट स्मिथच्या मतानुसार इ. स. ६८ आहे. याकोबीच्या मतानुसार हालाचा काळ इ. स.४६७ तर मॅक्डोनेलच्या मतानुसार इ.स १००० आणि वेबरच्या मतानुसार तिसरे शतक ते सातवे शतक असा आहे. म्हणजेच, आपण ढोबळ मानाने हालाचा काळ पहिले शतक असेल असे म्हणू शकतो. हया ग्रंथामध्ये ७०० गाथा आहेत. ज्यातील ५० गाथा ह्या एकट्या हालराजाने रचल्या आहेत. प्राचीन महाराष्ट्रीचा व जुन्या मराठीचा परिचय असलेल्या कोणाही मराठी वाचकास

सप्तशती ग्रंथ समजायला विशेष कठीण जाणार नाही. ह्यावेळच्या महाराष्ट्रीत ऋ, लृ, ऐ, ओ हे स्वर नाहीत व द्विवचनही नाही. ही प्राचीन महाराष्ट्री, ज्ञानेश्वरीची मऱ्हाटी व नंतरची मराठी अशी साखळी चांगली जोडता येते.

हृदय-हिअअ-हिय्या, देवकुळ-देअउळ-देऊळ, अग्नि-अग्गी-आग, अश्रु-अंसु-आसू, पानीय-पानिअ-पाणी, सज्जन-सज्जण-सजण, द्वे-दो, भाजन-भाअण-भाण, कार्य-कज्ज-काज, रिक्त—रित्त-रिता, स्फुरन्ति-फुरन्ति, रुष्यति-रुसइ-रुसतो, त्वं-तुंम्-तू, भगिनी-भहिणी-बहीण, (भू म्हणजे होणे) - भवन्ति-हुवन्ति किंवा होन्ति-होतात, भवतु-होदु-होऊ, वृक्ष-रुक्ख-रुख, इ. अनेक शब्दांवरून व शब्दप्रयोगांवरून सातवाहनाची महाराष्ट्री ज्ञानेश्वरीतील मराठीकडे कशी प्रवास करीत चालली होती ते दिसते.

'उदरं बिभ्रति' या संस्कृत वाक्याचे त्यावेळच्या मराठीत 'पोट्टं भरन्ति' हे रूप झालेले आहे. सप्तशतीत काही देशी शब्दही आहेत. अत्ता (आत्या), कच्छ (कास), कंजिअ (कांजी), खोक्खा (खोकला), पाडी (रेडकू), बोल्ल (बोलणे), भंड (भांडणे), पिट्ट (पिटणे), पुस (पुसून टाकणे), फिट्ट(फिटणे), दाव (दाखवणे), डोर (दोर), पिलुअ (पिलु), चिक्खल (चिखल), चुक्क (चुकणे), भुक्क (भोकणे), लड्डुक (लाडू), हिंड, रुंद इ. इ.

# प्रकरण-३

## १३. सप्तशतीतील मराठी :

सप्तशतीतील खालील गाथा पाहिल्या असता त्यांची आजच्या मराठीशी जवळीक स्पष्टपणे दिसते.

जेण विणा ण जिविज्जइ अणुणिज्जइ सो कआवराहो वि।
पत्ते वि णअरदाहे भण कस्स ण वल्लहो अग्गी॥
(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२ पृ.११९ गाथा क्र..१६३)

"ज्याच्या वाचून जीवन जगताच येत नाही त्याने अपराध केला तरी उलट त्याचीच मनधरणी करावी लागते. आगीमुळे गाव जळून जाण्याचा समय आला तरी अग्नी कधी कुणाला अप्रिय होईल काय?"

सो अत्थो जो हत्थे, तं मित्तं जं णिरन्तरं वसणे।
तं रूअं जत्थ गुणा, तं विण्णाणं जहिं धम्मो ।।५१।।
(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२ पृ.१७७ गाथा क्र.२५१)

प्रत्यक्ष हातात असते ते धन, संकटात अंतर देत नाही तो मित्र, गुणांचे सान्निध्य असते तेच रूप, धर्माचे साहचर्य असते तेच विज्ञान.

पक्काइँ वि णिम्बफलाइँ णवरँ काएहिँ खज्जन्ति।
(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२ पृ.१७६ गाथा क्र.२४८)

"पक्व झालेली (कडु) लिंबाची फळे केवळ कावळेच सेवन करितात।"

"निंब निंबोळियां मोडोनि आला। तो काउळियांसीच सुकाळ जाला॥"
(ज्ञानेश्वरी ९-४३८)

जह जह वाएइ पिओ तह तह णच्चामि **चले** पेम्मे।
वल्ली वलेइ अङ्गं सहावथद्धे वि रुक्खम्मि॥

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२ पृ.२२० गाथा क्र.३०४)

प्रियकर जसे वाद्य वाजवीत आहे तशी मी प्रेमचंचल होऊन नाचत आहे. वृक्ष स्वभावत: स्तब्ध असतो, तरी वेली आपले अंग त्याच्याभोवती वळविते.

## १४. प्राकृतप्रकाश :

प्राकृतभाषेतील वररुचीचे व्याकरण इ.स.पूर्वी २५० च्या सुमारास झाले. ‘प्राकृतप्रकाश’ या नावाने ते प्रसिद्ध आहे. त्यात महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची या चार मुख्य प्राकृत भाषांचे वर्णन आहे. संस्कृत वैय्याकरणांत जी पाणिनीची योग्यता तीच प्राकृत वैय्याकरणांत वररुचीची समजली जाते. वररुची सर्व प्राकृतात महाराष्ट्री प्राकृताला महत्व देतो. त्याच्या आगोदर 'कच्चायणो' (कात्यायन) याने नंदाच्या वेळी मागधी भाषेचे व्याकरण लिहून तिचे महत्त्व वाढविले. अशोकाच्या वेळी बौद्धांच्या मागधी भाषेस म्हणजे पालीस जे महत्त्व होते ते ओसरले व महाराष्ट्रीचा त्याचवेळी भाग्योदय झाला. आता ते पारडे वररुचीच्या वेळी फिरले व त्याने महाराष्ट्रीस अग्रस्थान दिले.

## १५. शेषं महाराष्ट्रीवत् :

वररुचीच्या प्राकृतप्रकाशचे १२ परिच्छेद असून त्यात पहिल्या ९ परिच्छेदात त्याने महाराष्ट्रीचा व पुढील ३ परिच्छेदात पैशाची, मागधी व शौरसेनी या तीन प्राकृत भाषांचा विचार केलेला आहे. वररुची महाराष्ट्री व शौरसेनी या प्राकृत भाषा मुख्य मानतो. त्याने महाराष्ट्रीस प्रमुख स्थान दिले आहे. इतर भाषांच्या संबंधाने 'शेषं महाराष्ट्रीवत्' याप्रमाणे तो महाराष्ट्रीचा हवाला देतो.

महाराष्ट्रीत काही शब्द संस्कृत आहेत. काही संस्कृतोद्भव आहेत व काही निव्वळ देशी आहेत. संस्कृतोद्भव - नाथ-नाहो (पति), वृषभ —वस् (बैल), प्रतिपत् - पाडिवआ (पाडवा), अंगार - इंगालो (इंगळ), शय्या - सेज्जा (सेज), वल्ली-वेल्ली (वेल), अरण्यम्-रण्ण्म्, राण (रान), स्वैरम्-सइरम् (सैर, सैरा), राधिका-राहिआ (राही), षष्ठी-छटी (सट), नदी-णई (नई), पर्यस्त-पल्लत्थ-(पालथा), कुक्षि-कुच्छी (कूस), कृष्ण-कण्हो (कान्हा), राजकुलम्-राउल (राऊळ), विद्युत - विज्जू (वीज, बिजली) अशा प्रकारे शब्दांची रूपांतरे होत होत महाराष्ट्री भाषा बनत चालली होती. डुडुळ, दादला, बाप, चिखल, आंबुला - आंबुली म्हणजे नवराबायको असे काही मूळचे देशी शब्दही महाराष्ट्रीत होते.

अशा तऱ्हेने हजार - बाराशे वर्षे मराठी भाषा बनत चालली होती व तशी ती बनताबनता शके १२१२ पर्यंत नागरी मराठी बनून तिच्यात ज्ञानेश्वरीसारखा सर्वांगसुंदर ग्रंथ निर्माण झाला. लीळाचरित्र, विवेकसिंधू यासारखे मौलिक ग्रंथ लिहिले गेले. प्राचीन महाराष्ट्री भाषेतील वर उल्लेख केलेले व इतर अनेक शब्द जसेच्यातसे महाराष्ट्राच्या ग्रामीण परिसरात अजूनही प्रचारात आहेत.

### १६. <u>समरादित्याची कथा :</u>

मराठीची पूर्वपरंपरा सांगताना डॉ.शं.गो.तुळपुळे यांनी महाराष्ट्र सारस्वताच्या पुरवणी खंडामध्ये म्हटले आहे की, ‘‘महाराष्ट्रात बोलली जाणारी 'प्रकृष्ट प्राकृत' म्हणजे महाराष्ट्री अशी व्याख्या' दंडीने केली. ती नंतर आधुनिक भाषाशास्त्रज्ञ ग्रियर्सन व स्टेन कोनौ यांनी उचलून धरली. इ. स. ४०० च्या सुमाराला महाराष्ट्रीचा एक अपभ्रंश महाराष्ट्रात सुरू झाला. त्यास महाराष्ट्री-

अपभ्रंश किंवा जैन-अपभ्रंश म्हटले जाते. इ.स. ८००च्या सुमाराला लिहिला गेलेला हरिभद्र याचा 'समराइच्च कहा' (समरादित्याची कथा) हा या भाषेतील एक मौल्यवान ग्रंथ आहे. ती कादंबरी असून तिच्यात गॅब्रिएल गार्सिया मार्केझ या जगप्रसिध्द कादंबरीकाराचे वैशिष्ट्य मानले जाणारे Magic Realism (जादुई वास्तववाद) हे निवेदन तंत्र वापरण्यात आलेले आहे, ही अद्भुत गोष्टच म्हटली पाहिजे. काव्यातील भाषा ही लोकव्यवहारातील भाषेहून पुष्कळच भिन्न असते व शब्दांचे अनेक समास, मिलावटी काव्यासाठी आवश्यक असतात, त्या प्रत्यक्ष व्यवहारात नसतात. समरादित्याची कथा ही कादंबरी यादृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण मानली पाहिजे. इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या आसपास या अपभ्रंश भाषेत पुष्कळ मौलिक ग्रंथ निर्माण झाले.

धनपालकृत 'भविसयत्तकहा'

'पुष्पदंतकृत' 'णायकुमारचरिउ', 'जसहारचरिउ', 'महापुराण',

'मुनि कनकामरकृत' 'करकण्डचरिउ',

'देवसेनकृत' 'सावयधम्मदोहा' असे ग्रंथ प्रो. याकोबी, डॉ. गुणे, प्रो.हिरालाल जैन, डॉ. वैद्य प्रभृति विद्वानांनी संपादित केलेले आहेत. या ग्रंथांमधील अपभ्रंश भाषा ही महाराष्ट्री आणि मराठीतला दुवा होय. भाषेच्या आंतरिक स्वभावास धरून महाराष्ट्रीचा हा अपभ्रंश इ.स. ४०० च्या सुमारास चालू झाला. या अपभ्रंश भाषेचा व आजच्या मराठीचा सांगाडा तपासून पाहिला असता तौलनिक अभ्यासावरून स्पष्ट होते की उच्चारप्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया व शब्दसिद्धी ही भाषेची तीन प्राणभूत अंगे मराठीने साक्षात अपभ्रंशापासून उचलली व त्याबरोबरच काही नवीन प्रकार रूढ करून भाषेचे विकसन पुढेही चालूच ठेवले. उल्लेखनीय गोष्ट ही की मराठी भाषा ही अपभ्रशांचा अपभ्रंश नसून

संस्कृतीकरणाचा संस्कार झालेला उत्क्रांत स्वरूपातील अपभ्रंश आहे. अपभ्रंशातील उच्चारदौर्बल्य काढून मराठीने ठसठशीत उच्चार रूढ केले. मराठीतील तत्सम शब्दांचे प्रमाण पाहिल्यास ही गोष्ट स्पष्ट होते.” (वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४४ ते ६४५) अपभ्रंश भाषेला कुठेही अपभ्रंश भाषा म्हटलेले नाही. तिला ‘देसी’असे नाव ज्ञानेश्वरीसारखे आद्य ग्रंथ देतात.

या संस्कृतीकरणाचे कारण उघड आहे. प्राकृत महाराष्ट्री व तिचा अपभ्रंश या भाषा बौद्ध आणि जैन धर्मांच्या छायेखाली वावरल्या व त्या धर्मांचा प्रसार मुख्यत: बहुजनात असल्याने बहुजनांच्या बोलीस महत्त्व चढले. इ.स.८०० च्या सुमारास वैदिक धर्माचा ध्वज पुन:श्च फडकल्यावर संस्कृत भाषेचे महत्त्व वाढले व त्यामुळे पंडिती संस्कृतची गडद छाया लौकिक महाराष्ट्री प्राकृतावर म्हणजेच अपभ्रंशावर पडून ती ‘सुसंस्कृत’ होऊ लागली.

## १७. <u>अपभ्रंशापासून मराठी :</u>

अपभ्रंशापासून मराठी निघाली हे डॉ. वि. भि. कोलते यांनी वाङ्मयीन पुराव्याने सिद्ध केले आहे. ज्ञानेश्वरीत मराठी भाषेला 'मऱ्हाठी' या शब्दाबरोबरच' ‘देशी’ हा शब्दही वापरलेला आहे. किंबहुना मराठीचे 'देशी' हेच नाव अधिक रूढ होते. अपभ्रंश ग्रंथातून त्यातील भाषेला ‘देशी’ च म्हटले आहे. अपभ्रंश भाषेचे साहित्यांतर्गत नाव 'देशी' असेच आहे, अपभ्रंश नव्हे. या देशीचा विकास होऊन जी भाषा निर्माण झाली ती मराठी. ती अपभ्रंशाच्या 'नागर' या प्रकारापासून निघाली ('मराठीचे माहेर'-विक्रम स्मृति, पृ. ४७९).

## १८. तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणे गा :

देशी याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा प्राय: होतो. खरे तर प्रत्येक वस्तु देशीच असेल तर देशीपणाची चर्चा करण्याची गरजच काय? परंतु देशी नसलेल्या परक्या, बाहेरून येणाऱ्या अनेक मूल्यांचे, भाषांचे, संस्कृतींचे देशी मूल्यांवर, भाषांवर व संस्कृतींवर जेव्हा आक्रमण होते, तेव्हा स्वत:च्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना देशीवादी व्हावे लागते. वस्तुत: देशीपणा ही अत्यंत स्वयंभू, झाडाझुडपांसारखी सोशिकपणे आपापल्या जागेवर उगवणारी व टिकून राहणारी संकल्पना आहे. परंतु तिलाही आक्रमक व्हावे लागते असे सांस्कृतिक कसोटीचे क्षण येतात. त्यावेळी अत्यंत नम्रतेने बोलणाऱ्या ज्ञानेश्वरालासुद्धा "दाऊ वेल्हाळ देशी नवी" असे आक्रमक व्हावे लागते किंवा भटोबासारख्या गाढ्या पंडितालाही "तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणे गा : मज श्रीचक्रधरे, निरुपिली मऱ्हाटी : तियाचि पुसा :" असे संकुचित किंवा 'दुराग्रही' व्हावे लागते. देशीपणाच्या संकल्पनेत स्थितिशीलत्व अबाधित राखणारी स्वाभाविक अवस्था हा अर्थ अभिप्रेत असतो( भालचंद्र नेमाडे, औरंगाबाद, १९९० पृ.८०).

## १९. कुवलयमालेतील मरहट्टे :

इ.स. ७८० च्या सुमारास लिहिलेल्या उद्योतनसूरी यांच्या कुवलयमाला या ग्रंथात अनेक भाषांचा उल्लेख असून त्यातील एकीचे नाव "मरहट्ट" असे आहे. त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे दिसते :

> दढमडह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसीले य।
> दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे॥

(बळकट, ठेंगण्या, धटमुट, काळ्यासावळ्या रंगाच्या काटक, अभिमानी, भांडखोर, सहनशील, कलहशील व 'दिण्णले' (दिले) 'गहिल्ले' (घेतले) असे बोलणाऱ्या मरहट्ठ्यास त्याने पाहिले.) हे सगळे वर्णन मराठी माणसाचेच आहे.

यात काय शंका? या चित्रशैलीतून मराठी माणसाचे घडविण्यात आलेले स्वभाव दर्शन विलक्षणच म्हटले पाहिजे.

## २०. मराठी पर्यावरण :

गाथासप्तशती या ग्रंथातील पुढील काही गाथा पाहिल्या की, या गाथांमधील समाजजीवन आणि सामाजिक पर्यावरण मराठी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

**गाथा क्रमांक ८ :-** अत्याबाई, आपल्या गावाला शोभा देणाऱ्या रमणीय तळ्यातील कमळाची थंडीने कोण दुर्दशा केली आहे. तिळाचे सुंदर पीक कापल्यावर नुसते बुडखे राहतात ना, तसे तळ्यात आता कमळांचे दांडे मात्र राहिले आहेत (स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.११).

**गाथा क्रमांक ९ :-** साळीचे शेत पिकून पांढरे झाले आहे. (ते कापण्याला शेतकरी येतील व एकांत मिळणार नाही) म्हणून मान खाली घालून का रडतेस? नटीने मुखाला हरीतालाचा रंग लावून सज्ज व्हावे त्याप्रमाणे तागाचे शेत (पिवळ्या धमक फुलांनी) नटले आहे.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.११)

**गाथा क्रमांक १४** :- तू स्वयंपाक करण्यात निपुण आहेस. चूल पेटत नाही म्हणून रागावू नकोस. तुझ्या श्वासाला लाल पाटल फुलांचा सुगंध आहे. त्याचा स्वाद घेण्यासाठी अग्नी धुराच्या रूपाने तुझ्या मुखाभोवती घोटाळत आहे व मुद्दामच पेट घेत नाही. (स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२,पृ.१५)

**गाथा क्रमांक १८** :- गरीब कुटुंबात कपड्याचीसुद्धा इतकी दुर्दशा व ओढाताण होते की (ती असह्य झाल्यामुळे) धुवून वाळत घातल्यावर, बिचारा दशांतून वाहणाऱ्या पाण्याच्या रूपाने अश्रू ढाळतो.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.१८)

**गाथा क्रमांक ३०** :- पाटलाच्या पोरा, तू बायकोच्या तंत्राने वागतोस व तिला भीतोस, तू कडूलिंबाच्या झाडावरील किड्यासारखा आहेस, तू कोणावरही कृपा करीत नाहीस (आम्हाला) तुझे दर्शनही होत नाही. तरी गाव तुझ्यासाठी झुरत आहे.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२,पृ.२९)

**गाथा क्रमांक ३६** :- तिचे घर भरचौकात आहे. ती तरुण आहे, सुंदर आहे, तिच्या शेजारणी गैरवर्तनी आहेत, तिचा पती प्रवासात आहे, तिची कौटुंबिक दुर्गती आहे, तरीही तिने आपले शील ढळू दिलेले नाही.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.३३)

**गाथा क्रमांक ५८** :- आजच पती प्रवासाला गेले, आज लोक रात्रभर जागरण करतील, आणि गोदावरीचे काठ हळदीकुंकवाने रंगतील.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.४८)

**गाथा क्रमांक १०३** :- मधुक वृक्षा, गोदातीरावरील गर्द राईत तुझ्या फांद्या फुलांच्या भाराने जमिनीपर्यंत लवल्या आहेत. माझी विनंती ऐक, तू आपली फुले अगदी हळूहळू ढाळ.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.८०)

**गाथा क्रमांक १२३** :- (सुकुमार) श्यामला प्रथमच बाळंतीण झाली तेव्हा वल्लभाचे नाव घेण्याबद्दल तिच्या मैत्रिणी तिला आग्रह धरू लागल्या तेव्हा ती पुन्हा पुन्हा म्हणाली, त्याला माझा वल्लभ म्हणू नका गं बायांनो; यापुढे मी त्याचे नावसुध्दा घेणार नाही; मग साऱ्या जणी हसू लागल्या!

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.९३)

**गाथा क्रमांक १३५** :- दुष्टाला स्नेहभावाने वाढविला व रक्षिला तरी तो दिव्याप्रमाणे आपल्या आश्रयदात्याला लवकरच काळिमा आणतो.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.१०१)

**गाथा क्रमांक १६५** :- कपाशीच्या शेतात पेरणी सुरू करण्यापूर्वी नांगराची पूजा करताना मनोरथांच्या आवेगामुळे शेतकऱ्याच्या स्त्रीचा हात थरथरतो.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.१२०)

**गाथा क्रमांक १८९** :- श्यामला सुकुमार आहे, तरी तुझ्या अंगाला लावून उरलेले जांभळाच्या रसाचे कडक उटणे आपल्या अंगाला लावून ती गोदातीरावर स्नान करीत आहे.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.१३७)

**गाथा क्रमांक २४१** :- आपल्याला कधी मिळेल अशी कल्पनाही नव्हती असे नवे रंगीत लुगडे शेतकऱ्याच्या सुनेला मिळाले. यामुळे ती इतकी फुगली की ती अंगाने सडपातळ होती व गावातले रस्ते रुंद होते तरी ती त्यात मावेनाशी झाली.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.१७२)

**गाथा क्रमांक २४६** :- मामी, मी नदीत नहात होते. तो प्रवाहात खाली उभा होता. माझ्या अंगावरील हळदीने कडू झालेल्या पाण्याचा घोट घेऊन त्याने जणू माझ्या हृदयाचा घोट घेतला.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.१७५)

**गाथा क्रमांक ३०८** :- कीरमुहसच्छहेहिं रेहइ वसुहा पलासकुसुमेहिं ।

बुद्धस्य चलनवन्दणपडिएहिं व भिक्खुसंधेहिं ।

पोपटाच्या चोचीप्रमाणे लालभडक अशा पलाश पुष्पांनी पृथ्वी शोभायमान झालेली आहे. जणु बुद्धाच्या चरणांशी वंदन करण्यासाठी लोटांगण घालणाऱ्या भिक्षूसंघासारखे हे दृश्य दिसत आहे.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.२१३)

**गाथा क्रमांक ३२४** :- जमीन नांगरताना चिखलात रुतणारा फाळ वारंवार ओढून काढावा लागल्यामुळे शेतकरी दमला व गाढ झोपला, म्हणून त्याच्या पत्नीला मोहनसुख मिळाले नाही, म्हणून तिने पावसाला शाप दिला.

(स.आ.जोगळेकर, (संपा) पुणे, २०१२, पृ.२२२)

## २१. जैन महाराष्ट्री :

मराठीचे वय १५०० ते २००० वर्षांपेक्षा जास्त असल्याचे सांगणारे किमान ८० ग्रांथिक पुरावे  आज एकट्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत उपलब्ध आहेत. ज्या ग्रंथांमध्ये मराठी भाषेची जुनी रुपे वापरलेली आढळतात त्यात प्रामुख्याने कालिदासाचे शाकुंतल (४ थे शतक), शूद्रकाचे मृच्छकटिक (६वे शतक), प्रवरसेनाचे सेतुबंध (५ वे शतक), भद्रबाहूचे आवश्यक निर्युक्ती (३ रे शतक), विमलसुरीचे पौमचरियम् (१ ले ते ३ रे शतक) यांचा समावेश आहे.

## २२. विश्वातील भाषा आणि 'प्राकृत' :

भाषाशास्त्रज्ञांनी आज उपलब्ध असलेल्या सुमारे २००० मुख्य भाषा १२ गटात विभागल्या आहेत. भारतात प्रचलित असणाऱ्या प्राचीन, मध्ययुगीन आणि प्राकृत भाषा या बारांपैकी 'भारोपीय' (इंडो-युरोपियन) या गटात समाविष्ट होतात. 'भारोपीय भाषा' या सामान्यत: १३ उपगटात विभक्त केल्या जातात. त्यापैकी एक मुख्य गट 'आर्य-भारतीय' (इंडो-आर्यन) भाषांचा आहे. भारतात 'प्राकृत' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भाषा या 'आर्य-भारतीय' भाषा गटामध्ये समाविष्ट केल्या जातात.

आर्य-भारतीय भाषांचा विचार तीन काळांमध्ये विभागून केला जातो.

(१) प्राचीन आर्य-भारतीय भाषाकाळ : इ.स.पू.१६०० ते इ.स.पू.६००

(२) मध्यकालीन आर्य-भारतीय भाषाकाळ : इ.स.पू.६०० ते इ.स.१०००

(३) आधुनिक आर्य-भारतीय भाषाकाळ : इ.स.१००० ते आजपर्यंत.

मराठी भाषेचे अभिजातत्व सिद्ध करताना, आपल्याला वरीलपैकी दुसऱ्या काळाचा (इ.स.पू.६०० ते इ.स.१०००) विशेष विचार करावा लागतो. हा काळही भाषाविदांनी तीन गटात विभागला आहे. त्यापैकी दुसऱ्या गटाचा काळ आहे — इ.स.१०० ते इ.स.५००. ज्या काळात त्या विविध प्राकृत भाषांमध्ये साहित्यिक कृती घडल्या, त्यात 'महाराष्ट्री' आणि 'जैन महाराष्ट्री' या भाषांचा समावेश होतो. त्याखेरीज मागधी, अर्धमागधी, पाली, पैशाची आणि शौरसेनी या भाषांमधील साहित्यही उपलब्ध आहे.

## २३. 'महाराष्ट्री' प्राकृतातील उपलब्ध साहित्य :

येथे नमूद केले पाहिजे की, भरताच्या नाट्यशास्त्रात (सुमारे इ.स.पू.२००) 'महाराष्ट्री' भाषेचा निर्देश नाही. (अध्याय १८, श्लोक ३५-३६) तथापि, त्यांच्या यादीतील 'दाक्षिणात्या' या नावाने 'महाराष्ट्री' भाषेचे सूचन होते — असा अनेक अभ्यासकांचा दावा आहे. कारण आजची 'दाक्षिणात्य' संकल्पना भरतापेक्षा वेगळी आहे. शिवाय त्याने उपभाषांमध्ये 'द्राविडी' भाषेचा स्वतंत्र निर्देश केला आहे. 'दाक्षिणात्य' या भाषेचे स्पष्टीकरण काही टीकाकार 'वैदर्भी' असे करतात. तो महाराष्ट्राचाच एक भाग आहे. महाराष्ट्री भाषेतील उपलब्ध साहित्य व त्यांचे काळ :

सेतुबंध — प्रवरसेन — इ.स. ५ वे शतक

गौडवध — वाक्पतिराज — इ.स.७५० ( ८ वे शतक)

लीलावती — कौतूहल — इ.स. ८ वे शतक

चिह्नकाव्य — कृष्णलीलाशुक (केरळनिवासी) — इ.स. १३ वे शतक

कंसवध, उषानिरुद्ध — रामपाणिवाद — (मलबार- निवासी) — इ.स. १७-१८ वे शतक

## २४. महाराष्ट्री आणि जैन महाराष्ट्री :

हर्मन याकोबी या जर्मन अभ्यासकाने प्रथमत: 'जैन महाराष्ट्री' ही संज्ञा वापरली. त्यांच्या मते प्राचीन जैन आगमग्रंथ (धर्मग्रंथ) 'जैन महाराष्ट्री' भाषेत लिहिलेले आहेत. पुढे जैनविद्येच्या अभ्यासकांनी या मताचे खंडन करून असे प्रस्थापित केले की सर्वाधिक प्राचीन श्वेतांबर ग्रंथ 'अर्धमागधी' भाषेत असून, इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून जैन लेखकांवरचा 'महाराष्ट्री'चा प्रभाव वाढत गेला.

भद्रबाहू, कालकाचार्य आणि पादलिप्त हे जैन परंपरेतील अत्यंत प्राचीन (इ.स. दुसरे-तिसरे शतक) आचार्य व लेखक होऊन गेले. सातवाहन साम्राज्याचा विस्तार बराच मोठा होता. सातवाहन राजे प्राकृतप्रेमी होते. जैन आचार्य सतत विहार करून, त्या त्या प्रादेशिक बोली भाषेत प्रवचने करीत असत (आजही करतात). वरील तीनही आचार्य प्रतिष्ठान (पैठण) येथे राहिलेले होते. भद्रबाहू हे प्रतिष्ठान-निवासी बृहत्संहिताकार वराहमिहिरांचे बंधू होते. कालकाचार्यांचा इतिहास शक संवत् आणि विक्रम संवत् या कालगणनेशी जुळलेला आहे. पादलिप्त हे हालसातवाहनाचे निकटवर्ती होते. प्रबंधकोश, प्रभावकचरित, प्रबंधचिंतामणी — या जैन ऐतिहासिक ग्रंथामध्ये या तीन लेखकांचे जीवन आणि

साहित्य यांचा परिचय दिला आहे. भद्रबाहू व पादलिप्तांनी जैन महाराष्ट्रीत लेखन केले.

इ.स.च्या ६ व्या शतकात होऊन गेलेला ‘दण्डी’ कवी म्हणतो, ‘महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदु: ।’ (काव्यादर्श १.३४) यात अपेक्षित असलेला ‘महाराष्ट्र’ म्हणजे आजचा भौगोलिक महाराष्ट्र नसून, त्यात महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश व गुजरात या प्रदेशांमधले काही भाग समाविष्ट होते. एकंदरीत, महाराष्ट्री भाषा भारतातल्या मोठ्यात मोठ्या प्रदेशातील जास्तीत जास्त लोकांना समजत होती. (प्राकृतशब्दमहार्णव, प्रस्तावना पृ.४०) म्हणूनच जैन लेखकांनी तिचा साहित्यभाषा म्हणून स्वीकार केला.

महाराष्ट्री भाषेची बरीच वैशिष्ट्ये जैन महाराष्ट्रीत असली तरी त्यात थोडे वेगळेपणही होते. ती अर्धमागधीने काहीशी प्रभावित होती, कारण श्वेतांबर जैन लेखकांवर अर्धमागधीचा प्रभाव होता. शिवाय ते लेखक भारताच्या ज्या ज्या प्रांतात जन्मलेले होते (उदा. हरिभद्र-राजपुताना, हेमचन्द्र-गुजरात) तेथील बोली भाषेतील शब्दसंपत्तीही त्यात होती. शिवाय जैन तत्त्वज्ञान व आचारातील अनेक रूढ पारिभाषिक शब्दही त्यात होते. दिगंबर जैनांनी ‘शौरसेनी’ भाषेला आपलेसे केल्यावर अर्थातच आपले सांप्रदायिक वेगळेपण राखण्यासाठी श्वेतांबर जैनांनी समकालीन भाषांमध्ये सर्वात प्रभावी असलेली ‘महाराष्ट्री’ भाषा आपली साहित्यभाषा म्हणून निवडली.

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत जैनांनी ‘महाराष्ट्री’ प्राकृतात लेखन केले. जैन महाराष्ट्रीत आज शेकडो ग्रंथ उपलब्ध

आहेत. उदाहरणच सांगायचे तर १२ वे शतक हे जैन महाराष्ट्रीचा सर्वात उत्कर्ष असलेले शतक आहे. विविध जैन लेखकांचे या एकाच शतकातील सुमारे ६५ ग्रंथ आज उपलब्ध आहेत. महाराष्ट्रीत काव्यांची रेलचेल आहे. कारण महाराष्ट्री ही मूलत: गीत भाषा म्हणूनच उदयास आली. तर जैन महाराष्ट्रीत काव्याबरोबरच कथा, कथासंग्रह, आख्यान, चरित (पुराण), तत्त्वज्ञान, नीती, आचार, व्रतमहिमा, तर्कशास्त्र, स्तोत्र, कर्मसिद्धांत, ज्योतिष, भूगोल – अशा अनेक विषयांवर विविध साहित्यप्रकारांची रचना दिसते.

जैन महाराष्ट्री साहित्याच्या १६ शतकांच्या सातत्यपूर्ण वाटचालीचे सामान्यत: तीन टप्प्यात वर्गीकरण करता येते.

प्रथम टप्पा (तिसरे ते सहावे शतक) – प्राचीन जैन महाराष्ट्री अथवा आर्ष प्राकृत. यामध्ये निर्युक्ति, भाष्य, चूर्णि, विमलसुरिकृत आद्य जैन रामायण (पउमचरिय) वसुदेवहिंडी – यांचा समावेश आहे.

द्वितीय टप्पा (सातवे ते दहावे शतक) – या टप्प्यात अभिजात स्वरूप स्पष्टपणे दृग्गोचर होते. हरिभद्र, उद्योतन, शीलांक, धनपाल – हे विशेष लेखक होत. संस्कृतची छाप असली तरी बोलीभाषा, वाक्प्रयोग, देशी शब्दांचा वापर ही वैशिष्ट्ये दिसतात.

तृतीय टप्पा (अकरावे ते अठरावे शतक) – जैन महाराष्ट्रीच्या शेवटच्या टप्प्यातील वैशिष्ट्ये सुखबोधा टीका आणि ‘वज्जालग्ग’ मुक्तक-काव्य-संग्रहात दिसतात. व्याकरण आणि उच्चारण यावर अपभ्रंश भाषेचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

## २५. अभिजातत्व जन्मसिद्धच :

डॉ.ए.एम.घाटगे हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भाषाशास्त्रज्ञ होते. संस्कृत, प्राकृत, पाली, जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, ग्रीक, लॅटिन या सर्व भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेच्या प्राकृत इंग्लिश महाशब्दकोशाच्या प्रस्तावनेत **ते जैन लेखक हरिभद्राच्या जैन महाराष्ट्रीस 'अभिजात' असे संबोधतात**, हरिभद्रांनी 'समरादित्यकथा' ही प्रदीर्घ कादंबरी आणि 'धूर्ताख्यान' नावाचे व्यंग्य उपहासप्रधान खंडकाव्य लिहिले. डॉ.घाटगे म्हणतात, "In it's classical form, as represented by Haribhadra's Samaradityakatha and Dhurtakhyana, Jain Maharashtri comes nearest to pure Maharashtri" (A.M.Ghatage, (Editor), Pune १९९६, प्रस्तावना, पृ.१०)

आठव्या शतकात जर महाराष्ट्री भाषेने 'अभिजात' (Classical) हा दर्जा मिळविला असेल तर त्याच महाराष्ट्री अपभ्रंशातून बनलेल्या मराठीचे अभिजातत्व वस्तुत: जन्मसिद्धच म्हणावे लागेल. महाराष्ट्री भाषा 'अपभ्रंश' अवस्थांतरातून गेल्यावर ज्या रूपात अवतरली ती आधुनिक मराठी होय. 'प्राकृतशब्दमहार्णव' नावाच्या प्राकृत हिंदी कोशाचे संपादक पं. हरगोविंददास सेठ म्हणतात 'महाराष्ट्री अपभ्रंश से मराठी और कोंकणी भाषाएँ उत्पन्न हुई।'

(प्रस्तावना पृ.५५)

वरील विवेचन बघता मराठी भाषेचे अभिजातत्व सिद्ध करण्यासाठी जैन महाराष्ट्री भाषेचा प्रवास जमेला धरला, तर एकाही शतकाचे किंबहुना शताकार्धाचेही अंतर न पडता, सलग दुसऱ्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतचा तिचा साहित्यिक प्रवास लक्षणीयपणे नोंदवता येतो.

## २६. प्राकृत व्याकरणकार आणि महाराष्ट्री :

चण्ड, कात्यायन, वररुचि, हेमचन्द्र त्रिविक्रम, वसंतराज, मार्कण्डेय, लक्ष्मीधर या प्रमुख वैयाकरणांनी लिहिलेल्या विविध प्राकृत भाषांच्या व्याकरणात महाराष्ट्रीला सर्वाधिक महत्त्व दिलेले दिसते. वररुचीचे व्याकरण ६ व्या शतकातील आहे. त्याच्या १२ परिच्छेदांपैकी ९ परिच्छेद 'सामान्य प्राकृत' वर आधारलेले आहेत. उरलेल्या सर्व प्राकृतांचे विवेचन थोडक्यात करून तो १२ व्या परिच्छेदाच्या ३२ व्या सूत्रात म्हणतो, 'शेषं महाराष्ट्रीवत्' याचा अर्थ असा की, ६ व्या शतकात महाराष्ट्री प्राकृत अत्यंत विकसित स्वरूपात होती. किंबहुना सामान्य प्राकृत - महाराष्ट्री असे समीकरण दृढ झाले होते.

डॉ.ए.एम.घाटगे यांनी Maharashtri Language and Literature, Journal of Uni. Of Bombay, May १९३६ या स्वतंत्र शोधनिबंधात वरील समीकरणास पुष्टी दर्शविली आहे.

## २७. अभिजात संस्कृत - नाटक - महाराष्ट्री :

भासाच्या नाटकातील प्राकृतचे वर्णन डॉ.घाटगे 'Pre-classical Prakrit' असे करतात. त्यानंतरच्या नाटकातील प्राकृतला ते 'Classical Prakrit' म्हणतात (A.M.Ghatage, (Editor), Pune १९९६, प्रस्तावना, पृ.११). कालिदास, हर्ष, विशाखदत्त, भवभूति, राजशेखर यांच्या नाटकांमध्ये सामान्यत: गद्यभाग शौरसेनीत तर पद्यभाग महाराष्ट्रीत आहे. वस्तुत: भरताच्या नाट्यशास्त्रात महाराष्ट्रीचा निर्देश नसतानाही कालिदासासारख्या महाकवीने (काळ अंतिम

मर्यादा ४ थे ५ वे शतक) गीतांसाठी केलेला महाराष्ट्रीचा अंगीकार 'महाराष्ट्री' भाषेचे अभिजाततत्व सिद्ध करतो.

## २८. प्राकृतनाट्य, लोकनाट्य :

'सट्टक' म्हणजे पूर्ण प्राकृत भाषेतील नाटक. ही परंपरा ९ व्या शतकात राजशेखर कवीने 'कर्पूरमंजिरी' पासून सुरू केलेली दिसते. शृंगार, हास्य आणि अद्भुत हे यातील मुख्य रस. 'आनंदसुंदरी' या सट्टकाचे कर्ते घनश्याम (इ.स.१७००) 'महाराष्ट्रचूडामणि' आणि 'सर्वभाषाकवि' होते. 'रंभामंजरी' नावाच्या नयचन्द्रकृत सट्टकात (इ.स.१४ वे शतक उत्तरार्ध) दिसणारी महाराष्ट्री अपभ्रंश खासच मानली पाहिजे. जसे-

जरि पेखिला मस्तकावरी केशकलापु

तरी परिस्खलिला मयूरांचे पिच्छप्रतापु ॥ (अंक १)

मत्तविलास- प्रहसन आणि हास्यचूडामणि-प्रहसन ही दोन मुख्य प्रहसने, तसेच भाण-डिम इ. प्राकृत नाट्यप्रकार आणि आधुनिक मराठीतील तमाशा, वगनाट्ये यांच्यातील नाते स्वयंस्पष्ट आहेत.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आज दिसणाऱ्या वासुदेवांची परंपरा आर्ष जैन महाराष्ट्रातील 'वसुदेवहिंडी' ग्रंथाशी जोडता येते. गुणाढ्य कवीच्या 'बड्डुकहा'तून स्फूर्ती घेऊन संघदास आणि धर्मसेन या दोन जैन मुनिवर्यांनी हा ग्रंथ लिहिला. कृष्णपिता वसुदेवाची वेगळीच माहिती त्यातून मिळते. वसुदेवाला भ्रमणाची (हिंडण्याची) फार आवड. अनेक वेषांतरे करून (बहुरूपी बनून),

अलंकार धारण करून (कवड्यांच्या माळा), मुकुटात मोरपीस खोचून त्याने १०० वर्षे भारतभ्रमण केले. तो गायनकलेत प्रवीण होता. प्रवासाहून आल्यावर त्याने ते वृत्तांत लिहिले. तोच ग्रंथ (आर्ष) महाराष्ट्री भाषेतला पहिला प्रवासवर्णनपर गद्यग्रंथ म्हणावयास हवा. सहाव्या शतकातील हा ग्रंथ प्राकृतच्या नव्या-जुन्या अभ्यासकांनी खूप प्रशंसिला आहे.

## २९. <u>कुवलयमाला आणि अठरा देशी भाषा :</u>

'दाक्षिण्यचिह्न' उद्योतनसूरींचा 'कुवलयमाला' हा प्रेमाख्यान सांगणारा ग्रंथ त्यांनी इ.स.७७८ ला लिहून पूर्ण केला. 'दाक्षिण्यचिह्न' आणि महाराष्ट्री भाषेवर विलक्षण प्रभुत्व ! याही दृष्टीने भरताच्या नाट्यशास्त्रातील 'दाक्षिणात्या' ही 'महाराष्ट्री' असू शकते. साहित्यिक भाषांखेरीज वेगळ्या १८ बोलीभाषांचे नमुने त्यात नमूद केले आहेत. त्यांनी मरहट्ठ देशातील लोकांचे केलेले वर्णन वास्तवदर्शी आहे. (कुवलयमाला पृ.१५२-१५३) कुवलयमाला हा ग्रंथ सांस्कृतिक संदर्भांनी खचाखच भरलेला आहे. जैन महाराष्ट्री भाषेतला तो एक मूर्धन्यस्थानी तळपणाऱ्या हिऱ्यासारखा ग्रंथ आहे.

'लीलावती' या कौतूहलरचित महाराष्ट्री ग्रंथात (इ.स.८ वे शतक) कवी म्हणतो, 'रइयं मरहट्ठ-देसि-भासाए ।' (लीलावती, गाथा १३३०) अर्थात्, 'ही रचना मी महाराष्ट्री (मराठी) देशी भाषेत केली आहे.' कुवलयमालाचा ग्रंथकारही, 'पइयभासारइया मरहट्ठ-देसि-वण्णय-णिबध्दा' असे शब्द वापरतो. (पृ.४)

'देशी-शब्द-कोश' या ग्रंथात पृ.२४ वर नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील संतकवी ज्ञानेश्वरांनीही 'मराठी'साठी 'देशी' हा शब्द प्रयुक्त केला आहे.

## ३०. 'गाथा' शब्दाची प्राचीनता :

'गाथासप्तशती' हा महाराष्ट्री भाषेतला इ.स.च्या पहिल्या-दुसऱ्या शतकातील मुक्तकांचा (द्विपदींचा, गाथांचा) संग्रह आहे. १६ व्या शतकातील संत तुकारामांच्या पद्यसंग्रहासही 'तुकाराम गाथा' असे म्हणतात.

महाराष्ट्री मुळातच गीतभाषा आहे. 'गाथा' हा एक लोकप्रिय छंद अथवा वृत्त आहे. संस्कृतमध्ये जो 'श्लोक' किंवा 'आर्या' तीच प्राकृतमध्ये 'गाथा'. 'वृत्तजातिसमुच्चय' ग्रंथात विरहांक (अथवा हरिभद्र) या लेखकाने (काल अंदाजे ६ वे-८ वे शतक ) 'गाथा' छंदाचे लक्षण आणि २६ प्रकार दिले आहेत.

'गाथालक्षण' ग्रंथात जैन मुनी नंदिताढ्य (इ.स.१०००) यांनी ९६ गाथांमध्ये 'गाथा' छंदाचे विवेचन केले आहे.

'गाथा' (गाहा) शब्दाचा सर्वात प्राचीन उपयोग जैनांच्या 'सूत्रकृतांग' या अर्धमागधी ग्रंथात दिसतो. 'उत्तराध्ययन' नामक ग्रंथातही 'गाहासोलसग' असा निर्देश येतो. हे अर्धमागधी उल्लेख इसवी सन पूर्व काळातील मानले जातात.

## ३१. गाथासप्तशती आणि जैन आचार्य पादलिप्त :

पादलिप्त हे अतिशय प्रभावी जैन आचार्य होऊन गेले. (इ.स.१ ले-२ रे शतक) 'गाथासप्तशती'(अथवा गाहकोस) या ग्रंथाच्या निर्मितीमध्ये त्यांचे भरीव योगदान आहे. कुवलयमाला ग्रंथात (इ.स.७७८) पादलिप्तांबरोबर सातवाहन आणि षट्प्रज्ञक यांचे उल्लेख आहेत. 'पालित्तयेण हालो हारेण व सहइ गोट्ठीसु'- यामध्ये पादलिप्तांना 'सातवाहनाच्या गळ्यातला हार' म्हटले आहे. त्यांच्या आज उपलब्ध नसलेल्या 'तरंगवईकहा' नावाच्या अप्रतिम काव्यग्रंथाचा उल्लेख आहे. त्यांचे हे प्रेमाख्यान महाराष्ट्रीत लिहिलेले होते.

ज्याअर्थी हालसातवाहनाच्या काव्य-दरबारात ते अग्रगण्य होते, त्याअर्थी 'तरंगवईकहा' पादलिप्तांनी आधीच लिहिलेली असावी. त्यामुळेच ते सुप्रसिद्ध झाले हाते. जैन प्रबंधग्रंथात दोघांच्या संदर्भातल्या पैठणला घडलेल्या दंतकथा नमूद केलेल्या आहेत. गाथासप्तशतीच्या रचनेसाठी गाथांचे संकलन, निवड यांमध्ये पादलिप्त नक्कीच सहभागी होते. गाथासप्तशतीत दोघांच्या सुमारे १५-१५ गाथा आहेत. त्या प्रत्येक ठिकाणी (त्या त्या शतकात) त्यांच्या गाथा शेजारी-शेजारी आलेल्या दिसतात. देशी अर्थात संस्कृतोद्भव नसलेल्या शब्दांचा त्यांनी कोश (संग्रह) केला होता – अशी माहती हेमचन्द्रकृत 'देशीनाममाले'च्या दुसऱ्या गाथेच्या टीकेत मिळते.

एकंदरीत महाराष्ट्रीतील पहिला काव्यग्रंथ (उपलब्ध नसला तरी अनेक पुराव्यांनी नक्की झालेला) पादलिप्त (पालित, पालित्त, पालित्तय) या जैन आचार्यांनी लिहिलेला होता असे म्हणता येईल.

## **३२. महाराष्ट्री आणि जैन महाराष्ट्रीची आकलनसुलभता :**

'मराठी' आणि 'महाराष्ट्री'चा संबंध काही विद्वान अमान्य करीत असले तरी दुसऱ्या कोण्यात्याही भाषकांपेक्षा मराठीभाषक लोकांना महाराष्ट्रीच नव्हे तर कोणत्याही प्राकृत भाषा शिकणे अधिक सोपे जाते. ह्यावरून असेही सिद्ध होते की, 'वैयाकरणांची सामान्य प्राकृत' म्हणजे महाराष्ट्रीच आहे.

जैन महाराष्ट्रीमध्ये लेखन केलेल्या जैन आचार्यांचे (प्राय: श्वेतांबर) मराठीला असलेले योगदान स्पष्ट करण्यासाठी देशीनाममाला या ग्रंथाचा पुरावा देता येईल.

### **जैन महाराष्ट्री भाषेत आढळणारे मराठीशी साम्य असलेले 'देशी' शब्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उच्छल – उसळणे | २. | उंदुर –उंदीर |
| ३. | ऊसअ –उशी | ४. | ओलुंड – ओलांडणे |
| ५. | कोड्ड – कोड, कोडकौतुक | ६. | खिडक्किया –खिडकी |
| ७. | खिर –खिरणे | ८. | खुड्ड –खुडणे |
| ९. | खेड्ड –खेळणे | १०. | घढ – गड |
| ११. | घुट्ट –घोट घेणे | १२. | घुसल –घुसळणे |
| १३. | घोल –घोळणे | १४. | चक्ख –चाखणे |
| १५. | चंग – चांगला | १६. | चच्चुप्प –चाचपणे |
| १७. | चड –चढणे | १८. | चिक्खल्ल – चिखल |
| १९. | चुक्क– चुकणे | २०. | चोप्पड– चोपडणे |

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | छिव —शिवणे | २२. | छोयर— छोकरा |
| २३. | जग्ग —जागणे | २४. | जंभा —जांभई |
| २५. | जिम —जेवणे | २६. | जुज्झ —झुंज, युद्ध |
| २७. | जुप्प —जुंपणे | २८. | झड —झडणे |
| २९. | झडप्प —झडप | ३०. | झर —झरणे |
| ३१. | डगल —ढेकूळ | ३२. | ढुंढुल्ल— ढंढोल, धुंडाळणे |
| ३३. | तुप्प —तूप | ३४. | तोड— तोडणे |
| ३५. | दक्खव —दाखविणे | ३६. | दद्दर —दादर |
| ३७. | दाढिया —दाढी | ३८. | दाव —दावणे, दाखविणे |
| ३९. | दुब्भ —दुभती (गाय) | ४०. | देक्ख —देखणा |
| ४१. | पह्लत्थ —पालथा | ४२. | पाव —पावणे, प्राप्त करणे |
| ४३. | पोक्कर— पुकारणे | ४४. | पोच्चड— पोचट |
| ४५. | पोट्ट —पोट | ४६. | पुंछ —पुसणे |
| ४७. | फिट्ट— फिटणे | ४८. | फुट्ट —फुटणे |
| ४९. | फुस —पुसणे | ५०. | बइल्ल— बैल |
| ५१. | बडबड —बडबड | ५२. | बप्प— बाप |
| ५३. | बाउल्ल— बाहुला | ५४. | बिट्ट-बेटा |
| ५५. | बुड्ड —बुडणे | ५६. | बोल्ल —बोलणे |
| ५७. | भण —म्हणणे | ५८. | भुक्क —भुंकणे |
| ५९. | भुल्ल— भुलणे, चूकभूल | ६०. | महमह —घमघमणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ६१. | रोट्ट –रोटी | ६२. | लग्ग– लागणे, चिकटणे |
| ६३. | लंचा –लाच | ६४. | लोट्ट –लोटणे |
| ६५. | वेढ –वेढणे | ६६. | वेल्ल –रमणीय, वेल्हाळ |
| ६७. | संघ –सांगणे | ६८. | सारव– सारवणे |
| ६९. | सिंप– शिंपडणे | ७०. | हो –होणे |

## **३३. महाराष्ट्री-अपभ्रंश भाषेला जैनांचे योगदान :**

महाराष्ट्रभूमीत जन्मलेल्या, वाढलेल्या जैन कवींनी १० व्या शतकापासून महाराष्ट्री –अपभ्रंशात विपुल ग्रंथरचना केलेल्या दिसतात. त्या प्राय: सर्व दिगंबर-संप्रदायी कवींच्या आहेत.

महाराष्ट्री, महाराष्ट्री-अपभ्रंश आणि मराठी या क्रमाने विकसित झालेल्या भाषेला जैनांनी भरीव योगदान केले आहे. पहिल्या-दुसऱ्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत – सातत्याने जैन महाराष्ट्रीत लेखन करून, जैनांनी मराठी भाषेचे 'अभिजातत्व' सिद्ध करण्यास मोठाच हातभार लावला आहे.

शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखित पोथ्या, प्रकाशित ग्रंथ, या साऱ्यांच्या आधारे मराठी ही प्राचीन भाषा आहे आणि तिच्यात श्रेष्ठ साहित्याची दीर्घ परंपरा आहे हे स्पष्ट होते.

# प्रकरण-४

## ३४. डॉ.कृ.पां.कुलकर्णी :

मराठी भाषेचा जन्म नेमका केव्हा झाला याबाबत डॉ. कृ. पां. कुलकर्णी यांनी 'मराठी भाषा उद्गम व विकास' या ग्रंथात म्हटले आहे की, ''सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश आणि संस्कृत या भाषांनी आपापल्यापरीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळया प्राकृतभाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळया काळी वरून आर्यावर्तातून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात उतरले आणि तेथे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुंतल, विदर्भ, कोकण इत्यादी लहान लहान देशविदेशांचा मिळून बनला आणि महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळया लोकघटकांनी मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळया प्राकृत भाषांच्या महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या मिश्रणाने बनली. इसवी सन पूर्व ६०० पासून प्राकृत भाषांचा काळ सुरू होतो. तो इसवी सन ७०० पर्यंत टिकतो. भगवान बुद्ध, महावीर, अशोक यांच्यावेळी प्राकृतांची भरभराट होती. बृहत्कथा (इ.स. पूर्व १००) ह्याच काळात लिहिली गेली. वररुचीचा 'प्राकृतप्रकाश' हा व्याकरणग्रंथ याच काळातील होय. अश्वघोषाने आपली नाटके याच काळात लिहिली. या काळानंतर पुढे दोन-तीनशे वर्षे प्राकृत भाषा वापरात होत्या, हे नाटकात वापरलेल्या प्राकृतांवरून सिद्ध होते. इ. स. ४०० ते ७०० या काळात महाराष्ट्री अपभ्रंश प्रचलित होती. 'श्री चावुण्डराये करवियले, गंगराजे सुत्ताले करवियले' हा श्रवणबेळगोळ येथील इ. स. ९८३ चा शिलालेख हा मराठीच्या अस्तित्वाचा एक हजार वर्षे जुना पुरावा होय. 'एपिग्राफिका इंडिका' व 'इंडियन

अँन्टिक्वेरी' या नियतकालिकांच्या निरनिराळया अंकात जे ताम्रपट आणि शिलालेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यात मराठी शब्द वापरलेले दिसतात. महाराष्ट्र देश, मराठी समाज आणि मराठी भाषा ह्यांची घटना वर दिलेल्या रीतीने इ. स. ६००-७०० च्या सुमारास झाली."

(डॉ.कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी पुणे, १९५०, पृ. १६८)

डॉ. कुलकर्णी यांनी आपल्या या ग्रंथात सदर विषयाचे सर्व पैलू मांडण्यासाठी विविध तज्ञांच्या ३२ मौलिक संदर्भ ग्रंथांचा वापर केलेला आहे. त्यांच्या मते मराठी भाषेचे वयोमान किमान १३०० ते १४०० वर्षे असावे.

मात्र हालसातवाहनाची गाथासप्तशती, गुणाढ्याची बृहत्कथा, रामायण, महाभारत, श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे प्राचीन महाराष्ट्राचे दोन खंड, राजारामशास्त्री भागवत यांचे 'मऱ्हाठ्यांसंबंधाने चार उदगार' तसेच 'मराठी भाषेची विचिकित्सा,' वि.ल.भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथाला नवीन पुरवणी जोडताना डॉ.शं.गो.तुळपुळे यांनी केलेले प्रतिपादन आदि पुरावे बघता मराठी भाषेचे वय २००० वर्षांपेक्षा अधिक असल्याचे स्पष्ट होते.

डॉ. कृ.पां.कुलकर्णी यांच्या उपरोक्त ग्रंथाच्या आधारे किंवा रा. भि. जोशी यांच्या 'मराठी भाषेची घटना' या ग्रंथाच्या आधारे मराठी भाषेच्या वयाबाबत ठाम विधाने करता येतात. या भाषेला किमान २००० वर्षांचा ज्ञात इतिहास आहे,असे ठामपणे म्हणता येते.

### ३५. गुणाढ्याची बृहत्कथा :

“गुणाढ्याच्या पैशाची भाषेतील २००० वर्षापूर्वीच्या बृहत्कथेवरून सोमदेवाने अकराव्या शतकात संस्कृत भाषेत 'कथासरित्सागर' हा ग्रंथ निर्माण केला. बृहत्कथा हा रामायण महाभारतानंतरचा तिसरा सर्वश्रेष्ठ भारतीय ग्रंथ मानला जातो. गुणाढ्याचा जन्म महाराष्ट्रातला होता. त्याने हा ग्रंथ जम्मू-काश्मीर भागात लिहिला. त्यावेळी पेशावर, जम्मू-काश्मीर, पंजाब या प्रांतात बोलली जाणारी पैशाची ही भाषा आज अस्तित्वात नाही. या ग्रंथाच्या ह. अ. भावेकृत पाच खंडांच्या मराठी अनुवादाला दुर्गा भागवत यांच्या पाच प्रदीर्घ आणि विवेचक प्रस्तावना लाभलेल्या आहेत. त्यात त्या म्हणतात, "गुणाढ्याच्या बृहत्कथेची तुलना रामायण आणि महाभारताशी करण्यात येते. प्राचीन भारतातल्या साहित्याचा एक विशेष असा आहे की, पुष्कळ ग्रंथ लुप्त झाले आहेत आणि असंख्य ग्रंथ केवळ खंडावस्थेतच आढळतात. अशा विलुप्त ग्रंथांत गुणाढ्याच्या बृहत्कथेचा समावेश होतो. बृहत्कथेसंबंधी उल्लेख अनेक जुन्या ग्रंथांत आढळून येतात. बृहत्कथेचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ संस्कृतात व प्राकृतात आहेत. हे ग्रंथ शैव व वैष्णव मतातून निघालेले आहेत आणि जैन मतातलाही ग्रंथ उपलब्ध आहे. तेव्हा भिन्न परंपरांना मान्य असलेला 'बृहत्कथा' हा एक प्राचीन लोकप्रिय ग्रंथ होता यात संशय नाही."

(ह. अ. भावे (भाषा.), पुणे, १९८०, पृ. ५ व ६)

"बृहत्कथेशी प्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ दोन आहेत. ते दोन्ही काश्मीरचे असून अकराव्या शतकात उपलब्ध झालेले आहेत. दोहोंची भाषा संस्कृत व मते शैव आहेत. पहिला जागतिक ख्याती पावलेला ग्रंथ हा सोमदेवाचा

'कथासरित्सागर' आणि दुसरा क्षेमेंद्राची 'बृहत्कथामंजिरी'. हे दोन्ही ग्रंथ श्लोकबद्ध असून त्याचे वृत्त अनुष्टुभ आहे. 'कथासरित्सागर'ची भाषांतरे युरोपीय भाषांमध्येही उपलब्ध आहेत. परंतु 'बृहत्कथा मंजिरी' चे इंग्रजीत एकच व तेही काही भागांचेच भाषांतर झालेले आहे. अकराव्या शतकात सोमदेव शर्मा या काश्मीरचा राजा अनंत याच्या पदरी असलेल्या कवी पंडिताने अनंत राजाची राणी सूर्यवती हिला रिझवण्यासाठी पैशाची भाषेत त्याकाळी उपलब्ध असलेल्या बृहत्कथेवरून संस्कृतामध्ये 'कथासरित्सागर' ची रचना केली. आपण हा ग्रंथ गुणाढ्याच्या बृहत्कथेवरून रचला आहे, ही गोष्ट सोमदेवाने ग्रंथारंभीच सांगून गुणाढ्याचे चरित्रही सांगितले आहे" असेही दुर्गा भागवत म्हणतात.

(ह. अ. भावे (भाषा.), पुणे, १९८०, पृ. ७)

बृहत्कथा या ग्रंथाबद्दल डॉ. केतकर म्हणतात, "पैशाचीतील मुख्य विश्रुत ग्रंथ म्हटला म्हणजे बृहत्कथा होय. तो कुरुयुद्धोत्तर इतिहासाचा संरक्षक आणि त्याबरोबर इतिहास विपर्यासाचा संरक्षक आहे. बृहत्कथेत प्रतिष्ठान कथा, दक्षिणापथ कथा व कुंडिनपूर कथा येत असल्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासास त्या संग्रहाचा उपयोग करणे प्राप्त झाले. वररुचीची महाराष्ट्री बुद्धपूर्व आहे आणि वररुचीचे व्याकरण पाली किंवा अर्धमागधी या भाषांच्या उदयापूर्वीचे आहे, असे आमचे मत आहे. त्या काळात महाराष्ट्री भाषा प्रगल्भ झाली होती आणि प्राकृत भाषांत तीच प्रमुख होती, हे स्पष्ट आहे." (श्री.व्यं.केतकर,पुणे (१९३५), १९८९ पृ.१० ते ११) ते पुढे असेही म्हणतात की, “महाराष्ट्री भाषा वररुचीच्या काळी होती आणि ती संवर्धित झाली होती. महाराष्ट्राची स्वतंत्र भाषा अगोदर दोन-तीनशे वर्षे तरी विकसित होत असली पाहिजे, म्हणजे ख्रिस्तपूर्व पहिल्या सहस्रकाच्या पूर्वीच, म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात महाराष्ट्राच्या आद्यविकासाचा काळ जातो.

या भाषेच्या नावास कारण झालेले जे महार आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीयीकरण खिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात झाले असावे, असे दिसते. अश्मक राजा कुरुयुद्धात पडला आणि कुरुयुद्धापासून अश्मकांचे सातत्य आहे, तर महार आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीयीकरण आणि अश्मक राजाचे सातत्य याची संगती लावण्याचा प्रयत्न अवश्य होतो. अश्मक राज्य सुरू होण्यापूर्वीच महारांच्या देशात रठ्ठांचा प्रसार होऊन महाराष्ट्र बनले असावे आणि त्यांच्या संयुक्त जनतेत अश्मक राजकुल उत्पन्न झाले असावे, असाच इतिहास असावा असे दिसते."

(श्री.व्यं.केतकर,पुणे (१९३५), १९८९ पृ.१० ते १३)

**३६. <u>राजारामशास्त्री भागवत :</u>**

**(३०)** राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक साहित्य दुर्गा भागवत यांनी संपादित केले असून त्याचा पहिला खंड 'मऱ्हाठ्यासंबंधाने चार उदगार' यात महाराष्ट्राची जडण घडण, मराठीचे वय आणि महाराष्ट्री भाषा यावर विस्तृत प्रकाशझोत टाकलेला आहे. राजारामशास्त्री भागवत म्हणतात, "महाराष्ट्र हा शब्द बराच जुनाट आहे. नंदाचे राज्य मगध देशावर असता म्हणजे शालिवाहन शकाचे पूर्वी सुमारे सव्वा चारशे वर्षे वररुची नावाचा विद्वान झाला. त्याने प्राकृत प्रकाश नावाचे प्राकृत भाषेचे म्हणजे संस्कृत नाटकातील बालभाषेचे व्याकरण केले आहे. त्या व्याकरणाचे अगदी शेवटचे सूत्र **'शेषं महाराष्ट्रीवत्'** हे होय. अशोकाने महाराष्ट्र देशात धर्मोपदेश करण्यासाठी काही बौद्ध भिक्षू पाठवले होते, अशी बौद्ध लोकांतही दंतकथा आहे. नंदाच्या नंतर चंद्रगुप्ताने राज्य केले. चंद्रगुप्ताच्या पाठीमागे त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर बसला व बिंदुसाराच्या मागून त्याचा

मुलगा प्रियदर्शी किंवा अशोक यास गादी मिळाली. तेव्हा चांगला बावीसशे वर्षांचा मरहट्ठ किंवा महाराष्ट्र शब्द आहे असे म्हणण्यास हरकत नाही".

(दुर्गा भागवत (संपा.), पुणे १९७९, पृ.७ व ८)

ते पुढे म्हणतात "शूरसेन म्हणजे मथुरामंडळ या प्रांताची जी पूर्वीची भाषा ती शौरसेनी. उच्च जातीच्या व कुलीन बायका जी भाषा प्राचीन काळी नाटकात बोलत ती हीच शौरसेनी. नाटक म्हटले म्हणजे लोकस्थितीचे हुबेहुब चित्र होय. तेव्हा संस्कृतात नाटके ज्यावेळी होऊ लागली त्यावेळी कुलीन व वरिष्ठ जातींच्या बायकांची भाषा शौरसेनी होती, याविषयी काही संशय नको. या शौरसेनी भाषेची एक प्रकृती जशी संस्कृत तशीच दुसरी प्रकृती महाराष्ट्री ऊर्फ अतिप्राचीन मऱ्हाठी, असे कात्यायन म्हणतो. शौरसेनीपासून मागधी व पैशाची नावाच्या बालभाषा निघाल्या. मगध म्हणजे गयेच्या व पाटण्याच्या आसपासचा मुलुख. या देशाची जी पूर्वीची भाषा ती मागधी. पंजाब वगैरे प्रांतात राहणाऱ्या लोकांचे पिशाच हे प्राचीन नाव दिसते. बाल्हीक म्हणजे बल्क. बुखारा व समरकंद वगैरे ठिकाणचे लोक, ही सर्व पिशाचांची संतती, असे कर्णपर्वात लिहिले आहे. या लोकांची पूर्वीची भाषा पैशाची. शौरसेनीपासून मागधी व पैशाची निघाल्या व शौरसेनेची प्रकृती जशी संस्कृत तशीच मऱ्हाठी, असे कात्यायन म्हणतो. तर मग सर्व बालभाषांचे मूळ प्राचीन मराठी असा सिद्धांत केल्यास काहीच प्रत्यवाय नाही. गाथांची भाषा महाराष्ट्री असे आलंकारिक म्हणतात. गाथा शब्द आलेल्या गै धातूपासून. गाथा शब्दाने प्राय: आर्या किंवा गीति संस्कृतात समजली जाते. या आलंकारिकांच्या नियमावरून गाण्याची भाषा प्राचीन काळी महाराष्ट्रीच होती असे म्हणावे लागते. तेव्हा सर्व बालभाषांची प्रकृती व गाणी प्राचीन काळची ज्या भाषेत, अशी एक

प्राचीन मऱ्हाठी भाषा होय...... शौरसेनीची प्रकृती संस्कृत हे तर कात्यायनाने प्रकरणाच्या आरंभीच सांगितले आहे. असे असता अखेरीस ‘शेषं महाराष्ट्रीवत्’ असे कात्यायन (वररुची) पुन्हा म्हणतो, त्यापक्षी महाराष्ट्री व संस्कृत या दोहोंची परस्परनिरपेक्षता त्यास इष्ट होती असे दिसते."

(दुर्गा भागवत (संपा.), पुणे १९७९, पृ.११ व १२)

राजारामशास्त्री भागवत पुढे असेही म्हणतात, “संस्कृत भाषा पडली धर्माची, अर्थात धर्मप्रसार करणे हातात असलेल्या ब्राह्मणांची. ती काही सर्वसाधारण भाषा नव्हती पण, पाअड भाषा पडली वाहत्या पाण्याप्रमाणे. ते सर्वांचे जीवन. तेव्हा सर्वांचाच संबंध तिच्याबरोबर. सहजच तीस पाअड म्हणजे सर्वास समजण्यासारखी, असे अन्वर्थक नाव मिळाले व धर्मभाषेचे संस्कृत म्हणजे थोड्याशा विद्वान ब्राह्मणांनी मिळून आपल्या बुद्धिप्रभावाने तकतकी आणलेली, असे ब्राम्हणांनीच नाव पाडले. काही काळाने संस्कृत या शब्दाबरोबर मेळ दिसावा म्हणून पाअड शब्दाचे प्रकट रूप न करता प्राकृत असे रूपांतर केलेले दिसते. मूळचा शब्द पाहू गेले असता ‘पाअड’ होय. ‘पाअड’ भाषा म्हणजे प्रकट भाषा. अर्थात सर्व लोकांचा व्यवहार व दळणवळण जीत चालते ती पाअड भाषा पडली वाहत्या पाण्याप्रमाणे. ते सर्वांचे जीवन तेव्हा सर्वांचाच संबंध तिच्याबरोबर. सहजच तीस ‘पाअड’ म्हणजे सर्वांस समजण्यासारखी असे अन्वर्थक नाव मिळाले, त्यामुळे प्राकृत हा शब्द संस्कृतात दररोज पाहण्यात येणारे, अर्थात ‘क्षुल्लक’ या अर्थाचा वाचक झाला.

‘शिक्षा’ म्हणून वेदाचे एक अंग आहे. त्यात ‘प्राकृते संस्कृते चापि’ (प्राकृत भाषेत व संस्कृत भाषेत) असा उल्लेख आला आहे. त्यापक्षी प्राचीन काळीही

‘प्राकृत’ ही स्वतंत्र भाषा समजण्याचा संप्रदाय पुष्कळ दिवसांपासून होता, हे उघड होय. तेव्हा महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची या सर्व जितक्या पाअड भाषा होत्या, तितक्या प्राकृत झाल्या व या प्राकृत भाषांचे प्राकृतप्रकाश नावाचे सूत्रमय व्याकरण कात्यायनाने पहिल्यांदा लिहिले. वर लिहिलेल्या चारही भाषा या पाअड भाषा. इतकेच, की सर्वात प्राचीन व सर्वांची प्रकृती महाराष्ट्री ऊर्फ प्राचीन मऱ्हाठी. महाराष्ट्रीपासून निघाली शौरसेनी. शौरसेनीपासून कालांतराने मागधी व पैशाची या दोन भाषा निघाल्या. तेव्हा मागधी व पैशाची ही दोन्ही प्राचीन मऱ्हाठीची नातवंडे होत. शौरसेनीची खरी आई म्हटले म्हणजे एकटी प्राचीन मऱ्हाठी भाषा होय."

(दुर्गा भागवत (संपा.), पुणे १९७९, पृ. १२, १३)

पूर्वी भारतभर प्राकृत भाषा बोलल्या जात होत्या हे सर्व अभ्यासकांना मान्य आहे. महाराष्ट्री प्राकृत ही भाषा जुनी आहे हेही मान्य आहे. केतकर आणि राजारामशास्त्रींनी मराठीचे वय सुमारे अडीच हजार वर्षे ठरवलेले आहे.

आजही आपण 'आंबा पाडाला आला' असेच म्हणतो, म्हणजे आंबा दिसायला लागला. लोकजीवनात दिसणारी, वापरली जाणारी, खळाळत्या पाण्यासारखी आपली भाषा ती पाअड भाषा होय. या ‘पाअड’ वरून ‘प्राकृत’ हा शब्द तयार झाला. महाराष्ट्री भाषा ही प्राकृत असल्याचे सांगितले जाते. खरे तर ही जुनी मराठी होय. जिला अपभ्रंश भाषा म्हटले जाते ती मध्यकाळातील मराठी असून चक्रधर, ज्ञानेश्वर, मुकुंदराजांची मराठी ही अर्वाचीन आणि समृद्ध मराठी होय.

## ३७. यज्ञात महाराष्ट्रीला मज्जाव :

संस्कृत ही धर्मग्रंथांची भाषा होती. पंडितांची, मंत्रांची आणि धार्मिक वादविवादाची तसेच धर्मग्रंथांची भाषा होती. पण ते पंडितही घरात महाराष्ट्रीच बोलायचे, म्हणूनच यज्ञाच्या काळात यज्ञमंडपात ती बोलायला बंदी घातल्याचे आदेश दिलेले दिसतात.

अनेक पुराव्यांवरून मराठी ही संस्कृत भाषेपासून जन्माला आली नसून ती संस्कृतइतकीच जुनी भाषा आहे असे केतकर व भागवतांनी दाखवून दिलेले आहे. मराठी ही संस्कृतची मुलगी नाही. संस्कृतची ती बहीणच ठरते. दुर्गा भागवतांनी राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना म्हटले आहे की, "जुनी महाराष्ट्री ही संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे." (दुर्गा भागवत (संपा.), पुणे १९७९, प्रस्तावना पृ.२) संस्कृतचे तज्ञ राजारामशास्त्री आणि मराठी व लोकसाहित्याच्या विदुषी दुर्गाबाई भागवत यांचे हे मत आणि निष्कर्ष मराठीचे वय ठरवण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत.

## ३८. मराठी लोकांची संस्कृती :

इरावती कर्वे आपल्या 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात म्हणतात, "पश्चिमेकडील शक व महाराष्ट्रातील सातवाहन येण्याच्या आधीच महाराष्ट्राच्या भूमीत संस्कृत वा संस्कृतोद्भव भाषा दृढमूल झाली होती व म्हणून बाहेरून आलेल्या राजांनी द्राविड भाषा न उचलता महाराष्ट्री (संस्कृत प्राकृत अवतार) आत्मसात केली." (इरावती कर्वे, पुणे, १९६२,पृ.२०३) त्या पुढे म्हणतात, "सर्व भारताची संस्कृती ज्या काव्यामध्ये साकारली ते वैदर्भी रीतीत होते. यावरून विदर्भाचे संस्कृत परंपरेमधील स्थान लक्षात येते. जसा अपरान्त

त्याचप्रमाणे विदर्भही अति प्राचीन आर्य (संस्कृत बोलणाऱ्यांची) वसाहत होती. दोन्हीही वसाहती द्राविडांशी लढा न देता उभारल्या गेल्या होत्या. पहिल्या प्रख्यात वैदर्भीचे नाव लोपामुद्रा आहे. हे नाव आर्य नव्हे, ते लोपामुंडा ह्याचे तर रूप नव्हे ना? मुंड लोकांची राजकन्या लोपा असा त्याचा अर्थ होईल. मुंडांचा नागांशी संबंध होता, त्याबद्दल बौद्ध वाङ्मयात पुरावा सापडतो.

कोसलाचा राजा पसेनदी ह्याच्या मनात गौतम बुद्धाच्या घराण्यात लग्न करून बुद्धाचे नातेवाईक व्हावे असे होते. वासभ खत्तिया यांच्या विवाहातून जन्मलेल्या विदुडभ याने सर्व शाक्य कुळाचा नाश केला, ही कथा पाली वाङ्मयात सांगितली आहे. इ.स. पूर्व ५००ते ६०० वर्षांची ती कथा आहे. म्हणजे त्यावेळी नाग व मुंड एक असावेत असे दिसते."

इरावती कर्वे यांनी पुढे या संदर्भात अधिक माहिती देताना म्हटले आहे की, "महाराष्ट्राचे राजे सातवाहन यांनी प्रतिष्ठान ऊर्फ पैठण येथे राज्य केले. प्राकृत भाषेला उत्तेजन दिले व पर्यायाने मराठीच्या जन्माला मदत केली. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व संतकवींचा जन्म मध्य महाराष्ट्रात झाला; व हल्लीच्या मराठीचे स्वरूप त्यांनी निश्चित केले. ह्या प्रदेशाला जुने नाव अश्मक असे आहे. अश्मकाचे सर्वात प्रसिद्ध राजे म्हणजे प्रतिष्ठानचे सातवाहन. त्यांच्या आधी प्रतिष्ठानला नरसिंह नावाचा राजा होता, असा उल्लेख सोमदेवाच्या कथासरित्सागरात सापडतो. त्या कथेबद्दल श्री. व्यं. केतकरांनी प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात लिहिले आहे.... सातवाहनांना संस्कृत माहीत नव्हते, त्यांनी प्राकृताला आश्रय दिला. महारठी नावाच्या मांडलिक राजांशी लग्नसंबंध जोडला, असे दंतकथा व शिलालेखांवरून दिसते.

(इरावती कर्वे, पुणे, १९६२,पृ. २१५ व २१६)

त्या पुढे म्हणतात की, “सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव ह्या घराण्यांनी महाराष्ट्रावर एकामागून एक राज्य केले. महाराष्ट्रातील बुद्ध लेणी सातवाहनांच्या व वाकाटक आणि चालुक्यांच्या कारकीर्दीतील आहेत. त्यांतील सर्व लेख प्राकृतातील आहेत. लीलावती ह्या अपभ्रंश भाषेत लिहिलेल्या काव्यात सुप्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन हा हालाचा मित्र व हितोपदेशक होता असे म्हटले आहे. ....त्यांच्या संबंधी रठ्ठ आणि महारठ्ठ ह्यांची नावे शिलालेखात येतात. ह्यांचे प्रमुख शिलालेख पश्चिम महाराष्ट्रातच आहेत. ... आंध्र व कर्नाटक अशा दोन संस्कृतिसंपन्न राष्ट्रांशी बरोबरी करून मराठीने आपल्या दक्षिण सीमा पक्क्या केल्या. एवढेच नाही, तर मराठी भाषा कर्नाटकाच्या गाभ्यापर्यंत पोहोचली, ह्याला अनेक सांस्कृतिक कारणे आहेत. प्रख्यात सूत्रकार बौद्धायन व आपस्तंब दाक्षिणात्य होते. बृहत्कथेत अपाणिनीय अशा ऐन्द्रादी व्याकरणांचा उल्लेख येतो. ती दाक्षिणात्यांनी रचलेली होती असे दिसते. चालुक्य व राष्ट्रकूट दोघेही जैनानुयायी होते व त्यांच्या आश्रयाखाली पुष्कळ महत्त्वाचे जैन ग्रंथ महाराष्ट्रात लिहिले गेले. पुष्पदंताचे हरिवंशपुराण, राष्ट्रकूट राजांच्या अमदानीत मान्यखेड (मालखेड) येथे रचले गेले. कर्नाटकाच्या गाभ्यात महाराष्ट्री भाषेत ग्रंथनिष्पत्ती राजाश्रयाने होत होती असे स्पष्ट दिसते. ... श्रवणबेळगोळचा शिलालेख मराठ्यांच्या आक्रमक राजसत्तेचे प्रतीक नसून जैनांच्या धर्म-प्रसाराचे आहे. ...मध्ययुगातही भाषेच्या बाबतीत जी महाराष्ट्री, तिचे वर्चस्व दक्षिणेत होते व तीत उत्तम ग्रंथांची उत्पत्ती होत होती.”

(इरावती कर्वे, पुणे, १९६२,पृ. २१८ व २२१)

इरावतीबाई कर्वे यांनी पुढे असेही म्हटले आहे की, "कोऊहल कवीने रचलेल्या 'लीलावती' काव्यात तो स्वत:चे काव्य मरहट्ठ देशीत लीहिल्याचे सांगतो. काव्याचा काळ सुमारे ख्रिस्ताब्द ८०० असावा, असे तज्ज्ञांचे मत आहे. ... सातवाहन हे राजाचे नाव ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांपासून तो थेट सप्तशतीच्या हालापर्यंत आढळते. ह्यांतील एका सातवाहनांची (ख्रिस्तपूर्वीच्या सातवाहनाची) राणी पंडिता होती. जी राजाजवळ विनोदाने जे संस्कृत बोलली ते राजाला कळले नाही. म्हणून ती हसली व राजा अपमानित होऊन निघून गेला. राजाने सहा महिन्यात भाषा शिकण्याचा निश्चय केला व जी भाषा तो शिकला ती प्राकृत, हा कथाभाग बृहत्कथेच्या आरंभी येतो व त्यात वररुचीचे नाव प्रामुख्याने येते. ... मराठी वाड्.मयाच्या प्रौढत्वाची स्वयंसिद्धतेची बीजे ही ह्या प्राकृत वाङमयात आहेत. बृहत्कथेला जगातील कथावाङ्मयात तोड नाही.... हालाच्या सप्तशतीतील काव्यही लोकवाङ्मय आहे. कुठल्यातरी राजाच्या राजकवीने केलेले ते काव्य नसून महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या लोकप्रिय काव्याचे ते संकलन आहे. त्यात राजांच्या दरबाराचे चित्रण नसून गावगाड्याचे, पाटलाचे, पाटलाच्या सुनेचे म्हणजेच महाराष्ट्राच्या साध्या ग्रामीण जीवनाचे चित्र पाहावयास मिळते. लीलावती ही अद्भुतरम्य कथा हाल राजाबद्दल आहे. त्यातही महाराष्ट्राचा प्राण जे प्रतिष्ठान नगर व तेथील गोला उर्फ गोदावरी नदी व तीत नहाणाऱ्या, अंगाला हळद फासणाऱ्या महाराष्ट्र सुंदरीचे वर्णन आढळते. हा कवी आपल्या भाषेला 'मरहट्ठ देशी भाषा' असे नाव देतो."

(इरावती कर्वे, पुणे, १९६२,पृ. २२४-२२६)

### ३९. डॉ.शं.गो.तुळपुळे :

विनायक लक्ष्मण भावे यांनी लिहिलेल्या महाराष्ट्र सारस्वत या ग्रंथाच्या खंड-२ च्या पुरवणीमध्ये संपादक, डॉ.शं.गो.तुळपुळे मराठी भाषेची मूळपीठिका सांगताना म्हणतात "अतिप्राचीन, म्हणजे भारतपूर्व काळात या देशाचे आर्यावर्त व दक्षिणापथ असे दोन भाग असून त्यात अनुक्रमे आर्य व द्रविड लोक राहत आणि आर्योत्पन्न व द्राविडी भाषा बोलत, हे मत स्थूलमानाने सर्वमान्य आहे. पैकी दक्षिणापथांतील द्रविडांचा समाज एकविध नसून त्यात महार, मांग, भिल्ल, कातकरी, कातोडी, वारली, कोळी इत्यादी विविध जाती समाविष्ट होत्या. दक्षिणापथांतील या बहुरंगी समाजावर आक्रमण करून तुलनेने उच्च अशी आपली संस्कृती त्यावर लादण्याचा पहिला प्रयत्न उत्तरेकडून खाली सरकणाऱ्या नाग लोकांनी केला, व तो पाणिनिपूर्वकाळात, म्हणजे ख्रिस्तावतारापूर्वी सुमारे १००० वर्षे मागे झाला असे राजवाडे प्रभृति विद्वानांचे मत आहे.

"हे नाग लोक मुख्यत: पश्चिम समुद्रपट्टीवर स्थायिक झाले व तेथे त्यांनी आपल्या स्वतंत्र वसाहती केल्या असे काही प्राचीन उल्लेखांवरून व विद्यमान अवशेषांवरून वाटते. पाताल, रसातल, महीतल इत्यादी प्रदेशांचा मिळून नागदेश बनतो, हा 'नागानंद' नाटकातील उल्लेख या दृष्टींने महत्त्वाचा आहे. या नागकुलाच्या नावाची ओळख अजूनही काही व्यक्तिनामे व ग्रामनामे यातून मिळू शकते. हा नागवंश आर्य नसून द्रविडांचाच एक दूरत: संबद्ध असा वंश असावा असे वाटते. कारण नागांची संस्कृती द्रविडांहून थोडी निराळी असली तरी त्यांची भाषा द्राविडी भाषांच्या वंशांतीलच असणार. एरव्ही नागांची सांस्कृतिक छाया जशी दक्षिणापथावर पडली तशी त्यांच्या भाषेचीही छाया आर्येतर भाषांवर पडून त्या भाषिक देवघेवींतून एखादी नवभाषा निर्माण होण्यास प्रत्यवाय नव्हता. परंतु

तसे झालेले दिसत नाही. परस्थ नागलोकांच्या साहचर्यांने महाराष्ट्री भाषेचे अपभ्रंशात रूपांतर झाले, हे राजवाडे यांनी मांडलेले मत त्यास कोणताही आधार नसल्याने स्वीकारता येत नाही.”

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६३९ ते ६४०)

तुळपुळे पुढे म्हणतात की, “दक्षिणापथातील दुसरी परकीय वसाहत पाणिनीच्या उत्तरकाळात, म्हणजे इ.स. पूर्वी आठव्या शतकानंतर झाली व ती उत्तरेकडील आर्यांनी विंध्य पर्वत ओलांडून येऊन केली. यासंबंधी डॉ. केतकर यांचे मत निराळे असून महाराष्ट्रांतील, म्हणजे दक्षिणापथातील, आर्यांचा वसाहतकाल पुराणांच्या आधारे फार मागे, म्हणजे वेदकाळात नेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, परंतु या मतास ऐतिहासिक प्रामाण्य नसल्याने तूर्त ते बाजूस ठेवणे भाग आहे. शिवाय ख्रिस्तपूर्व ८०० च्या पाणिनीय सूत्रात दक्षिणापथाचा उल्लेख मुळीच येत नाही व त्यानंतर तीनशे वर्षांनी कात्यायनाने रचिलेल्या वार्तिकात अशा प्रकारचे उल्लेख पाणिनीय सूत्रास पूरक म्हणून येतात. याचा अर्थ असा की, आर्यांची दक्षिणेकडील वसाहत पाणिनीनंतर व कात्यायनापूर्वी, म्हणजे इ.स. पूर्वी ७०० च्या सुमारास झाली असली पाहिजे. हा काळ म्हणजे बुद्धयुगाचा आरंभ होय, व त्या काळी झालेल्या धार्मिक क्रान्तीमुळे उत्तरस्थ आर्य चहुकडे पांगणे अगदी संभवनीय आहे. त्यांची दक्षिणेतील वसाहत हीही एका अर्थाने पांगापांगच होती व म्हणून ती एका ठिकाणी न होता पाचसहा ठिकाणी विभागून झाली. गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र, अपरान्त, विदर्भ व अश्मक ही एकूण सहा राष्ट्रे आर्यांनी दक्षिणेत वसविली व त्या सर्वांचे मिळून पुढे महाराष्ट्र बनले.

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४०)

तुळपुळे पुढे म्हणतात, “दक्षिणापथ या नावाने सूचित होणाऱ्या प्रदेशाचे व त्यातील काही भागांचे उल्लेख पुरातन काळापासून मिळतात. कौटिल्याचे अर्थशास्त्र, कात्यायनाचे व्याकरण, बौद्धायनस्मृति, सुत्तनिपात व महावंश यासारखे बौद्ध ग्रंथ, नाणेघाट व जुन्नर येथील प्राचीन शिलालेख, पेरीप्लससारखे ग्रीक भूगोलतज्ञ, फाइहानसारखे चिनी प्रवासी इत्यादी अनेक साधनातून विखुरलेल्या या उल्लेखांचे संकलन महामहोपाध्याय डॉ.पां.वा.काणे व डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी केले असून जिज्ञासूंनी ते मुद्दाम पहावे.

महाराष्ट्राचा प्राचीनतम परंतु अप्रत्यक्ष उल्लेख खिस्तशकारंभी रचिलेल्या वररुचीच्या प्राकृत व्याकरणात मिळतो. वररुचीने ‘महाराष्ट्री’ हे त्या प्रदेशातील प्राकृत भाषेचे नाव दिले आहे. देशावरून भाषेला नाव पडते. यानंतरचा उल्लेख शकनृपति श्रीधरवर्मा याच्या चौथ्या शतकातील (इ. स. ३६५) एरण येथील स्तंभलेखात सापडतो. (डॉ. मिराशी,संशोधन मुक्तावली, १.१५९) त्यात श्रीधरवर्मा याचा सेनापती सत्यनाग आपणास 'महाराष्ट्रेन' म्हणजे महाराष्ट्रीय म्हणवितो ("सेनापति सत्यनागेन ... प्रमुखेन महाराष्ट्रेन.. ") हा लेख असलेली यष्टी त्याने एरण येथे धारातीर्थी शयन केलेल्या नाग सैनिकांच्या स्मरणार्थ उभारली होती असे दिसते. यावरून आणखीही एका गोष्टीचा उलगडा होतो. महाराष्ट्रात प्राचीन काळी हट्टि किंवा हाट लोकांची वस्ती असल्यामुळे त्यांच्या देशाला हट्टदेश असे नाव मिळाले व 'मरहट्ट' या शब्दातील 'हट्ट' या घटक शब्दाने वरील हट्टि लोक सूचित होत, अशा अर्थाचे एक मत श्री. शं. बा. जोशी (मऱ्हाटी संस्कृति, प्र. १) यांनी अलीकडे मांडले आहे. त्याचे खंडन करताना डॉ. मिराशी यांनी वरील एरण लेखातील सेनापती सत्यनाग व ज्यांच्या स्मरणार्थ त्याने या लेखाची शिला

उभारली ते नाग सैनिक यांच्या आधारे प्राचीन महाराष्ट्रात वस्ती हाटांची नव्हे, तर नागांची होती हे समर्पकपणे दाखवून दिले आहे (संशोधन मुक्तावली, २.१९७).

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४० ते ६४१)

## ४०. दीपवंश व महावंश :

**डॉ.तुळपुळे पुढे म्हणतात की,**

“महाराष्ट्राचा यानंतरचा निर्देश 'महावंसो' मध्ये येतो. हा ग्रंथ पाचव्या शतकातील असून त्यात मोगलिपुत्त तिष्य याने काही 'थेर' म्हणजे श्रेष्ठ धर्मोपदेशक निरनिराळ्या देशांना पाठविल्याचा उल्लेख आहे.

“रक्खितथेरं वनवासिं योनक धम्मरक्खित थेरं अपरंतकं महाधम्मरक्खित थेरं महारठ्ठ ”

'महारठ्ठ' देशात 'थेरोमहाधम्मरखिता' यास पाठविले असे त्यात म्हटले आहे ('महावंसो', १२).

पुढे वराहमिहिराने 'बृहत्संहिते'त महाराष्ट्रीयांविषयी 'भाग्ये रसविक्रयिण: पण्यस्त्रीकन्यका महाराष्ट्र:' असे म्हटले आहे. (बृहत्संहिता १०.८) ऐहोळे शिलालेखात (इ.स. ६३४) सत्याश्रय पुलकेशी (चालुक्य) हा तीनही महाराष्ट्रांचा सार्वभौम राजा झाल्याचा उल्लेख आढळतो (एपि. इं. ६.४). या लेखातील त्रि-महाराष्ट्राची कल्पना पुढे १५ व्या शतकात 'तीन भाग मऱ्हाट' या शब्दात गुर्जर शिवबास या महानुभाव ग्रंथकारानेही मांडली आहे. प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएन त्संग (इ. स. ६२९ ते ६४५) महाराष्ट्रास 'मोहोलाश' असे संबोधून त्याविषयी विस्ताराने लिहितो (BG, I, २, १८४)- वात्स्यायन, वररुची व दंडी यांनी केलेले

महाराष्ट्राचे उल्लेख प्रसिद्धच आहेत. तात्पर्य, महाराष्ट्र हे देशनाम म्हणून खिस्ती शकाच्या प्रारंभापासून तरी प्रचारात होते यात काही शंका नाही."

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४१)

डॉ.तुळपुळे यांनी याबाबतचे प्रमाण देताना, तळटिपेत पुढील माहिती दिली आहे. "महार व महाराष्ट्र यांच्यातील संबंध सूचित करणारे पुढील वाक्य 'लीळाचरित्र' च्या एका पोथीत सापडते. 'तुझेया महाराचा महाराष्ट्र होउनि मीचि जातु असे.' वरील वाक्य महाराष्ट्राचा त्याग करताना मायिता हरीच्या तोंडी आहे (कोलते,श्रीचक्रधर चरित्र, परिशिष्ट १).

महानुभाव कवी डिंभ कृष्णमुनि तत्कालीन महाराष्ट्राचा विस्तार पुढीलप्रमाणे सांगतो:- "विंध्याद्रीपासौनि दक्षिण दिशेसी : कृष्णानदीपासौनि उत्तरेसी: झाडीमंडळापासौनी पश्चिमेसी : महाराष्ट्र बोलिजे :"

महाराष्ट्राच्या व्याप्तीचा विचार अलीकडे डॉ. माटे यांनी आर्थिक भूगोलाच्या दृष्टिकोणातून केला आहे. मध्ययुगाच्या अस्तापर्यंत एकेक संस्कृती नदीच्या आधाराने निर्माण झाली व दक्षिणेस, इंग्रजीत ज्यांना 'Nuclear areas' म्हणजे 'पायाभूत प्रदेश' म्हणतात असे चार परिसर स्वतंत्रपणे निर्माण झाले. त्यापैकी वर्धा-वैनगंगा - पैनगंगा हा एक आणि गोदाप्रवरा- भीमा हा दुसरा असे दोन प्रदेश खास मराठी संस्कृतीचे आधार होत. 'महाराष्ट्री असावे' असे सांगणाऱ्या चक्रधरांचे सर्व भ्रमण गोदातीरावर झाले व 'उभय गंगातीर' म्हणजे महाराष्ट्राचा गाभा या दोन गोष्टी वरील विचारसरणीला पोषक आहेत.

(भा.इ.सं.मं. त्रै. ५४. १-२)

अलीकडे श्री. शं. बा जोशी यांनी 'मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या' या ग्रंथात काही क्रांतिकारक शोध लावण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. जोशी यांचा मुख्य सिद्धांत असा, की आर्यपूर्व भारतातील हट्ट नावाच्या लोकसमूहाने नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत एक संस्कृती नांदविली; आजचे मराठे व कानडी लोक यांचे पूर्वजीवन अभिन्नत्वाने या संस्कृतीत पोसले गेले; नंतर आर्य दक्षिणापथात आल्यामुळे हट्टजनांच्या संस्कृतीचे आर्यीकरण सुरू केले व हळूहळू मराठी व कानडी लोकांची भाषा, दैवते व आचार यांचे द्वैत निर्माण होऊ लागले. हे द्वैत यादवकालापर्यंत पूर्ण झाले व सहोदर अशा मराठी - कानडी संस्कृतीमध्ये वेगळेपणाबरोबरच स्पर्धा व तेढही उत्पन्न झाली. हे निर्णय विवाद्य आहेत.

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४२ ते ६४४)

## ४१. महाराष्ट्र — व्युत्पत्ती :

तुळपुळे म्हणतात की, “महाराष्ट्र या नावाच्या व्युत्पत्तीविषयी विद्वानात जी अनेक मते आहेत त्यांपैकी तीन विशेष महत्त्वाची असल्याने त्यांची चर्चा करणे आवश्यक आहे. पैकी महार या अस्पृश्य जातीवरून 'महाराष्ट्र' हे नाव पडले असावे असा तर्क प्रथम मोल्स्वर्थने आपल्या शब्दकोशाच्या प्रस्तावनेत केला व त्यास पुढे 'गाव तेथे महारवाडा' या म्हणीचा आधार देऊन डॉ. जॉन विल्सनने पुष्टी दिली. गुर्जरांचे राष्ट्र ते गुर्जरराष्ट्र, शूरांचे राष्ट्र ते सौर - राष्ट्र, तद्वत महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र असा तौलनिक विचारही डॉ. विल्सनने पुढे मांडला. ही उपपत्ती महाराष्ट्रातील सर्वसाधारण सुशिक्षितास तर मानवली नाहीच; पण डॉ. भांडारकर, महामहोपाध्याय काणे यांसारख्या पंडितांनीही तिला विरोध केला. पण आश्चर्याची

गोष्ट ही की, अगदी अलीकडे डॉ. केतकर यांनी या उपपत्तीतील मुख्य कल्पना उचलून धरली असून महार व महाराष्ट्र ह्यांतील अन्योन्य संबंधास पुन्हा एकवार पाठिंबा दिला आहे. (प्राचीन महाराष्ट्र, प्र. ४, पृ. २४-३१). महार आणि रट्ठ या दोन जातिनामांचा संयोग होऊन 'महारट्ठ' असे रूप तयार झाले व 'महाराष्ट्र' हे त्याच रूपाचे संस्कृतीकरण होय, असे डॉ. केतकर यांचे अंतिम मत असून अप्रियता पत्करूनही त्यांनी ते स्पष्टपणे मांडले आहे.

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८, पृ.६४१-६४२)

तुळपुळे पुढे नमूद करतात की, "डॉ. भांडारकरांच्या मते महाराष्ट्राचे नामकरण राष्ट्रिक किंवा रट्ठ नावाच्या लोकांवरून झाले असून या मतास थोडेफार ऐतिहासिक प्रमाण मिळते ही गोष्ट खरी आहे. नाणेघाट, भाजे, कार्ले व कान्हेरी येथील शिलालेखात 'महारठिनो' व 'महारठि' अशी अनुक्रमे स्त्रीपुरुषवाचक विशेषणे आढळतात. नाणेघाट शिलालेख (Arch. SWI, ५.५९ ) क्र. ६ यात 'महारठिगणकहिरो' असा स्पष्ट उल्लेख आहे. भाजे व बेडसे येथील लेखातही अनुक्रमे 'महारठिस कोसकीपुतस विण्हुदतस' व 'महाभोय व बालिकाय महादेविय महारठिनिय' असे उल्लेख आढळतात. वरील सर्व उल्लेख देश व लोक यांचे वाचक आहेत, यात संशय नाही. प्रश्न त्यातील 'महारठि' या शब्दाच्या अर्थाविषयी आहे. तो शब्द जाती किंवा लोकवाचक असावा ही उपपत्ती व्यवस्थित बसते.

"त्यामुळे महामहोपाध्याय काणे यांना वरील मत मान्य नसून महाराष्ट्र या शब्दाचा दर्शनी अर्थ घेऊन 'महान् राष्ट्र ते महाराष्ट्र अशी उपपत्ती त्यांनी मांडली आहे (विविध ज्ञानविस्तार, वर्ष ४९). दक्षिणापथातील महाकांताराचे हळूहळू महा-

राष्ट्र झाले व मल्लराष्ट्र, गोपराष्ट्र, पांडुराष्ट्र इत्यादी लहान राष्ट्रे त्या महान राष्ट्रात सामावून गेली, अशी महामहोपाध्याय काणे यांची विचारसरणी आहे.

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४२)

याबद्दल अधिक चर्चा करताना डॉ.तुळपुळे पुढे असेही म्हणतात की, “महाराष्ट्रास महाराष्ट्र हे नाव कसे पडले या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे देता आले नाही, तरी वरील विवेचनातून एक गोष्ट स्पष्ट होते की, महाराष्ट्र हे अनेक राष्ट्रांचे मिळून बनलेले एक राष्ट्र असून विदर्भ, अश्मक व अपरान्त ही तीन त्यातील प्रमुख घटकराष्ट्रे होत. स्वदेशाची ही घडण पुढे अनेक शतके महाराष्ट्रीयांच्या मनात जाणीवरूपाने कायम होती असे दिसते. महानुभाव पंथातील चक्रधरोक्त सूत्रपाठाचा १५ व्या शतकातील एक भाष्यकार गुर्जर शिवबास ‘महाराष्ट्री असावें' या सूत्रावर लिहिताना, 'महंतराष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र' अशी व्याख्या करतो. हाच भाष्यकार पुढे 'गडीं सिडीं असावे' या सूत्रावर भाष्य करताना म्हणतो, "सेवट भणिजे श्रीन्नर जुन्नर कल्याण खांदार: तीन भाग मऱ्हाठ : तो सेवट - " इ. स. ६३४ मधील ऐहोळे लेखातही महाराष्ट्र हा तीन घटकांचा मिळून बनल्याचा उल्लेख आहे. ही घटकांची किंवा खंडांची कल्पना १७ व्या शतकातील 'आचारपध्दति' नामक महानुभाव ग्रंथातही जागृत दिसते. त्यातील उतारा असा-

"देश भणिजे खंडमंडळ : जैसें फलेंठाणापासौनि दक्षिणेसि : मऱ्हाठी भाषा जेतुला ठाइं वर्ते तेतुलें एक मंडळ : तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट : ऐसें एक खंडमंडळ : मग उभे गंगातीर तेंहि एक खंडमंडळ : आणि तयापासौनि मेघंकरघाट (मेहकर, जि. अकोला) तें एक खंडमंडळ : तयापासौनि आवघें वराड ते एक

खंडमंडळ : परि आवघीं मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे: किंचित् किंचित् भाषेचा पालट : भणौनि खंडमंडळें भणावीं " (नेने: चक्रधर - सिध्दांतसूत्रे, उपोद्धात, पृ. २).

वरील उतारा बारकाईने पाहिल्यास महाराष्ट्राचा क्षेत्रविस्तार, त्याच्या चतु:सीमा, त्यातील भाषाभेद व त्याची नामोपपत्ती इ. अनेक विषयांवर प्रकाश पडतो.”

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४२ ते ६४३)

भाषेची चर्चा करताना डॉ.तुळपुळे सप्रमाण प्रतिपादन करतात की, “महाराष्ट्राची भाषा ती मराठी. महाराष्ट्री — महारट्ठी — मरहट्ठी - मऱ्हाठी हे मान्य होण्यास प्रत्यवाय नसावा. महाराष्ट्री भाषा बोलणाऱ्या लोकांचा देश तो महाराष्ट्र ही मांडणी अधिक सयुक्तिक आणि स्वाभाविक वाटते. महाराष्ट्रात बोलली जाणारी 'प्रकृष्ट प्राकृत' म्हणजे महाराष्ट्री अशी व्याख्या प्रथम काव्यादर्शकार दंडी याने केली (का. १. ३४), व अलीकडे ग्रियर्सन व स्टेन कोनौ यांसारख्या आधुनिक भाषाशास्त्रज्ञांनी ती उचलून धरली. या महाराष्ट्री-प्राकृतापासून साक्षात मराठी भाषा जन्मली असे मत परवापरवापर्यंत रूढ होते. परंतु अलीकडे प्रसिद्ध झालेल्या जैन किंवा महाराष्ट्री अपभ्रंश भाषेतील ग्रंथांमुळे मराठीच्या पूर्वपीठिकेतील अपभ्रंशाचा एक नवीन दुवा उपलब्ध झाला आहे. इ.स. ४०० च्या सुमारास महाराष्ट्रीचा लोप होऊन तिचा जो अपभ्रंश महाराष्ट्रात सुरू झाला, तो महाराष्ट्री अपभ्रंश किंवा जैन-अपभ्रंश या नावाने ओळखला जातो. या अपभ्रंशातील धनपालकृत 'भविसयत्तकहा', पुष्पदंतकृत 'णायकुमारचरिउ' 'जसहारचरिउ' व 'महापुराण', मुनी कनकामरकृत 'करकण्डचरिउ' देवसेनकृत 'सावयधम्मदोहा' इत्यादी ग्रंथ प्रा. याकोबी, डॉ. गुणे, प्रो. हिरालाल जैन, डॉ. वैद्य प्रभृति विद्वानांनी

अलीकडे संपादित केले असून त्यावरून मराठी भाषेचे मूळ अजमाविण्याचे एक महत्त्वाचे साधन हाती आले आहे. वरील ग्रंथ दहाव्या शतकातील असले तरी त्यातील ग्रांथिक अपभ्रंश हा आजच्या मराठीच्या पूर्वीचा असल्याने तो महाराष्ट्री व मराठी यातील दुवा होवू शकतो.

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४३ ते ६४४)

ही चर्चा पुढे नेताना डॉ.तुळपुळे म्हणतात की, "महाराष्ट्रीचा हा अपभ्रंश भाषेच्या आंतरिक स्वभावास धरून इ. स. ४०० च्या सुमारास चालू झाला....... संस्कृत भाषेप्रमाणेच प्राकृत भाषाही जेव्हा व्याकरणादी नियमांनी ग्रांथिक स्वरूपात बद्ध झाल्या तेव्हा सर्वसामान्य लोकांच्या बोलीस जे रूप प्राप्त झाले तीच ही अपभ्रंश होय. महाराष्ट्रीचा महाराष्ट्रात जो अपभ्रंश इ. स. ४०० च्या सुमारास रूढ झाला त्याचा व मराठीचा सांगाडा तपासून त्यावरून मराठीचे मूळ निश्चित करणे योग्य होईल."

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ. ६४४)

कोणत्याही भाषेचा उत्पत्तिकाल निश्चित करण्याची साधने मुख्यत: दोन : एक म्हणजे ऐतिहासिक स्वरूपाचे उल्लेख व दुसरे म्हणजे प्राचीन ग्रंथ व ताम्र-शिलालेख. या दोन साधनांच्या आधारे मराठीचा मार्ग शोधीत कोठवर जाता येते ते पाहू. मराठीचा असा नव्हे, पण सर्वसाधारण देशी भाषांचा प्राचीनतम उल्लेख 'नारदस्मृती' त आढळतो. गुरु या शब्दाची व्याख्या करताना नारदस्मृती म्हणते

संस्कृतै:प्राकृतैर्वाक्यै:य: शिष्यमनुरूपत: ।
देशभाषाद्युपायैश्च बोधयेत् स गुरु: स्मृत: ॥

वरील व्याख्येत संस्कृत व प्राकृत या भाषांशिवाय देशभाषांचा स्वतंत्र उल्लेख असल्याने नारदस्मृतीच्या रचनाकाळी म्हणजे पाचव्या शतकात मराठीसम देशी भाषा अस्तित्वात आलेल्या होत्या असे अनुमान निघते. परंतु देशभाषा हा शब्द स्मृतिकाराने कोणत्या अर्थी योजिला आहे याविषयी निश्चित असे प्रमाण नसल्याने हा पुरावा निर्णायक नव्हे. देशभाषांचा दुसरा प्राचीन उल्लेख बाणभट्टाच्या 'हर्षचरिता' त आढळतो (उल्लास १). श्रीहर्षाने प्रवासास निघताना बरोबर इतर भाषांतील कवींप्रमाणे एक देशभाषाकवीही घेतला होता, असे इ. स. ७०० च्या सुमारास होऊन गेलेल्या बाणाने सदर ग्रंथात म्हटले आहे. याही ठिकाणी देशभाषा या शब्दाचा अर्थ स्पष्ट नाही. मराठी भाषेचा आणखी एक प्राचीन उल्लेख 'कुवलयमाला' या नावाच्या ग्रंथात मिळाला आहे. (अपभ्रंशकाव्यत्रयी) हा ग्रंथ उद्योतनसूरी याने इ.स. ७७८ मध्ये लिहिलेला असून त्यात अठरा देशी भाषांचा जो उल्लेख आहे त्यात ‘मरहट्ट’ भाषेचा निर्देश असून पुढे त्या त्या देशातील माणसांचे वैशिष्ट्य व त्यांच्या भाषेतील ठळक अशी लकबही सांगितली आहेत. शके ७०० च्या सुमारास मराठी भाषेस एक प्रकारचे विशिष्टत्व प्राप्त झाले असून तीत 'दिण्णले-गहिल्ले' अशी रूपे होत हे स्पष्ट होते.

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४५ ते ६४६)

आपल्या मांडणीचा अधिक सखोल पट मांडताना डॉ.तुळपुळे पुढे म्हणतात की, “यानंतर शके १०५१ मधील सोमेश्वरकृत 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थचिंतामणी' या नावाच्या ग्रंथात मराठी शब्दरूपेच केवळ नव्हे, तर मराठी पद्येही आढळतात. याच सुमारास, म्हणजे ११ व्या शतकात, विदर्भातील चांदा येथील दिनकरसिंग नावाच्या गोंड राजाने आपल्या मराठी भाषेचा पुरस्कार

केल्याचा उल्लेख त्या राजाच्या वंशावळीतून डॉ. डोळके यांनी सादर केला आहे (पेंडसे गौरव-ग्रंथ, पृ. १०१). या माहितीला चांदा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमधून पुष्टी मिळते (खंड-१, १९०९, पृ. ४०). पुढे ११ व्या शतकाच्या उत्तरार्धात यशश्चंद्र नावाच्या एका जैन पण्डिताने रचिलेल्या 'राजीमतीप्रबोध' या संस्कृत नाटकात एक मराठी भाषेतील उतारा आढळतो. या नाटकातील नायिका राजीमती ही असून तिच्या स्वरूपाचे वर्णन नाटककाराने एका 'महा-राष्ट्रिका' कडून करविले आहे. तो प्रसंग असा-

> "महाराष्ट्रिकमुखमीक्षते राजा। (अथ महाराष्ट्रिक:।) देव। चतुरांगुलाची जीहा[२] मी कांई सांघओ गोमटी, मुह[३] फाफट[४], निलाड[५], चापटु। अखंड याली ताहीची। वीणी काली। न छोटी न मोटी। वानि चांपाहूली नाहीं काइं ताहि तूली। नाहि[६] उंडी जाणउं सुखकरी कंडी बोलती मुहुरवाणी चालती सुजाणि राउल खरी रूडी[७] अमुतकरी इसी कुयडी[८]। ना पभूदं रूपेदुं जाणमि।......" (तृतीयोऽक:) (अर्थ- २.जिह्वा, ३.मुख, ४.रुंद,५.कपाळ ६.नाभी, ७.चांगली, ८.लहान विहीर)

वरील नाटकाची अलीकडे नकलेची एक प्रत बडोदे येथील जैन ज्ञानसंग्रहात असून दुसरी जुनी प्रत हेमचंद्राचार्य जैन ज्ञानमंदिर, पाटण (उत्तर गुजराथ) येथे आहे. यशश्चंद्राचा काल श्री.लालचंद गांधी यांच्या मते विक्रम संवताच्या १२ व्या शतकाचा उत्तरार्ध म्हणजे शके १०५० च्या आसपासचा असून वरील उताऱ्यातील मराठी भाषा स्पष्ट आहे.

(चिं. वि. जोशी : वि. विस्तार ५९.१२)

शके १२१२च्या सुमारास म्हणजे ज्ञानेश्वरीच्या रचनाकाळी मराठी भाषेची परप्रांतातही केवढी प्रतिष्ठा होती त्याचे एक गमक राइस यांच्या ग्रंथात मिळाले; ते असे-

“The college founded and endowed in १२९० A.D. by the Hoyasala minister Perumala at Mailangi (Tirumkudal-Narsipur,२७) deserves mention..........Provision was made in it for masters to teach Nagar, Kannad, Tigulu (Tamil) and Arya (Mahratti)”.

इ. स. १२९० मध्ये तामिळनाडूत मराठी भाषा शिकविण्याची सोय केली होती असे राईस म्हैसूर प्रांतातील मैलंगी येथील शिलालेखावरून सांगत आहेत. (एपि. कर्नाटिका ३.१४६) मराठीच्या प्राक्कालीन दिग्विजयाची ही एक निशाणीच होय.”

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४६ ते ६४७)

मराठीच्या जन्मखुणांबाबत डॉ.तुळपुळे यांचे असे मत आहे की, “आज उपलब्ध असणाऱ्या साहित्यात मुकुंदराजांचा ‘**विवेकसिंधू**’ हा मराठीतील प्राचीनतम ग्रंथ ठरतो व त्याचा रचनाकाल शके १११० असा आहे. सारस्वतकार म्हणतात त्याप्रमाणे, ‘**विवेकसिंधू**’ सारखे ग्रंथ ही भाषेच्या प्रारंभीची चिह्ने नसून ती तिची परिणत अवस्था होय, व या दृष्टीने पाहता मुकुंदराजापूर्वी काही शतके मराठी भाषेत ग्रंथरचना होत असावी हे त्यांचे म्हणणे मनास पटते. दुर्दैवाने मुकुंदराजपूर्व वाङ्मय अद्यापि सापडलेले नाही व ज्या **वैद्यकादी** बाडांचा उल्लेख
श्री. भावे करतात, त्यांचा रचनाकाल ठाऊक नसल्याने अभ्यासाची साधने म्हणून ती निरुपयोगी होत.”

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४७)

हे मत अलीकडे त्याज्य ठरले असून विवेकसिंधू हा आद्य ग्रंथ नसून १४ व्या-१५ व्या शतकातला ठरतो. (पहा ह.श्री.शेणोलीकर, "प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप").

## ४२. <u>'साळैचे घर मेणाचे' :</u>

मराठी लोककथांच्या आधारे मराठीच्या मुळांची चर्चा करताना डॉ.तुळपुळे पुढील माहिती देतात "मराठीच्या प्राचीन स्वरूपाची खरी चाहूल पुरातन कालापासून चालत आलेल्या लोकवाङ्मयात किंवा folklore मध्येच लागू शकेल. समाजात परंपरेने चालत आलेल्या कथा, कहाण्या, गाणी, म्हणी, आणाभाका, उखाणेपाखाणे इत्यादी अनेक प्रकार मिळून हे लोकसाहित्य बनत असते व विविध थरांनी बनलेल्या विशाल अशा समाजाचे जीवन त्यात प्रतिबिंबित झाले असल्याने समाजशास्त्राच्या व भाषाशास्त्राच्या अभ्यासास ते विशेष पोषक ठरते. शके १२०० च्या सुमारास म्हाइंभटाने रचिलेल्या '**लीळाचरित्रा**' मध्ये चक्रधरांनी धानाई नावाच्या एका हट्टी लहान मुलीस पुढील गोष्ट किंवा '**कहाणी**' सांगून उगी केल्याचा उल्लेख आहे. ही कहाणी अशी - "साळैचे घर मेणाचे : काउळेयाचे घर सेणाचे : पाउसाळां काउळेयाचे घर पुरे जाए : साळैचे वांचे :" (पूर्वार्ध,२३). बाराव्या शतकाच्या अखेरीसच लोककथेच्या गंगेत समाविष्ट झालेल्या या कहाणीचा जन्म यापूर्वी कितीतरी शतकांच्या मागे झाला असला पाहिजे. या लोककथांचा जन्मकाळ जरी सांगता आला नाही तरी ज्या अर्थी १३ व्या शतकारंभी त्यांना लोकवाङ्मयाचे स्वरूप प्राप्त झाले होते, त्याअर्थी त्यापूर्वी चारपाचशे वर्षांपासून त्यांचे अस्तित्व बीजरूपाने का होईना पण असले पाहिजे."

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४७ ते ६४८)

## ४३. <u>शिलालेख व ताम्रपट</u> :

शिलालेख व ताम्रपटांचे अभ्यासातील महत्त्व सर्वज्ञात व सर्वमान्य आहे. डॉ.तुळपुळे यांनी या साधनांच्या आधारे ही चर्चा अधिक सधन केली आहे. ‘‘मराठी भाषेचा जन्मकाळ अजमाविण्याचे आणखी एक साधन म्हणजे शिलालेख व ताम्रपट. ज्ञानेश्वरीपूर्व लेखांची एक यादी श्री. भावे यांनी दिलेलीच आहे. शिलालेखांवर उमटलेल्या मराठीच्या पावलांचा माग घेत घेत ‘सारस्वत’ कार शके ९०५ पर्यंत म्हणजे श्रवणबेळगोळपर्यंत जाऊ शकले. तात्पर्य ज्ञानेश्वरीपासून प्रारंभ करून मागे मागे जात श्रवणबेळगोळपर्यंत पोचता येत होते. एक तर श्रवणबेळगोळाच्या शिलालेखात कालोल्लेख नाही. त्याचा शके ९०५ हा काळ राइस यांनी अनुमानाने ठरविला आहे. पण या मतास हुल्टझ यांचा विरोध असून वरील लेखाच्या दोन्ही ओळी एकाच वेळी, म्हणजे शके १०३९ मध्ये खोदल्या गेल्या असे त्यांनी साधार प्रतिपादले आहे. (E.I.७.१०९) डॉ. गुणे (विविधज्ञानविस्तार,५३.४५५), चिं. ग. कर्वे (प्रसाद, मार्च १९५३), कॉन्टन्स पार्सन्स (A tour in the Mysore State,p.८२) व म्हैसूर गॅझेटिअर (इ.१९३०) यांचे मत स्थूलमानाने हुल्टझच्या मताप्रमाणेच आहे. तात्पर्य, श्रवणबेळगोळचा लेख तितका प्राचीन नाही, व आद्य तर नाहीच नाही. आद्य मराठी लेखाचा मान केशिदेव शिलाहार याच्या अक्षी (जि. कुलाबा) येथील शिलालेखास द्यावा लागेल. नऊ ओळींचा हा लेख शके ९३४ मधील असून त्यात केशिदेवाच्या महाप्रधान भईर्जु सेणूई याने ९३४ मध्ये देवीच्या बोडणासाठी नऊ कुबली धान्य दिल्याचा उल्लेख आहे. अक्षीचा हा लेख श्रवणबेळगोळच्या लेखाहून सुमारे शंभर वर्षांनी प्राचीन आहे. (तुळपुळे, प्राचीन मराठी कोरीव लेख, क्र.१) मात्र या बाबतीत डॉ.

मिराशी यांचे मत निराळे असून त्यांच्यामते अक्षीचा हा लेख पहिल्या नव्हे तर दुसऱ्या केशिदेव शिलाहाराचा असून त्याचा काळ ते शके ११३१ मानतात. अर्थात त्यांच्या मताने तो आद्य मराठी लेख नव्हे (म.सा.पत्रिका, वर्ष ४३,अंक १६६). तसे असल्यास पहिलेपणाचा मान श्री.आनंद कुंभार यांनी प्रसिद्ध केलेल्या कुडल (जि. सोलापूर) येथील शके ९४० च्या शिलालेखाकडे जाईल."

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४८ ते ६४९)

"पुढे महत्त्वाच्या लेखांची एक यादी दिली आहे. या यादीतील काही लेख पूर्णत: तर काही अंशत: मराठी आहेत. या यादीवरून आणि मागील विवेचनावरून मराठी भाषेची प्राचीनतम कालमर्यादा मिळणे शक्य आहे. निदान इतके तरी निश्चयाने म्हणता येईल की ,मराठी भाषेतील आद्यग्रंथ शके १११० च्या आसपास, तिची पहिली लिखित अशी निशाणी शके ९३४ मध्ये, व तिचा पहिला स्पष्ट उल्लेख शके ७०० च्या सुमारास मिळतो."

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४९)

## ४४. काही प्राचीन मराठी कोरीव लेख :

**डॉ.तुळपुळे यांनी पुढील प्राचीन मराठी कोरीव लेखांची नोंद केली आहे.**

| अ. क्र. | लेखकाचे नांव | उपलब्ध स्थळ व काळ (शकवर्ष) |
|---|---|---|
| १ | शिलाहार केशिदेव (I) याचा अक्षी शिलालेख | अक्षी (जि. कुलाबा)९३४ |
| २ | कुडल शिलालेख | कुडल (जि. सोलापूर)९४० (नवभारत २८.१०) |
| ३ | दिवे-आगर ताम्रपट | दिवे आगर (जि. रत्नागिरी)९८२ |
| ४ | महाकुमार सिंघणदेवाचा चनई शिलालेख | चनई (जि. बीड) १००२ (नवभारत, २३.११) |
| ५ | चामुंडराज व गंगराज यांचा गोम्मट शिलालेख (४) | श्रवणबेळगोळ (जि. हसन, कर्नाटक) १०३९ |
| ६ | गंग उदयादित्याचा आंबे शिला. (५) | आंबे-जोगाई (जि. बीड) १०६६ |
| ७ | भांदक शिलालेख (६) | भांदक (जि. चांदा) १०६८ |
| ८ | शिलाहार हरिपालदेवाचा रांजली शिला. (७) | रांजली (जि. रत्नागिरी) १०७० |
| ९ | गंग उदयादित्याचा गरसोळी शिलालेख | गरसोळी (जि. बीड) १०७१(मसंमंवा १९७४) |
| १० | पळसदेव येथील सरडेश्वराचा शिला. (११) | गारदौंड (जि. पुणे) १०७९ |
| ११ | कळचुर्य विज्जण याचा तेर शिला (१२). | तेर (जि. उस्मानाबाद) १०८६ |
| १२ | कदंब मरुडदेव याचा सावरगाव शिला. (१३) | काटी-सावरगाव (जि. उस्मानाबाद) १०८६ |
| १३ | शिलाहार अपरादित्यदेव (॥) याचा परळ शिला. १६ | माहवली (जि. मुंबई) ११०८ |
| १४ | पंढरपूरच्या विठ्ठलदेवाच्या शिला. (१७) | पंढरपूर (जि. सोलापूर) ११११ |
| १५ | जैत्र सामंताचा जालगाव ताम्र(१८) | (जि. रत्नागिरी) ११२४ |

| | | |
|---|---|---|
| **१६** | यादव सिंघण याचा पाटण शिला.(२१) | पाटण (जि. धुळे) ११२९ |
| **१७** | यादव सिंघण याचा कोल्हापूर शिला. | कोल्हापूर ११६०(मसंमवा. १९७५) |
| **१८** | नेवासे येथील कणेरेश्वराचा शिला (२४) | नेवासे (जि. नगर) ११६१ |
| **१९** | यादव कृष्णदेव याच्या तासगाव ताम्र. (२७) | तासगाव (जि. सांगली) ११७२ |
| **२०** | राणेबेत्रुर येथील स्मारक लेख (२८) | राणेबेत्रुर (जि. धरवाड) ११७४ |
| **२१** | बिरजवाडी शिलालेख | बिरजवाडी (जि. औरंगाबाद) ११७४ (प्रतिष्ठान १९.२) |
| **२२** | यादव कृष्णदेव याचा नांदगाव शिलालेख (२९) | नांदगाव (जि. अमरावती) ११७७ |
| **२३** | पंढरपूरचा चौऱ्यायशी शिला. [१] (३४) | पंढरपूर (जि. सोलापूर) ११९५-९९ |
| **२४** | यादव रामचंद्र याचा उन्हकदेव शिला. (३७) | उन्हकदेव (जि. अदिलाबाद) १२०१ |
| **२५** | मंगळवेढयाचा चंडिकाईचा शिला (३८) | मंगळवेढे (जि. सोलापूर) १२०४ |
| **२६ २७ २८** | यादव रामचंद्र याचे वेळापूर येथील तीन शिला. (४५,४७,५०) | वेळापूर (जि. सोलापूर) १२२२, १२२७ |
| **२९** | यादव रामचंद्र याचा हातनूर शिलालेख (४८) | हातनूर (जि. औरंगाबाद) १२२३ |
| **३०** | यादव रामचंद्र याचा कोरवली शिलालेख | कोरवली (जि. सोलापूर) १२२५(नवभारत २८.३) |

या कोरीव लेखाबाबतची अधिक माहिती देताना तळटिपेत डॉ.तुळपुळे म्हणतात,

"अक्षीचा हा मराठी लेख पुढीलप्रमाणे आहे.

१ ..गी सुष संतु। स्वस्ति ओ। पसीमसकृ

२ मुदधीपती । स्त्री कोंकणाचक्री...

३ वर्ती । स्त्री केसीदेवराय । महाप्रथाकृ

४ न भइर्जु सेणूइ तसीमीनी काले

५ प्रव्रतमने । सकु सवंतू : ९३४ प्रभाकृ

६ वी संवसंरे : अधीकू दिवे सुक्रे बौकृ

७ लु । भइर्जुवे तथा बोढणा तथा नउ

८ कुवंली अधोर्यू प्रधानु । महलपूकृ

९ मीची वआन । लुनया कचली जकृ

(टीप : पहिल्या ओळीतील ‘ गी सूष संतू  ही अक्षरे अखेरच्या ओळीच्या अखेरची आहेत)

(वि. ल. भावे (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८३, पृ.६४८ ते ६५१)

# प्रकरण-५

## ४५. राजकीय इतिहास :

**१९२६ साली प्रकाशित झालेल्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या अठराव्या भागात** (पृ.क्र. (म)८४ ते (म)८९वर) महाराष्ट्राच्या इतिहासाबाबत ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी अतिशय मौलिक मांडणी केलेली आहे. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास समजावून घेण्यासाठी आणि राजसत्ता व मराठी भाषा यांचा प्रवास उलगडण्यासाठी केतकरांची मांडणी उपयुक्त आहे. ते म्हणतात, “महाराष्ट्र प्रदेशाची व्याप्ती - महाभारतात महाराष्ट्र हे नाव नाही. बौद्ध ग्रंथ जो महावंश त्यांत महाराष्ट्र असा उल्लेख आहे. त्यावरून त्यावेळी उज्जैनीभोवतालच्या बऱ्याच मोठया प्रदेशास म्हणजे आजच्या मध्य हिंदुस्थानास महाराष्ट्र म्हणत असावेत. ऐहोळच्या शिलालेखान्वये या देशाचे महाराष्ट्रक नावाचे तीन विभाग असून इ. स. सातव्या शतकात या देशात ९९००० खेडी होती अथवा असल्याची दंत कथा होती असे दिसते.

पूर्वी विदर्भ देशालाच महाराष्ट्र हा शब्द लावीत. राजशेखरच्या बालरामायणात विदर्भ व महाराष्ट्र ही नावे एकाच देशाबद्दल योजिली आहेत (बालरामायण १०.७४). अनर्घराघवातही “ इदमग्रे महाराष्ट्रमण्डलैकमण्डनं कुंडिनं नाम नगरम् ” असा कुंडिनपुरचा निर्देश केला आहे.

ह्युएन त्संगाच्या वेळी महाराष्ट्राचा (मोहोलोच) घेर १००० मैल होता. उत्तरेस माळवा, पूर्वेस कोसल आणि आंध्र, दक्षिणेस कोकण, आणि पश्चिमेस समुद्र या त्याच्या मर्यादा होत्या. त्याची राजधानी भडोचपासून १६७ मैल दूर होती.

तथापि अमुकच प्रदेशाचे नाव महाराष्ट्र होते असे निश्चित नाही. मराठ्यांचे राज्य ज्या प्रदेशावर पसरले त्याला महाराष्ट्र असे नाव देण्याचा प्रघात असे; पण मराठी राज्य फार काळ न टिकल्यामुळे व त्याचा नेहमी वृद्धि-संकोच होत असल्यामुळे हे नाव कोणत्याही एका विशिष्ट प्रदेशास रूढ झाले नाही. आज मराठी भाषा ज्या भागात प्रामुख्याने चालते त्याचा महाराष्ट्रात अंतर्भाव करण्याची वहिवाट आहे. मुंबई इलाख्यातील रत्नागिरी, कुलाबा, सातारा, पुणे, अहमदनगर, नाशिक, ठाणे, पूर्व व पश्चिम खानदेश, सोलापूर हे जिल्हे व मुंबई शहर; व वऱ्हाड-मध्यप्रांतातील बुलढाणे, अकोला, वर्धा, अमरावती, नागपूर, भंडारा, चांदा व यवतमाळ हे जिल्हे महाराष्ट्रात या दृष्टीने धरता येतील. या वरील दोन इलाख्यातील जिल्ह्यांचा अनुक्रम मराठी बोलणारांच्या संख्येवरून उतरत्या क्रमाने लावला आहे. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापुरादी संस्थाने, बडोदे, ग्वाल्हेर, इंदूर, धार, देवास इत्यादी संस्थांनातून मराठी भाषा चालते. पण दक्षिण महाराष्ट्रातील काही संस्थाने व कदाचित बडोदे याखेरीज इतरांचा ‘महाराष्ट्र’ या प्रादेशिक विभागात अंतर्भाव होत नाही.

इतिहास - महाराष्ट्री असे एका प्राकृत भाषेचे नाव म्हणून इ.सनाच्या आरंभी माहीत होते; तेव्हा देशाचेही नाव त्याच वेळी प्रचारात आले असावे. रठ्ठी व महारठ्ठी अशी नावे अनेक शिलालेखातून येतात. पण महारठ्ठपासून महाराष्ट्र हा शब्द बनला की नाही याविषयी विद्वानात वाद आहेत.

प्रथम महाराष्ट्र भागात अशोकाचा अंमल असावा. त्यानंतर आंध्र राजे राज्य करू लागले. याचीच एक शातवाहन उर्फ आंध्रभृत्य म्हणून शाखा होती. या शातवाहन किंवा शालिवाहन राजांचे बरेच अवशेष महाराष्ट्रात दृग्गोचर होतात. शालिवाहन घराणे सुमारे तीनशे वर्षे अधिकारारूढ होते; मध्यंतरी (इ.सनाच्या

आरंभी) सुमारे ५० वर्षे शकांचा अंमल होता. शालिवाहनांच्या काळी महाराष्ट्रात बौद्धसंप्रदाय जोराने वावरत होता. शालिवाहनानंतर अभीर व राष्ट्रकूट यांचा उदय झाला. सहाव्या शतकात चालुक्यांनी उत्तरेकडून येऊन महाराष्ट्र जिंकला. या पूर्व-चालुक्यांनी इ.स. ५५०-७५३ पर्यंत, नंतर राष्ट्रकूटांनी इ.स.७५३-९७३ पर्यंत, त्यानंतर उत्तर-चालुक्यांनी इ.स. ९७३-११८९ पावेतो महाराष्ट्रावर राज्य केले. नंतर यादववंश सुरू झाला. अल्लाउद्दीनाने यादवांचे राज्य इ. स. १३१२ त खालसा केले. यादवांच्या अमदानीत मराठी भाषा जोमाने पुढे येऊन तिच्या अर्वाचीन काळास प्रारंभ झाला. यादवांच्या नंतर इ. स. १३४७ पर्यंत दिल्लीच्या सुलतानांचा प्रत्यक्ष अंमल या भागावर होता. त्या साली बहामनी राज्याची स्थापना झाली. पंधराव्या शतकाच्या अखेरीस बहामनी राज्याचे तुकडे होऊन बेरीदशाही, इमादशाही, कुतुबशाही, आदिलशाही व निझामशाही अशी पाच राज्ये झाली व त्यांच्यात महाराष्ट्रही विभागला गेला. पुढे मोगलांकडे व मराठ्यांकडे महाराष्ट्राचे आधिपत्य आले. शेवटी इंग्रजांकडे हा प्रदेश जाऊन आज तो त्यांच्याच अंमलाखाली पारतंत्र्यात आहे.”

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८४ ते (म)८५)

## ४६. <u>महाराष्ट्रीय लोक, प्राचीन :</u>

केतकर प्राचीन इतिहासाची मांडणी करताना इतिहासकार राजवाडे यांचा हवाला देऊन म्हणतात. “प्रसिद्ध इतिहास संशोधक राजवाडे आपल्या ‘महाराष्ट्राचा वसाहतकाल’ (इतिहास आणि ऐतिहासिक, मासिक ऐतिहासिक विविधविषय, पृ.२९-२४२) या लेखात व राधामाधव-विलास चंपूच्या प्रस्तावनेत (परिच्छेद ८४ पासून पुढे) महाराष्ट्र नावाची व्युत्पत्ती व महाराष्ट्रीयांचे परिभ्रमण

आणि वंशनिश्चय देतात. त्यांच्या मते मगधदेशाधिपति महाराजांचे जे भक्त ते महाराष्ट्रिक बौद्ध क्रांतीला कंटाळून दक्षिणारण्यात शिरले. ( शकपूर्व सहाशेच्या सुमारास ) अशोकाच्या शिलालेखात उल्लेखिलेले राष्ट्रिक (रास्टिक) व हे महाराष्ट्रिक अगदी निरनिराळे होत. या महाराष्ट्रिकांनी नर्मदेपासून भीमेपर्यंतचा सह्याद्री किनारा व देवगिरीपासून पैठणचा प्रांत व्यापिला. कालांतराने महाराष्ट्रिकांच्या खालच्या भागातले वैराष्ट्रिक व राष्ट्रिक यांचाही समावेश महाराष्ट्रिकात होऊन या तिघांचे देश मिळून त्रिमहाराष्ट्रिक बनले. सोळाशे वर्षेपर्यंत दक्षिणेत महाराष्ट्रिकांनी स्वधर्मरक्षणार्थ वसाहती करण्याचे काम केले. त्यांच्यावर अनेक अधिराजे होऊन गेले पण त्यांच्या संस्कृतिसंवर्धनाच्या कामात खंड पडला नाही. या लोकांची पहिली मोठी भरभराटलेली वसाहत म्हणजे पैठण प्रांतातील गोदावरीच्या तीरावरची. परंतु हे महाराष्ट्रीक लोक बऱ्याच कनिष्ठ संस्कृतीचे होते. साम्राज्ये चालविण्याची कला अशी त्यांच्यात नव्हती. तशा उच्च प्रकारच्या कलाही त्यांना अवगत नव्हत्या. ते फक्त देशमुख्या पटकावण्याचा निरुपद्रवी उद्योग चांगला करीत. भाषेच्या व वाङ्मयाच्या प्रांतातही महाराष्ट्रिक असे मागासलेले असत. या महाराष्ट्रिकांचा नाग लोकांशी मिलाफ होऊन मराठे नावाचे नवे राष्ट्र बनले.(शक चारशेचा सुमार) या नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे लोकांवर वैदिक धर्म, उपासनामार्ग, वनदेवतापूजा, सर्पोपासना व बौद्धधर्म अशा पाच पंथाची छाप बसली होती. त्यांच्यात राष्ट्रीय भावना किंवा एकजूट मुळीच नव्हती. चालुक्य, यादव, पल्लव, भोज इत्यादि महाराष्ट्र देशनिवासी क्षत्रिय व महाराष्ट्र ब्राह्मण या अल्पसंख्यांकावर या मराठ्यांचा पगडा बसून मराठ्यांची ही संस्कृती सर्वसामान्य व सर्वमान्य झाली.”

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८५)

मराठी भाषकांविषयी केतकर पुढील माहिती देतात. "मराठी बोलणाऱ्यांची संख्या आज सुमारे २ कोटी भरेल. पैकी मुंबई इलाख्यातच जवळ जवळ निम्मी संख्या आहे; वऱ्हाड मध्यप्रांतात व हैदराबाद संस्थानांत सुमारे ३५ लक्ष व मुंबई इलाख्यातील संस्थानांतून सतरा अठरा लाख मराठी लोक आहेत. मद्रास इलाख्यासारख्या भिन्न संस्कृतीच्या भागात देखील सुमारे तीन लाख मराठी बोलणारे आहेत. बाकीच्या प्रांतातून लाखांपेक्षा कमी आहेत. हिंदुस्थानात ज्या प्रदेशात मराठी भाषा कमी अधिक प्रमाणात चालते तेथे एकंदर जनतेशी महाराष्ट्रीयांचे प्रमाण काय पडते याचे कोष्टकवार विवेचन वाङ्मयसूचीत (प्रस्तावना पृ.८ पासून पुढे ) सापडेल. महाराष्ट्राबाहेर जे मराठे आहेत ते त्या त्या ठिकाणी मराठे साम्राज्याच्या वसाहतकाली मागेच गेलेले किंवा आज पोट भरण्यासाठी जाऊन राहिलेले आहेत. म्हैसूर संस्थानात जे मराठे गेले ते शहाजी, शिवाजी व पेशवे यांच्या तिकडील स्वाऱ्यांबरोबर गेलेले आहेत; त्यापैकी (८७,४७६) हल्ली काही संस्थानी लष्करात व काही कानडी बनलेले रंगारी व शिंपी म्हणून आढळतील. कोचीन संस्थानातील (२२,२२५) कुणबी (कुडुमीचेट्टी) व कोकणी ब्राह्मण (सारस्वत) गोव्याकडून तिकडे गेलेले आहेत; येथील ब्राह्मण व्यापार करतात व कुडुमीचेट्टी मोलमजुरी व नाविकांचे काम करून रहातात. मराठयांच्या अमदानीत दिल्लीस दरबारी कामावर असलेल्या मंडळींपैकी काही पंजाबमध्ये जाऊन राहिले तेव्हा त्यांचे वंशज (७५६) तिकडे आढळल्यास नवल नाही. वायव्य सरहद्दीवरील पलटणीत काही मराठे (२१९) आहेत. संयुक्त प्रांतातील मराठ्यांच्या वस्तीपैकी (६,०२९) सुमारे निम्मे काशीक्षेत्री आहेत; त्या खालोखाल झाशीस मराठ्यांची वस्ती (१,६५८) आहे. मध्य हिंदुस्थानात मराठ्यांची जी २८,००० वस्ती आहे तीपैकी सुमारे निम्मी मिळवती व बाकी निम्मी

पहिलीवर अवलंबून राहणारी आहे. बंगाल (२,४०३), ब्रह्मदेश (२,२१२), आसाम (१,३९६) व बिहार व ओरिसा (१,०४९) या भागातून जी मराठ्यांची तुरळक वसाहत आहे ती नोकरीनिमित्त झालेली आहे. याप्रमाणे हिंदुस्थानातील महाराष्ट्रियांची थोडक्यात पहाणी झाली. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान वगैरे परदेशात शिकण्यासाठी किंवा उद्योगासाठी जाऊन राहिलेले महाराष्ट्रीय बरेच आहेत पण ते हजारांनी मोजण्या इतपत नाहीत. आफ्रिकेतील महाराष्ट्रीय समाज इतर परदेशी भागातल्यापेक्षा मोठा भरेल. यांची खानेसुमारी सरकारी रीतीने जाहीर होत नसल्याने नक्की आकडे देता येणे शक्य नाही.”

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८५)

**मराठी साम्राज्याबाबत ते पुढे म्हणतात** “महाराष्ट्रीय उर्फ मराठी साम्राज्य - महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रीयांचा अंमल जेथे जेथे होता त्या सर्व प्रदेशाला मिळून महाराष्ट्रीय किंवा मराठी साम्राज्य म्हणतात.

महाराष्ट्रीयांनी जे साम्राज्य स्थापिले त्याला एक प्रकारचे निश्चित धोरण होते. त्यांची फोड ठोकळमानाने पुढीलप्रमाणे करता येईल :- १६४० सालपर्यंत मराठ्यांचे धोरण मुसलमानी अमलाखाली मानमरातब मिळवून व जहागिरी उपभोगून थोडेसे स्वतंत्रपणे वागावयाचे होते. शिवाजीच्या वेळी महाराष्ट्रापुरते लहानसेच पण पूर्ण स्वतंत्र असे स्वराज्य स्थापावयाचे व आणिक मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा असा त्या धोरणात फरक झाला. शिवाजीच्या पश्चात शाहू सुटून येईपर्यंत स्थापलेल्या राज्याचे औरंगजेबापासून हरप्रयत्नाने मराठ्यांनी रक्षण केले. शाहूपासून सवाई माधवरावापर्यंत, हे जुने स्वराज्य सांभाळून सर्व

हिंदुस्थानभर आपली सत्ता स्थापण्याची व दिल्लीची मोगल पातशाही नावाला राखून प्रत्यक्ष व्यवहारात आपली हिंदू पदपातशाही गाजवावयाची असे हे धोरण बळावले. (आणि महाराष्ट्रीय साम्राज्याचा महत्त्वाचा काळ काय तो हाच आहे) पुढे रावबाजीपासून मराठ्यांचे साम्राज्य विस्ताराचे धोरण पुन्हा संकोचित होऊन, इंग्रजापासून स्वराज्याचे संरक्षण करावयाचे व साधल्यास पुनरपि स्वातंत्र्य मिळवावयाचे हा प्रयत्न सुरू होता. १८१८ साली मराठी साम्राज्य अनेक कारणांनी लयास गेले. तेव्हापासून आजतागायत हयात असलेल्या मराठी संस्थानिकांचे धोरण आरंभी सांगितलेल्या सन १६४० पूर्वीच्या मराठ्यांच्या धोरणावर येऊन बसले आहे.”

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८६ ते (म)८७)

**४७. <u>छत्रपती शिवाजी महाराज :</u>**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या अमदानीत मराठी सत्तेचे महत्त्व देशभर वाढले. छत्रपती शिवराय आणि त्यांच्या वारसांनी पुढच्या काळात मराठी सत्तेची पताका देशभर फडकवली. त्याबाबत डॉ.केतकर चर्चा करताना म्हणतात,**

“छत्रपती शिवाजी महाराजांचे साम्राज्य :- छत्रपतींनी स्थापण्यास आरंभ केलेल्या राज्याचे मूळ म्हणजे पुणे, सुपे, इंदापूर, ही त्याची लहानशी जहागीर होय . या प्रदेशाचे ठोकळ क्षेत्रफळ २३०० चौ.मैल आहे. ३० वर्षात त्यांच्या राज्याचा विस्तार कल्याण ते गोवे, भीमा ते वारणा यामधील १५००० चौरस मैलावर पसरला, आणि शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळी तर पुढील प्रांताचा समावेश मराठी राज्यात झाला होता. मावळ, वाई, सातारा, पन्हाळा, दक्षिण कोकण,

बागलाण, त्र्यंबक, धारवाड, बिदनूर, कोलार, श्रीरंगपट्टण, कर्नाटक, वेलोर व तंजावर यातील मिळून एकंदर २६७ किल्ले, राज्याची ठोकळ चतु:सीमा पूर्वेस भीमा; पश्चिमेस अरबी समुद्र; उत्तरेस गोदावरी व दक्षिणेस कावेरी होय. या एकंदर प्रदेशाचे क्षेत्रफळ साधारणपणे १,२०,००० चौरस मैल येईल व उत्पन्न दीड ते पावणेदोन कोटी रुपयांचे होते.”

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८७)

काही काळ तर दिल्लीच्या बादशाहाला संरक्षण पुरविण्याचे काम मराठ्यांनी केले. या अर्थाने मराठी सत्तेचा ध्वज दिल्लीवर फडकत होता. या मराठी सत्तेचा आलेख मांडताना डॉ.केतकर पुढे म्हणतात, “शाहू गादीवर आल्यावर प्रथम बाळाजी विश्वनाथाने चौथ-सरदेशमुखीवर स्वराज्याच्या सनदा आणिल्या, आणि मग बाजीरावाने सय्यद बंधूच्या भानगडीचा फायदा घेऊन माळवा, गुजराथ, बुंदेलखंड, वऱ्हाड, या प्रांतात हातपाय पसरले. थोडयाच काळात हे प्रांत व राजपुतान्यातील काही मुलूख मराठी राज्यात पूर्णपणे सामील झाला. हिंदुपदपातशाहीच्या चढाईच्या धोरणास बाजीरावाने सुरुवात केली. बरेचसे रजपूत राजे मराठ्यांचे मित्र व काही मांडलिकही बनले आणि शाहू गादीवर येण्यापूर्वी मराठी राज्याचा जो विस्तार होता, त्याच्या दुप्पट विस्तार बाजीरावाच्या मृत्यूच्या वेळी झाला. नानासाहेब पेशव्यांनी काही दिवस उत्तरेकडे लक्ष घालून अंतर्वेदी, पंजाब, ओरिसा, संयुक्त प्रांत या प्रदेशातील बराचसा मुलूख हाताखाली घातला. यावेळी तर दिल्लीच्या बादशहाने स्वत:साठी काही नेमणूक ठरवून पेशव्यास आपल्या रक्षणाचे व राज्यकारभार करण्याचे काम सांगितले आणि ते काम शिंदे, होळकर यांनी पेशव्यातर्फे पार पाडले. दिल्लीची मोगल पातशाही पुण्याच्या हिंदु पातशाहीच्या पंखाखाली प्रथम जी गेली ती याच सुमारास. उत्तरेकडे याप्रमाणे

अंमल बसल्यावर नानासाहेबांनी दक्षिणेकडे लक्ष घालून कर्नाटक मिळविण्याचा उद्योग केला...... सवाई माधवरावांच्या वेळी शिंदे, होळकर, भोसले या उत्तरेतील सरदारांनी दिल्लीच ताब्यात घेऊन नानासाहेबांच्या वेळचा तिकडील सर्व प्रांत हस्तगत केला आणि दक्षिणेतही कर्नाटक मोकळे करून निजामाकडून खर्ड्याच्या लढाईत ४० लक्षांचा मुलूख घेऊन निजामांचे बहुतेक राज्य खालसा केले. माधवरावांच्या कारकीर्दीत सर्व मराठी साम्राज्याचे महसूल २० कोटीपर्यंत असावा व विस्तार प्रत्यक्षाप्रत्यक्ष सर्व हिंदुस्थानच्या तीन चर्तुथांश भागावर असावा.''

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८७ ते (म)८८)

या काळातील लष्कर व आरमाराबाबत डॉ.केतकर पुढीलप्रमाणे माहिती देतात. ''खर्ड्याच्या लढाईत मराठी साम्राज्याचे लष्कर सर्वात जास्त होते. (एक लाख तेरा हजार) आणि पाणीपतच्या वेळी ७० हजार होते. इ.स.१८०० च्या सुमारास साम्राज्याचे लष्कर २ लाख ७४ हजार होते..... आरमाराचे महत्त्व शिवाजी महाराजाने ओळखून त्याचा उपयोग करून घेतला. पेशव्यांनीही तेच धोरण पुढे चालविले. थोड्याफार फरकाने पेशवाई अखेरपर्यंत कोकण किनाऱ्यावर मराठी साम्राज्याचे वर्चस्व होते. अखेरीच्या सुमारास इंग्रजांनी अंमल बसविण्यास सुरुवात केली. कानोजी आंग्र्यास  तर इंग्रज, फिरंगी हे चळचळा कापत असत..... या आरमारात ४०० टन पर्यंतची लढाऊ जहाजे असत. आणि त्यावर ५ पासून ५० पर्यंत तोफा असत. एका विजयदुर्गाच्या आरमारी सुभ्यातच ३ हजारापर्यंत नाविकदल होते.''

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८८ ते (म)८९)

या काळातील राजव्यवहाराची भाषा मराठी होती. याबाबत साधार मांडणी करताना केतकर म्हणजात “साम्राज्याची दरबारी भाषा अर्थातच मराठी होती. मात्र इंग्रज, मोगल, टिपू वगैरे परराजांशी पत्रव्यवहार फारशी भाषेत होई. ते दरबारही मराठी साम्राज्याशी पत्रव्यवहार फारशीतच करत. पण याखेरीज साम्राज्यात सर्वत्र मराठी भाषा वापरीत. लेखन मोडी लिपीत चाले. वसाहती केलेल्या लोकांनी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपीचाही प्रसार हिंदुस्थानात सर्वत्र केला. मद्रासकडे ५०/६० वर्षापूर्वी व म्हैसूरकडे २५/३० वर्षाखाली इंग्रज व म्हैसूर सरकाराच्या कचेरीतील बरेचसे लिखाण मोडीत चालू होते. आणि अद्यापही कर्नाटकात जमा - खर्चात भाषा कानडी परंतु लिपी मोडी असा प्रकार आढळतो.”

(डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर, संपादक, १९२६, पुणे, पृ.(म)८९)

# प्रकरण-६

## ४८. देशभर मराठी :

मराठी ही फक्त प्राचीन भाषा आहे असे नाही तर तिच्यात श्रेष्ठ साहित्याची सातत्यपूर्ण परंपरा आहे. महाराष्ट्र या देशनामापेक्षा महाराष्ट्री भाषा जुनी आहे. अश्मक, कुंतल, अपरान्त, विदर्भ या प्रदेशात प्राकृत महाराष्ट्री प्रचारात होती. इतकेच नाही तर सातवाहनांच्या राजवटीत (इ.स.पूर्व २३० ते इ.स. २३०) त्यांचा राज्यविस्तार कुरुक्षेत्र, पेशावर इथपर्यंत झाल्यामुळे ती भारताच्या बऱ्याच मोठया भूभागात प्रचलित होती. म्हणूनच ' गाहासत्तसई' उर्फ 'गाथासप्तशती' या हालसातवाहन राजाने संकलित केलेल्या गाथांच्या प्रतींची हस्तलिखिते देशभर अनेक ठिकाणी सापडलेली आहेत.

## ४९. रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र :

श्रेष्ठ आधुनिक भारतीय कवी रवींद्रनाथ टागोर यांच्या कवितेचे नातेसुद्धा बऱ्याच अंशी गाथासप्तशतीशी जोडता येईल, या एका आश्चर्यकारक वास्तवाची सुद्धा नोंद केली पाहिजे. टागोरांची कविता अधिक कोमल आणि गूढधूसर आहे. तिची अभिव्यक्ती जरा वेगळी आहे. तरीही नाते नक्कीच आहे. टागोरांनी गाथासप्तशती वाचली होती अथवा नाही हे कळायला मार्ग नाही. पण महाराष्ट्र आणि महाराष्ट्राचे साहित्य, इतिहास यांचा त्यांना उत्तम परिचय असावा असे त्यांच्या लेखनावरून वाटते. मराठ्यांविषयी असणाऱ्या बंगाली मानसिकतेत रघूजी भोसले यांच्याबाबतच्या संघर्षाच्या आठवणी आहेत. तरीही टागोरांनी छत्रपती शिवाजी आणि त्यांचे कार्य यांचे केलेले विश्लेषण केवळ अप्रतिम असेच आहे.


## ५०. मराठी - आदिकाळ, मध्यकाळ :

स्थूलमानाने विचार करता कुरुयुद्धाच्या आधीपासूनच उत्कर्षाला आलेली महाराष्ट्री भाषा इसवी सनाच्या पहिल्या शतकापर्यंत त्याच स्थितीत होती. चवथ्या शतकात अपभ्रंश भाषा सुरू झाली. तोवर महाराष्ट्री आणि अपभ्रंश वापरात होत्या. अपभ्रंशाचा काल साधारणत: चवथे शतक ते बारावे शतक असा दिसतो. या आठशे वर्षातल्या साधारणत: सातवे ते अकरावे शतक हा तीनशे वर्षाचा काळ अपभ्रंश भाषेतील उत्तम साहित्य निर्मितीचा दिसतो. अपभ्रंश भाषा दुर्बळ होत असताना तिच्यातून आजच्या मराठीचा उद्भव होत होता.

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीपासून ब्राह्मी लिपीमध्ये लिहिली जाणारी महाराष्ट्री प्राकृत भाषा आणि लिहिली जाणारी आजची मराठी भाषा यांचे अतूट पारंपरिक नाते आहे. महाराष्ट्री प्राकृतात लिहिले गेलेले नाणेघाट, नाशिक, इत्यादी ठिकाणचे लेख ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत. 'महाराष्ट्र' हा प्रदेशवाचक शब्द ज्या शिलालेखात प्रथम येतो तो इसवी सन ६३४ मध्ये कोरला गेलेला चालुक्यसम्राट द्वितीय पुलकेशीचा ऐहोळ्याचा शिलालेख ब्राह्मी लिपीची पुढची अवस्था दाखवतो. इसवी सनाच्या सुमारे नवव्या शतकापासून देवनागरी लिपीचा विकास झालेला दिसतो आणि मराठी भाषेनेही तिचा स्वीकार केल्याचे आढळून येते. दिवेआगर येथील शके ९८२ चा ताम्रपट आणि श्रवणबेळगोळ, पंढरपूर, अंबेजोगाई इत्यादी ठिकाणचे शिलालेख याची साक्ष देतात. केवळ धार्मिक ग्रंथच नव्हे तर मराठी भाषेतील संतसाहित्यसुद्धा देवनागरी लिपीतच लिहिले गेले असले पाहिजे असे सांगणारे पुरावे मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. असे असले तरी ब्राह्मीसारख्या प्राचीन लिपीशी असणारे देवनागरी लिपीचे आणि पर्यायाने मराठी भाषेचे नाते निदान तेराव्या शतकापर्यंत विस्मृतीत गेलेले नव्हते. 'अकार चरणयुगुल...' ही

ज्ञानेश्वरीतील ओवी याची साक्ष देते. त्या ओवीत वर्णन केलेले गणेशाचे ध्यान ब्राह्मी लिपीतील अक्षरांच्या समूहाद्वारेच व्यक्त होऊ शकते.

सोबत ब्राह्मी लिपीपासून देवनागरी लिपीची उत्क्रांती दर्शविणारा तक्ता.



## ५१. आजची मराठी :

आजच्या मराठीचा उद्भव आठव्या शतकात होतानाही अपभ्रंश भाषा चालू होती. बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत मराठी साहित्यात श्रेष्ठ दर्जाच्या साहित्यनिर्मितीचे सातत्यपूर्ण पठार दिसते. या काळात म्हाइंभटाचे लीळाचरित्र, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, एकनाथ, तुकाराम यांचे लेखन आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासें कळस' असे यांचे सार्थ वर्णन आहे. तुकोबांच्या नंतरही संतकविता झाली पण तिचा दर्जा तितका उरला नाही. पेशवाईत एकीकडे मोरोपंत, मुक्तेश्वर, वामन पंडित यांच्यासारख्या पंतकवींची संस्कृतप्रचुर रचना होत होती व त्याच वेळी बहुजन कवी लोकभाषेत लावण्या,पोवाडे रचत होते. पेशवाईच्या अस्ताच्या वेळी किंवा अव्वल इंग्रजी अमदानीत राजकर्त्या कोकणस्थ ब्राम्हणांना राज्य बुडाल्याचा मोठा धक्का सहन करावा लागला व त्यातून एक प्रकारची पराभूत मनोवृत्ती तयार होऊ लागली व त्यातून उभे राहण्याचा प्रयत्नही ते करू लागले. विष्णुशास्त्री चिपळूणकर (जन्म १८५०) एकीकडे इंग्रजीतून अरेबियन नाईट्स्, शेक्सपियर यांचे अनुवाद करू लागले होते व त्याचवेळी संस्कृतातून मराठीस बळ देण्याची भाषा व कृती करत होते. मराठी भाषा ही एखाद्या नूतन भूमिकेसारखी असून तिची नांगरट व मशागत अद्याप व्हावयाची आहे म्हणून एकीकडून इंग्रजी व दुसरीकडून संस्कृत असा बळकट आधार तिस दिला पाहिजे, अशा आशयाचे त्यांचे विधान प्रसिद्धच आहे. ज्या भाषेत लीळाचरित्र लिहिले गेले, ज्या भाषेत ज्ञानेश्वर, नामदेव, मुकुंदराज, चोंभा, एकनाथ, तुकाराम यांनी लिहिले, ती नूतन भूमिकेसारखी कशी असेल. नंतरच्या एवढ्या वर्षातही जे मराठी साहित्य अजून त्या दर्जाला पोहोचले नाही तो दर्जा गाठलेला काळ शास्त्रीबुवा विसरूनच गेले. त्यांच्या ते लक्षातच आले नाही.

मराठीवर संस्कृतचा प्रभाव सुरू होण्याचा हाच काळ होय. लिहिण्यावाचण्याच्या परंपरा असलेली ब्राह्मण व तत्सम जातीतील माणसे ब्रिटिशांनी राज्यव्यवहारासाठी जशी हाताशी धरली तशीच स्थानिक भाषा, साहित्य यांच्या अभ्यासासाठीही. ते स्वाभाविकच होते. बहुजनात औपचारिक शिक्षण जवळपास नसल्यासारखेच होते. परिणामी लिखित गद्याची भाषा संस्कृतप्रचुर होण्याकडे कल वाढता राहिला.

## ५२. <u>महात्मा जोतीराव फुले :</u>

चिपळूणकरांचे समकालीन महात्मा जोतीराव फुले यांनी त्याच काळात फार महत्त्वाचे साहित्य लेखन केले. फुले मुख्यत: सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करत होते. त्याचबरोबर लेखनही करीत होते. त्यांनी कविता (अखंड), निबंध, लेख, नाटके असे विपुल लेखन केले. या लेखनाला त्या काळातल्या सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या वर्गाने महत्त्व दिले नाही. चिपळूणकरांनी तर त्यांच्या लेखनातील व्याकरणाच्या चुका काढण्यातच धन्यता मानली. आज हे अभ्यासकांनी लक्षात आणून दिलयं की, युरोपात बर्टोल्ट ब्रेक्त ने Epic Theatre ची सैद्धान्तिक मांडणी करण्याआधी इथे मराठीत फुल्यांनी 'तृतीय रत्न' हे नाटक ही संकल्पना प्रत्यक्षात आणल्यासारखे लिहिले आहे.

चिपळूणकरी परंपरेचा प्रभाव स्वातंत्र्यापर्यंत पुढचा काही काळ राहिला. पण १९६० च्या सुमाराला पुन्हा ठळक बदलाला सुरुवात झाली. फुले, शाहू, आंबेडकर अशी विचारधारा मानणारे बहुजन लेखक आपल्या भाषेत लिहू लागले. या अठरापगड जातीतील लेखकांनी संस्कृतचा प्रभाव धुडकावून लावला आहे.

मराठीवर संस्कृतचा प्रभाव आठव्या शतकातच पडू लागला होता, तो पुढे सोळाव्या शतकात कमी झाला. कारण मुसलमानी राजवटीतील मराठा सरदारांचे दक्षिणोत्तर अनेक ठिकाणी वास्तव्य. दक्षिणेतील मुसलमानांच्या उर्दू भाषेवर (तिला दखनी म्हणत) मराठीचा प्रभाव पडला. या भाषेत बरेच साहित्य आहे. 'पदमराव कदम' नावाचे काव्यही आहे. या काळातच मराठीवरती फारसीचा प्रभाव बराच पडून बरेच फारसी, अरबी शब्द मराठीत आले आणि रूढ झाले. पण मराठीचा मूळ ढाचा त्यामुळे बदलला नाही. शिवाजीकालीन पत्रव्यवहार, पेशवेकालीन पत्रव्यवहार पाहिला असता याची कल्पना येते.

अनेक प्रकारचे प्रभाव पुन्हा पुन्हा पचवून त्यांना आत्मसात करून ही देशी भाषा प्रगल्भ होत गेलेली आहे. आज जगातल्या सर्व महत्त्वाच्या भाषांप्रमाणे मराठी भाषा इंग्रजीच्या दबावाखाली आहे. ही गोष्ट कोणीही नाकारत नाही. पण जागतिकीकरणाचा उलटा परिणाम होऊन ही भाषा टिकण्यास व वाढण्यास अंतत: हातभारच लागेल असे वाटते. मुक्त व्यापारात ग्राहकाला गाठणे व त्याला हवे ते हवे तसेच देऊन नफा कमविणे हा मुख्य उद्देश असतो. त्यासाठी भाषा हे Tool उपयुक्त असेल तर ते वापरले जाईल, जात आहे असे दिसते. आपल्या आजच्या सगळ्याच महत्त्वाच्या भाषा केवळ संख्येच्या बळावर टिकतील अशी चिह्ने आहेत. आपल्या भाषा संपवण्यासाठी आपली संस्कृती यथामूल उध्वस्त करणे ही गोष्ट बहुराष्ट्रीय कंपन्यांना गेल्या निदान २० वर्षात जमलेली नाही. मुख्य म्हणजे त्याची आवश्यकता त्यांना वाटलेली नाहीय. तशा प्रयत्नांना आपले बहुजन प्रतिसाद देत नाहीत असा अनुभव आहे. भाषा संपवणे यापेक्षा माल खपवणे व नफा कमावणे ही गोष्ट अग्रभागी आहे, हे एक बरे आहे.

## ५३. परिणत अवस्था :

११९० च्या सुमाराला रचला गेलेला मुकुंदराज यांचा विवेकसिंधू हा एक लक्षणीय ग्रंथ आहे. त्यातील मराठी भाषा ही प्राथमिक अवस्थेत नसून परिणत अवस्थेत आहे. म्हणूनच मुकुंदराजाआधी किमान काही शतके मराठीत ग्रंथरचना होत असावी व त्याच्या काही शतके आधीपासून मराठी भाषा उन्नत होत असावी. अपभ्रंशाचे क्षीण होत जाणे व मराठीचे उत्कर्षास येत राहणे असा हा काळ सुमारे आठव्या शतकापासून (समरादित्याची कथा – हरिभद्र; अपभ्रंश) बाराव्या शतकापर्यंत (११९०-विवेकसिंधू) असावा.

एकाच कालखंडात एकाच भाषेची अनेक रूपे प्रचलित असणे नक्कीच शक्य आणि स्वाभाविक आहे. महाराष्ट्रीचा लोप होताना अपभ्रंशाचा ऱ्हास काळ आणि मराठीचा उदय या दोन्ही संक्रमण काळात दोन्ही भाषात साहित्य निर्माण झाले असावे, आहे. इसवी सनाच्या आठव्या ते दहाव्या शतकात अपभ्रंश भाषेत ग्रंथ निर्माण झाले. त्याचवेळी सातव्या किंवा आठव्या शतकात उदयाला आलेली मरहट्ठ भाषा बाराव्या शतकात उत्कर्षास पोहचली व तिथे अपभ्रंश भाषा संपली. या अर्थाने महाराष्ट्री आणि मरहट्ठ (मराठी) यांना जोडणारा अपभ्रंश भाषेचा असा कालखंड ८०० वर्षाचा कालखंड (चौथे ते बारावे शतक) हा संक्रमण काळ होय. आठव्या शतकात उदयाला आलेली मरहट्ठ भाषा बाराव्या तेराव्या शतकात प्रगल्भ झाली. तेरावे ते सतरावे शतक (ज्ञानेश्वर ते तुकाराम) या चारशे वर्षात मराठीत सातत्याने श्रेष्ठ दर्जाचे, जागतिक दर्जाचे साहित्य निर्माण झाले. पुढे मुसलमानी काळात मराठी बदलत गेली तरी सभासदाची बखर, भाऊसाहेबांची बखर, महिकावतीची बखर, पानिपतची बखर, होळकरी थैली इ. अशा गद्यात या

भाषेची सामर्थ्यस्थळे विपूल दिसतात. पेशवाईतील पंत आणि तंत कवींची कविता तितकी प्रभावी नसली तरी त्या काळातील पांडवप्रताप, शिवलीलामृत, हरिविजय अशा ग्रंथांनी तसेच नाथसंप्रदायी पोथ्यांनी बहुजनांच्या श्रवणभक्तीला पुरेसे खाद्य देत राखलेले ठेवले. अव्वल इंग्रजीतील फुल्यांची परंपरा मुकुंदराव पाटील, कृष्णराव भालेकर, दिनकरराव जवळकर, माधवराव खंडेराव बागल अशी पुढे गेली. या लोकांस त्या त्या काळात महाराष्ट्र सारस्वतांनी फारसे महत्त्व दिले नव्हते ही बाब नोंदविली पाहिजे.

## ५४. <u>संत तुकाराम :</u>

१६५० साली तुकारामांचा मृत्यू झाला. त्यांची कविता, निरक्षर लोकांनी जिवंत ठेवली. तुकारामांचा एखादा तरी अभंग माहीत नाही असा मराठी माणूस आजही नाही. ॲक्वर्थ नावाच्या इंग्रज अभ्यासकाने म्हटले आहे की मराठी माणूस समजून घ्यायचा तर त्यासाठी वेद उपनिषदे नाही वाचली तरी चालेल. किंबहुना ती तितकी इथे उपयोगाची नाहीतच. पण ब्राह्मणापासून, कुणबी (अगदी महार, मांग) यांच्यापर्यंत हे लोक ग्यानबा तुकारामाच्या कवितेने बांधलेले आहेत.

तुकारामानंतर थेट जोतीराव फुल्यांपर्यंत मराठीत साधारण निर्मिती झाली असे म्हणावे लागेल. वाईकर गोडसे भटजी यांचा ‘माझा प्रवास’ हे १८५७ च्या

शिपायाच्या बंडासमयीचे लेखन लक्षणीय आहे. बाकी फुल्यांचे महत्त्व अशासाठी की त्यांच्या विचारांनी आणि कार्याने प्रेरित होऊन साहित्यात नव्या मनूचा उद्भव झाला. आजचे महत्त्वाचे मराठी साहित्यिक फुले, शाहू, आंबेडकर ही विचारधारा मानणारे आहेत. १९६० नंतर मराठी साहित्यात जे क्रांतिकारी परिवर्तन आले आहे त्यासाठी असलेल्या प्रेरणास्रोतात फुले यांचे लेखन अग्रभागी आहे.

## ५५. दलित साहित्याचे योगदान :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ आणि प्रेरणा यातून दलित साहित्याचा सशक्त प्रवाह जन्माला आला. दलित साहित्यामुळे मराठी भाषा आणि साहित्य अधिक समृद्ध झाले. अनेक समाजशास्त्रीय दस्तऐवज या साहित्याच्या जोरकस प्रवाहाने निर्माण केले. दलित साहित्याचे योगदान पुढीलप्रमाणे होय.

Marathi language has been characterized, besides its antiquity of origin, with many crucial aspects in terms of literary production. Compared to any language in the world, in terms of literary schools and production, Marathi emerges superior due to its variety of literary schools produced by its native speakers. So far as English is concerned, there are certainly many offshoots of literary schools but they are not, essentially, incepted by their own native speakers. For instance, English has been enriched with the arrival of American literature, African American literature, Native American literature, Australian aboriginal literature, First Nation Canadian literature etc. At the same time, in recent period, many colonized countries like India, Pakistan, and Bangladesh etc. are writing in English and contributing to English language and literature. These literary productions, though enrich English language, are not by the native speakers of English. Therefore ubiquitous nature of writing in English is not the credit of English language but of colonial forces that imposed English language on colonized people all over the world. In fact,

in order to perpetuate linguistic and cultural supremacy, the Europeans imposed English language and literature on the colonized people.

In case of Marathi, we have enormously rich school of Dalit literature, which has a deep relationship with African American literature in terms of thematic expression, experience, and revolt. The concept of Dalit literature is not borrowed from any foreign language or any other Indian language; it is a very original creation of Marathi language. Moreover, the fact is, Marathi Dalit literature has been inspiring the oppressed groups of other Indian languages as well as foreign languages. The oppressed people in adjacent Asian countries have adopted the term Dalit literature and they are establishing the schools of Dalit literature in their respective countries. In recent time in Pakistan and Bangladesh Dalit writing in Urdu and Bangla is emerging with tremendous force. Especially from Bangladesh the writers like Gautam Ali, Achintya Biswas, Nakul Malik and Kapil Thakur have been contributing to the body of Dalit literature in Bangladesh. Nowadays Dalit literature is flourishing in many regional languages in India. Especially, the languages like Kannada, Tamil, Malayalam, Panjabi, Telgu; have a great treasure of Dalit literature. Dalit literature in various Indian languages is being translated in many world languages, and this is going to be a crucial domain of literary and cultural studies in future. And the inspiration behind all these developments is, of course, Marathi Dalit Literature. This is notable and lasting contribution of Marathi language to the world literature. In short, Marathi Dalit

literature has pioneered in opening the branches of its school in other languages and countries.

Now it will be important to focus on the causes behind the emergence of Dalit literature in Marathi. India's social cultural scene is the result of hegemonic Varna structure. Upper Varnas like Brahman, Kshatriya and Vaishya have been enjoying every pleasure and privilege at the cost of others (shudra atishudras) misery. The supremacy and domination of Brahman and allied Varnas has been sanctioned by religion. Therefore the possibilities of counter discourse seemed to be feeble, and if any, remained unnoticed. By quoting the religious provisions, made in their own interests, Brahmins and allied castes have been exploiting the shudratishudra masses. The acceptance of upper caste domination, because it has been sanctioned by the religion, has been a very tragic truth of Indian cultural system. This psyche of shudratishudra people can be understood in the light of Gramscian concept of 'hegemony'. Antonio Gramsci very pertinently states that lower classes, on their own accord accept the domination, they give consent to the domination of upper classes is hegemony. Though Gramsci had propounded this argument in Italian context, it perfectly suits to Indian cultural scenario. Indian psyche is conditioned in such a way, that it can't even imagine to question and challenge the religious belief that privileges the upper castes and exploits the masses. This psychological conditioning is maintained through religious scriptures which have been declared as infallible so that ordinary

human beings must not even doubt of its eternity, authenticity, and sanctity. It is one of the crucial features of hegemony that it formulates some rites, rituals, festivals and customs etc. to exercise the dominating ideology. Shudratishudra always felt it necessary to observe these customs and traditions. It means, in a way slaves were made to enjoy slavery.

In this situation some voices emerged against this enslavement, oppression and exploitation. Jotirao Phule was one of the very potential and radical voices in modern India. He categorically challenged the upper caste hegemony and initiated the virtual war against upper castes. He realized the power of alphabets, and started to disseminate it among the ignorant shudratishudra brethren. Due to Phule's radical movement, the lowered masses started to articulate their grief, agony and torment in their own undisciplined and unsophisticated voices. Mukta Salve, one of the Mang girl students, wrote an essay about the misery of shudratishudra people. This may be taken as the inception of Dalit articulation. But Dalit literature in its true sense was the result of Dr. Babasaheb Ambedkar's socio-cultural and political movement for equality, fraternity and emancipation of lowered masses. Dr. Ambedkar emerged as the greatest leader and ideologue of masses. He brought a very rational critique of the upper caste supremacy and waged a great battle against it. Inspired by the egalitarian ideology of Buddha, Kabir and M. Phule, Dr. Ambedkar initiated a fierce struggle for the identity and equal rights of the masses in

socio-cultural, economic and political domains. He himself was a great economist, sociologist, anthropologist, historian and political leader. Dalit literary scholars, with true pride, declared Dr. Ambedkar as the central force behind their literary production.

Around 1960, Dalit literature, with its necessary radical features, emerged on the horizon of Marathi literature and made the whole literary scenario up side down. In recent time, torrential writings of Dalit writers like Baburao Bagul, Namdeo Dhasal, Daya Pawar, P.I. Sonkamble, Laxman Mane, Laxman Gaikwad, Baby Kamble, Sharankumar Limbale, J. V. Pawar, Waman Nimbalkar, Bapusaheb Jagtap, Narayan Surve, Gangadhar Pantavne, Arjun Dangle, Hira Bansode, Jyoti Lanjevar, Uttam Kamble, Pralhad Chendvankar, Keshav Meshram, Kumud Pavde, Madhav Kondvilkar, Urmila Pawar, and many more, are now dominating the Indian literary scene. In fact, Dalit literature has redefined the concept of creative writing and posed a great challenge to the prevalent hegemonic literary tradition. Dalit writers have been using 'word as weapon' in the battle against dominating system to emancipate the masses from the cultural colonization perpetuated by upper castes.

दलित साहित्याच्या योगदानाबद्दल खूप लिहिता येईल. तथापि संक्षेपाने आम्ही आमचे मत वरीलप्रमाणे नोंदविले आहे.

## ५६. महानुभाव पंथाचे साहित्य :

महानुभाव पंथाचा विस्तार महाराष्ट्र, गुजरात, मध्यभारत, पंजाब, अफगाणिस्तान, काश्मीर इथपर्यंत होता, आहे. मराठी ही या पंथाची धर्म भाषा होय. या पंथाची कृष्ण मंदिरे कश्मीर, काबूल येथे असून अनुयायी गजनी, कंदहार पर्यंत पसरलेले आहेत. या पंथाच्या निमित्ताने मराठीचा प्रसार १३ व्या शतकापासून या विस्तीर्ण प्रदेशात झालेला आहे. विदर्भाला लागून असलेल्या तेलंगणातील आरे(आर्य) मराठा समाज मोठया प्रमाणात महानुभावपंथी आहे. हे लोक ९ व्या शतकात तिकडे गेले. त्यांच्या भाषेचे नमुने उपलब्ध आहेत. (तेलंगणातील आरे मराठा समाज, श्री. रं. कुलकर्णी) ते घरात आजही याच भाषेत व्यवहार करतात. लीळाचरित्र हा या पंथाचा सर्वात महत्त्वाचा गद्य ग्रंथ आहे. तो शके ११९५ चा आहे. भास्कर कवीचा ओवीबद्ध 'शिशुपाल वध' (शके ११९५) श्रीमद्भागवत एकादशस्कंध, शके ११९६, तसेच त्याचे गद्य श्रीकृष्ण चरित्र, भावे देवव्यास यांचा गद्य पुजावसर, केशवव्यास व गोपाल पंडित यांचे सिद्धांत सूत्रपाठ (गद्य) केशवव्यास यांचा ओवीबद्ध मुर्तिप्रकाश, शके १२०६, दामोदर पंडितांचे ओवीबद्ध वत्सहरण, शके १२००, नरेंद्र कवींचे रुक्मिणी स्वयंवर, शके १२००, हे या पंथातील महत्त्वाचे ग्रंथ आहेत. या पंथास गुजराथीत अच्युत पंथ तर पंजाबात जयकृष्णी पंथ म्हणतात. काबूल येथील अमिर दोस्त महंमद यांचा प्रधान चरणदास आणि कश्मीरचा राजा गुलाब सिंह यांचा सेनापती सरदार सुजयराज जगन सुबाला हे महानुभवीय उपदेशित होते. ते मराठी ही आपली धार्मिक भाषा मानत. काही दुर्मिळ महानुभवी ग्रंथ पेशावर येथे आहेत. काबूल येथील कृष्ण मंदिराचा पहिला महंत नागेंद्र मुनी विजापूरकर नावाचा होता. त्यांचे मराठी ग्रंथ तेथे आहेत. या

पंथाचे साहित्य सकळ लिपी, सुंदरी लिपी व इतर पुष्कळ सांकेतिक लिप्यात आहेत.

## ५७. <u>जागतिक दर्जाचे श्रेष्ठ ग्रंथ :</u>

चक्रधर, नागदेवाचार्य, म्हाइंभट यांचा काळ (बारावे, तेरावे शतक) आणि नामदेव, ज्ञानेश्वर यांचा काळ यात फार अंतर नाही. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या ग्रंथाना मराठी जागतिक दर्जाचे श्रेष्ठ ग्रंथ नक्कीच म्हणता येईल. ज्ञानेश्वरीतील पसायदान हे एका अर्थाने श्रेष्ठ असे विश्वगीत किंवा मानवधर्मगीतच आहे. देशाची राष्ट्रगीते असतात पण ज्ञानेश्वरांनी मराठीत विश्वगीत लिहिले आहे आणि ते देशी (मराठी) भाषेवर प्रेम करून लिहिले आहे. अमृतानुभव हा वाङ्मयदृष्टया अधिक सकस असा शिव आणि शक्ती यांच्यातल्या क्रीडेचा शोध घेणारा आणि अन्वय लावणारा श्रेष्ठ ग्रंथ आहे. नामदेवांनी ज्ञानेश्वरास गुरुस्थानी मानले. त्यांनी श्रेष्ठ दर्जाची अभंग रचना केली. ज्ञानेश्वरांनी आळंदी येथे अल्पवयात संजीवन समाधी घेतली. तिचे नामदेवांनी केलेले वर्णन हे श्रेष्ठ प्रतीचे काव्य आहे. नामदेवांनी समकालीन संतांच्या प्रभावळीला भारतदर्शन घडवले. देशभर यात्रा/भ्रमणे केली. हिंदी, पंजाबी भाषेत लिहिले. गुरुग्रंथसाहेबमध्ये नामदेवांच्या रचनांचा समावेश आहे.

आपण संत एकनाथांचे वारसदार आहोत. ते म्हणाले होते, "संस्कृत भाषा देवे केली मग प्राकृत काय चोरांपासून झाली?" संत एकनाथ लिहीत होते, बोलत होते, ती भाषा कोणती होती? ती आजची मराठीच होती. तरीही ते तिला प्राकृत

म्हणत होते, कारण महाराष्ट्री प्राकृत हीच जुनी मराठी होय. संस्कृत व मराठी या दोन्ही भाषा बहिणी आहेत असेच एकनाथ यातून सुचवीत आहेत.

सुफी परंपरेने मराठी भाषेला मौलिक योगदान दिलेले आहे. मराठीत लिहिणाऱ्या मुस्लीम / सुफी परंपरेतून मध्ययुगात सुमारे ५५ कवींनी मराठीला समृद्ध करणारे महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच वीरशैवांचे योगदानही फार महत्त्वाचे आहे.

उद्योतनसूरीने इ. स. ७७८ मध्ये 'कुवलयमाला' हा ग्रंथ लिहिला. त्यात 'मरहट्ट' भाषेचा उल्लेख आहे. यातील वर्णन मराठी माणसाचेच आहे यात काय शंका? महाराष्ट्री प्राकृत म्हणजेच जुनी मराठी, अपभ्रंश मराठी म्हणजे मधल्या काळातील मराठी आणि चक्रधर-ज्ञानेश्वरांची मराठी ही प्रगल्भ आणि श्रीमंत अशी अर्वाचीन मराठी होय. मराठीचे हे तीन टप्पे आहेत. मात्र या सर्व प्रवासात मराठी भाषेचा गाभा आणि तिची चौकट कायम होती. आहे. मुळात या तीन वेगळ्या भाषा नाहीतच. ती एकच भाषा आहे.

## ५८. रामायण महाभारतात मराठी :

रामायण व महाभारत या प्राचीन ग्रंथांमध्ये शेकडो मराठी शब्द असल्याचे डॉ. अर्जुनवाडकर यांनी दाखवून दिले आहे. पैशाची भाषेतील गुणाढ्याने लिहिलेल्या बृहत्कथा या ग्रंथात तर अनेक प्रकरणेच मराठीत आहेत.

भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेच्या वतीने प्राकृत शब्दकोश तयार केला जात आहे. त्यात आजवर सात लाख शब्दांचे संकलन करण्यात आले आहे. हे सारे शब्द प्राकृत आहेत. या कोशाच्या प्रस्तावनेत जगप्रसिद्ध भाषातज्ञ डॉ. ए.

एम. घाटगे यांनी महाराष्ट्री प्राकृतातील अनेक ग्रंथ हे अभिजात साहित्य असल्याचे पुराव्यानिशी दाखवून दिले आहे. (A.M.Ghatage, (Editor), Pune १९९६, प्रस्तावना, पृ.१०) मराठीच्या आदिकाळातील गाथासप्तसतीसारखे अभिजात ग्रंथ मध्यकाळातील अनेक ग्रंथ आणि अर्वाचीन काळातील ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू, लीळाचरित्र, तुकारामगाथा यासारखे ग्रंथ अभिजात आहेत. यावरून मराठीच्या तिन्ही अवस्थांमध्ये या भाषेत अभिजात साहित्य लिहिले गेले आहे हेच सिद्ध होते.

# प्रकरण-७

## समारोप :

### ५९. मराठीचा प्रवास :

गाथासप्तशती या पहिल्या मराठी ग्रंथाकडे आपले अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. गाथा या शब्दावरून अनेकांना तो धार्मिक ग्रंथ वाटला. जशी नामदेवगाथा, तुकारामगाथा तर काहींना ते देवीमहात्म्य असावे असे वाटले. त्याची पहिली आवृत्ती १९५६ साली प्रसाद प्रकाशनाने काढली होती. प्रसाद प्रकाशन हे धार्मिक ग्रंथ प्रकाशित करत असे. त्यामुळेही हा गैरसमज झाला असू शकेल. ग्रंथाला संपादक स. आ. जोगळेकरांनी ४६३ पानांची मौलिक प्रस्तावना लिहिलेली आहे. ती एक श्रेष्ठ प्रतीची प्रस्तावना आहे. हालाच्या सप्तशतीतील काव्य हे लोकवाङ्मय आहे. सप्तशती म्हणजे सातशे आणि गाथा म्हणजे कविता. प्रत्यक्षात त्या १००८ कविता आहेत. अस्सल मराठमोळे नागरी, ग्रामीण व वन्य लोकजीवन या गाथेत ललितमधुर सौंदर्याने नटलेले आहे. श्रृंगाराबरोबरच जीवनाची करुण, दारुण व हृद्य अशी सर्व अंगे सारख्याच कुशलतेने गाथासप्तशतीत रेखाटलेली आहेत. मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारा हा आद्य मराठीतील श्रेष्ठ ग्रंथ होय.

शेतकऱ्याच्या दारिद्र्याचे यातील चित्रण डोळ्यांच्या कडा ओलावते. एका गरीब शेतकऱ्याला पेरणीसाठी बियाणे नसते, तर तो अंगातील जुने कपडे विकून बियाणे घेतो, असे एका कवितेत म्हटले आहे. गरीब शेतकऱ्याची वेदना कशी प्रकट होते, त्याचेही फार मार्मिक चित्रण यात आले आहे. धुऊन वाळत घातलेल्या

कपडयातून गळणारे पाणी म्हणजे जणू शेतकऱ्याचे दु:खाश्रू होत, असे एका कवितेत म्हटले आहे. कापूस, भात, हळद, तीळ यांच्या शेतांचे सुंदर चित्रण या कवितांमध्ये येते. गोदावरी नदी, पैठण, अजिंठा-वेरुळ यांच्या परिसराचे चित्रशैलीतील वर्णन या कवितांमध्ये वारंवार येते. चिखल, आंबा, तुर, पोट भरणे, गरीब असे असंख्य मराठी शब्द गेले २००० वर्षे प्रचलित असल्याचे या ग्रंथावरून स्पष्ट होते.

प्राचीन मराठीतील प्रवरसेनाचे सेतुकाव्य, गौडवध, राजशेखराची कर्पूरमंजिरी हे ग्रंथ फार महत्त्वाचे आहेत. भवभूतीच्या नंतर दोनशे वर्षांनी राजशेखर झाला. तो महेंद्रपाल राजाकडे आश्रयाला होता. तो स्वत:ला 'महाराष्ट्र चूडामणी' म्हणवून घेत असे.

महाकवी दण्डी आपल्या काव्यादर्शात (१.३४) म्हणतो 'महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदु:!' मराठी भाषेचे माहेरघर म्हणजे महाराष्ट्र होय. प्राकृत हा शब्द प्रकृती या शब्दापासून तयार झालेला आहे. म्हणजे मूळ कारण, मूळ धर्म, मूळ स्थिती, मूळ स्वभाव, मूळ स्वरूप असे रुद्रटाच्या (इ.स.८००ते८५०) काव्यालंकाराचा टीकाकार नमिसाधु सांगतो. (लेखनकाळ : इ.स. १०६८) प्राकृत म्हणजे संस्कृतीच्या संस्कारापासून व व्याकरणाच्या नियंत्रणापासून अलिप्त अशी सामान्य जनतेची स्वभावसिद्ध बोलीभाषा. प्रजेची भाषा.

**६०. विनयपीटक, दीपवंश, महावंश :**

डॉ. पां. वा. काणे यांच्या मते, इ.स. ३०० मध्ये महाराष्ट्र हे नाव पडले. संपूर्ण देशात सुमारे एक हजार प्राचीन लेणी आहेत. त्यातील ८०० महाराष्ट्रात आहेत.

त्यातील सगळे कोरीव लेख जुन्या मराठीत आहेत. सुमारे २२५० वर्षापूर्वीच्या 'विनयपीटक' या पाली भाषेतील बौद्ध धर्मग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख मिळतो. श्रीलंकेतील सिंहली लिपीतील व  भाषेतील 'दीपवंश' आणि 'महावंश' या १५०० वर्षांपूर्वीच्या ग्रंथातही महाराष्ट्राचा आणि महाराष्ट्री भाषेचा उल्लेख आलेला आहे. "रक्खित थेरं वनवासिं योनक धम्मरक्खित थेरं अपंरतकं महाधम्म रक्खित थेरं **महारट्ठ**" (ओल्डेनबर्ग, विनयपीटक, पृ. ३१४) असा हा उल्लेख आहे.

पतंजली, कौटिल्य, टॉलेमी, वराहमिहीर , चिनी प्रवासी ह्युएन त्संग, अल्बेरुनी यांचे लेखन आणि थोर संशोधक श्री. व्यं. केतकर, राजारामशास्त्री भागवत, रावसाहेब वि. ना. मंडलीक, महापंडित राहुल सांकृत्यायन, डॉ. रा. गो. भांडारकर, डॉ. वेबर, डॉ. ए. एम. घाटगे, नारायण विष्णू बापट, वि. का. राजवाडे, इरावती कर्वे, कृ. पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि.ल. भावे, शं.गो.तुळपुळे, रा. भि. जोशी आदींच्या संशोधनाच्या आधारे  एक सुसंगत आराखडा मांडायचा झाल्यास महारठ्ठी किंवा महाराष्ट्री म्हणजेच मराठी भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

## ६१. <u>मराठी साहित्याची थोरवी :</u>

मराठी साहित्याची थोरवी स्वयंसिद्ध आहे. अनेक मराठी साहित्यकृतींना राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत.  वि.स.खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर या तीन मराठी साहित्यिकांना भारतीय ज्ञानपीठाचे पुरस्कार

मिळालेले आहेत. शिवाजी सावंत यांना मूर्तीदेवी पुरस्कार मिळालेला आहे. भारतीय साहित्य अकादमीचे पुरस्कार अनेक मराठी लेखकांना मिळालेले आहेत.

चक्रधर, मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, सावता, चोखोबा, चोंभा, एकनाथ, तुकाराम, महात्मा फुले, न्या.रानडे, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, गो.ग.आगरकर, वि.का.राजवाडे, बाळ गंगाधर टिळक, हरी नारायण आपटे, राम गणेश गडकरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, दुर्गा भागवत, विभावरी शिरूरकर, इरावती कर्वे, लक्ष्मीबाई टिळक, गोडसे भटजी, त्र्यं.शं.शेजवलकर, न.र.फाटक, श्री.व्यं.केतकर, राजारामशास्त्री भागवत, विष्णूशास्त्री चिपळूणकर, आचार्य अत्रे, शिवाजी सावंत, रणजित देसाई, विनोबा भावे, साने गुरुजी, वि.दा.सावरकर, ग. दि.माडगूळकर, विश्राम बेडेकर, अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, देवीसिंग चव्हाण, ॲडव्होकेट प्र.रा.देशमुख, डिस्कळकर, पु.ग.सहस्त्रबुद्धे, नारायण सुर्वे, कुसुमाग्रज, वि.स.खांडेकर, विंदा करंदीकर, बाबुराव बागुल, जी.ए.कुलकर्णी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गं.बा. सरदार, नरहर कुरूंदकर, रा.चिं.ढेरे, विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, अरुण कोलटकर, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, नामदेव ढसाळ, आशा बगे, रावसाहेब कसबे, दया पवार, शरद पाटील, आ. ह. साळुंखे, अनिल अवचट आदींचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे आहे. ज्ञानेश्वर-तुकारामांच्या प्रभावळीतील शेकडो ग्रंथकार मराठीत आहेत. श्रेष्ठ साहित्याच्या निर्मितीची या भाषेला दीर्घ परंपरा आहे.

बखरीतील मराठी किंवा ज्ञानेश्वरीतील मराठी आजच्या मराठीहून फारशी भिन्न नाही. तसेच सप्तशतीतील मराठीचे आहे. २००० वर्षात भाषा जितकी बदलते तितका बदल तेथे दिसतो.

## ६२. <u>अभिजात भाषा :</u>

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि ख्यातनाम समीक्षक प्रा.रा.ग.जाधव यांनी मराठी विश्वकोशाच्या खंड-१ मध्ये अभिजाततावाद यावर अभ्यासपूर्ण टिप्पणी लिहिली आहे. (लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रमुख संपादक), मुंबई, १९७६ पृ.३२० ते ३२४) त्यात ते म्हणतात, "साहित्यातील पश्चिमी वाङ्मय क्षेत्रातील आदर्शानुकरण व संकेतपालन यावर भर देणारी महत्त्वाची विचारसरणी. प्राचीन ग्रीक व लॅटिन साहित्य त्यांनी प्रभावित झालेले उत्तरकालीन पश्चिमी साहित्य यांचा आधार या विचारसरणीत आहे. ही विचारसरणी व अभिजात ही विशेषणात्मक संज्ञा या दोहोंनाही एक इतिहास आहे. ग्रीक, लॅटिन साहित्याचा प्राचीन कालखंड (इ.स.पू.९०० ते इ.स.५००), युरोपातील प्रबोधनकाळ (१४०० ते १६००), नव-अभिजाततावादाचा कालखंड (१६०० ते १८००) व स्वच्छंदतावादाचा कालखंड (स्थूलमानाने १८०० नंतर) हे त्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे असून, त्यातून वाङ्मयीन अभिजाततावादाचे स्वरूप अधिकाधिक निश्चित होत गेले. यावरून या वादाला केवळ एक ऐतिहासिक विचारसरणी समजणे मात्र एकांगी ठरेल, याचे कारण प्राचीन ग्रीक-लॅटिन साहित्याच्या अनुकरणीय ठरलेल्या विशेषांचे तात्त्विक स्वरूप या वादात अंतर्भूत होते. अभिजाततावादास केवळ एक ऐतिहासिक विचारसरणी अथवा केवळ इतिहास निरपेक्ष तत्त्वप्रणाली मानले तर या वादाचे यथार्थ स्वरूप समजणार नाही. अभिजाततावादाने कला - वाङ्मय

विषयक विशिष्ट शैली, विशिष्ट दृष्टिकोन, विशिष्ट मनोवृत्ती, विशिष्ट प्रेरणा, विशिष्ट कालखंड व विशिष्ट वाङ्मयीन मूल्यकल्पना यापैकी एक, अनेक किंवा सर्वच गोष्टी सुचविल्या जातात. अशा गोष्टींचा संदर्भ कधी प्राचीन ग्रीक व लॅटीन कला-साहित्या पुरताच सीमित असतो, तर कधी त्यांना अनुसरणाऱ्या उत्तर कालीन कला साहित्याचाही त्यात समावेश केला जातो. अभिजात या विशेषणात्मक संज्ञेचा उपयोग ऑल्स जेलियस या लॅटिन लेखकाने इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात प्रथम केला. 'स्क्रिप्टर क्लॅसिकस' व 'स्क्रिप्टर प्रोलेटेरियस' असे लेखकांचे दोन वर्ग कल्पून, समाजातील उच्चवर्गीय लेखकांस त्याने अभिजात हे विशेषण लावले. पुढे मध्ययुगात (५०० ते १४५०) व युरोपीय प्रबोधन काळात अभ्यसनीय व अक्षय ठरविण्यात आलेल्या साहित्यकृतींना व साहित्यिकांना अभिजात मानण्यात आले. त्यानंतरच्या कालखंडात (१६०० ते १८००) सर्वच प्राचीन व ग्रीक व लॅटिन साहित्य अभिजात मानून, त्यांच्या आशय अभिव्यक्तिविषयक आदर्शांना अनुसरणाऱ्या तत्कालीन साहित्यास 'नव-अभिजात' ही संज्ञा देण्यात आली. स्वच्छंदतावादाच्या प्रभावकाळात 'जे जे प्राचीन ते ते अभिजात' या कल्पनेला विरोध करण्यात आला. व कोणत्याही काळातील श्रेष्ठ साहित्यकृतींना अभिजात असे संबोधण्यात आले."

(लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रमुख संपादक), मुंबई, १९७६ पृ.३२० ते ३२१)

श्री.जाधव पुढे म्हणतात, "अभिजाततावादाला अभिप्रेत असणारे आदर्शानुकरण व संकेतपालन हे विषय प्रथम लॅटिन साहित्यात (इ.स.पू.२४० ते इ.स.५००) दिसते. लॅटिन कालखंडात साहित्याचे क्षेत्र समाजातील तेव्हाच्या उच्च वर्गापुरते मर्यादित बनले व जिवंत भाषेपासून वाङ्मयीन भाषेची फारकत करण्यात

आली. "अभिजातवादी साहित्य म्हणजे समाजातील उच्चवर्गीयांचे साहित्य" ही कल्पना ग्रीक साहित्यापेक्षा लॅटिन साहित्यालाच अधिक लागू पडते. सर्वच प्राचीन साहित्याला "अभिजाततावादी" ही संज्ञा याच कालखंडात प्राप्त झाली. प्रदीर्घ काळाच्या कसोटीला उतरून अक्षय ठरलेले; शाश्वत, कलात्मक प्रमाणबद्धता व विश्वव्यापक प्रत्ययकारिता या गुणांनी संपन्न असलेले व माहिती, आदर्श व अनुकरणीय ठरणारे जे साहित्य, ते अभिजाततावादी होय हा प्रबोधन काळाच्या दृष्टीने अर्थ होता. अभिजाततावादी मनोवृत्ती प्रामुख्याने स्थितिशील असते तर स्वच्छंदतावादी मनोवृत्ती प्रामुख्याने गतिशील असते असे मानण्यात आले. अभिजाततावादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील : या वादात आदर्शानुकरणाचे तत्त्व आहे. हे तत्त्व श्रेष्ठ साहित्यकृतीच्या अनुकरणात व परंपरागत वाङ्मयीन संकेताच्या परिपालनात दिसून येते. वस्तुनिष्ठता ही या वादाचे महत्त्वाचे लक्षण आहे. हे लक्षण तर्कशुद्धता, विवेक प्रामाण्ये, कलात्मक उद्दिष्टांच्या प्रकट जाणीवेने नियमित केलेली रचना, कलात्मक प्रमाणबद्धता, भव्योदात्त आशय व शाश्वत सत्यांचे प्रतिपादन याबाबत आढळतात. सामाजिक विवेक हे या वादाचे वैशिष्ट्य आहे. त्याचे परीक्षण प्रचलित सामाजिक नीतिनियमांचे पालन सदभिरुची, प्रातिनिधिक स्वभावचित्रण, सामाजिक उद्बोधन, आशय व अभिव्यक्तीमधील सर्वांगीण औचित्यविचार इत्यादींमध्ये विशेषत: घडते."

(लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रमुख संपादक), मुंबई, १९७६ पृ.३२१ ते ३२२)

आता काळाच्या ओघात अभिजात या शब्दाला नवा अर्थ प्राप्त झाल्याचे संशोधन निग्रो विचारवंतानी पुढे आणले आहे. 'बर्मिंगहॅम कल्चरल स्टडी सेंटरने

केलेल्या संशोधनात आता या शब्दाला "कार्यकारणभाव मानणारे, विज्ञाननिष्ठ, परिवर्तनवादी आणि श्रेष्ठ प्रतीचे साहित्य असे अर्थ प्राप्त झाले आहेत.

मराठी ही फार श्रेष्ठ दर्जाची भाषा आहे. ती जात, वर्ग, लिंगभाव निर्मूलनाचे तत्त्वज्ञान कवेत घेऊन उभी आहे. धर्मचिकित्सा, संसाधनांचे फेरवाटप, आंतरजातीय विवाह, जातिनिर्मूलन आणि स्त्री-पुरुष समतेला प्रोत्साहन देणारे श्रेष्ठ लेखन या भाषेत झालेले आहे. ही भाषा प्रागतिक विचारांना बळ देणारी भाषा आहे.

### ६३. अकरा कोटी लोकांची मराठी :

अकरा कोटी लोकांची मराठी ही जगातील दहाव्या ते पंधराव्या क्रमांकाची भाषा आहे. संपन्न ज्ञानभाषा असणारी मराठी महानुभावांची धर्मभाषाही आहे. सातवाहन, राष्ट्रकूट आणि मराठी हे राज्यकर्ते भारतभर राज्य करत होते. आजच्या पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानावरही मराठी सत्तेची पताका फडकत होती. ही भाषा बोलणारे लोक आज जगातील सुमारे ७२ देशांत पसरलेले आहेत. ते भारतातील ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात महत्त्वाच्या पदावर काम करत आहेत. त्यामुळे ही फक्त एका प्रांताची भाषा नसून, ती महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे.

मराठीत दरवर्षी सुमारे दोन हजार पुस्तके प्रकाशित होतात, पाचशे दिवाळी अंक निघतात आणि छोटी-मोठी सुमारे दोनशे साहित्य संमेलने होतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला लाखो रसिक उपस्थिती लावतात. दरवर्षी साहित्य संमेलनस्थळी आणि मुंबईचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक

चैत्यभूमी व नागपूरची दीक्षाभूमी येथे कोट्यवधी रुपयांची पुस्तकविक्री होत असते. नामवंत खासगी प्रकाशन संस्था आणि सरकारी प्रकाशने यांची वैचारिक आणि ललित पुस्तकांची वार्षिक उलाढाल वीस ते पंचवीस कोटी रुपयांपर्यंत असून पाठ्यपुस्तके, धार्मिक ग्रंथ, पाककृती, व्यक्तिमत्व विकासविषयक तसेच ललित आणि वैचारिक ग्रंथ यांची एकत्रित बाजारपेठ सुमारे २५० कोटी रुपये आहे, असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे. देशातील एकूण ग्रंथालयांपैकी २५ टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत.

मराठी भाषेवर सामान्य माणसाचे उदंड प्रेम आहे. तिचे अस्तित्व आणि तिची समृद्धी हा महाराष्ट्रीय लोकांच्या आस्थेचा आणि अभिमानाचा भाग आहे.

नाणेघाटातील ब्राह्मी लिपीतील २२२० वर्षापूर्वीच्या शिलालेखातील महारठ्ठीनो हा उल्लेख, विनयपीटक, दीपवंश, महावंश या ग्रंथातील महाराष्ट्राचे उल्लेख, हालसातवाहनाच्या गाथासप्तशतीतील श्रेष्ठ दर्जाचे मराठी काव्य, रामायण, महाभारत आणि गुणाढ्याच्या बृहत्कथेत येणारे असंख्य मराठी शब्द, वररुचीचे प्राकृतप्रकाश, हेमचंद्राची देशीनाममाला, शाकुंतल मृच्छकटिकातील अनेक पात्रांच्या तोंडचे मराठी संवाद यावरून मराठीची प्राचीनता निर्विवादपणे सिद्ध होते.

पतंजली, कौटिल्य, टॉलेमी, वराहमिहिर, चिनी प्रवासी ह्युएन त्संग, अल्बेरुनी यांचे लेखन आणि थोर संशोधक श्री. व्यं. केतकर, राजारामशास्त्री भागवत, रावसाहेब वि. ना. मंडलीक, महापंडित राहुल सांकृत्यायन, डॉ. रा. गो. भांडारकर, डॉ. वेबर, डॉ. ए. एम. घाटगे, नारायण विष्णु बापट, वि. का. राजवाडे,

इरावती कर्वे, कृ. पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि.ल. भावे, शं.गो.तुळपुळे, रा. भि. जोशी आदींच्या संशोधनाच्या आधारे आधुनिक दृष्टीतून एक सुसंगत आराखडा मांडायचा झाल्यास महारठ्ठी किंवा महाराष्ट्री म्हणजेच मराठी भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. मराठी भाषा काळाच्या ओघात महारठ्ठी, मरहट्टी, महाराष्ट्री, अपभ्रंश, देशी, मराठी अशा वेगवेगळया नावांनी ओळखली गेलेली आहे. या वेगळया भाषा नसून ती एकाच भाषेची वेगवेगळी नावे होत.

ज्ञानेश्वर, तुकाराम ते भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ आदींचे श्रेष्ठ लेखन आणि राजारामशास्त्री भागवत, श्रीधर व्यंकटेश केतकर, शं.गो.तुळपुळे, ल.रा.पांगारकर यांनी मराठी भाषेच्या निर्मितीबाबत केलेले विवेचन पाहता सारांशाने असे म्हणता येते की प्राचीनता, मौलिकता, श्रेष्ठ साहित्याची परंपरा ,भौगोलिक विस्तार या सर्व अंगांनी विचार करता मराठी ही अभिजात भाषा आहे. तिचे अभिजातपण स्वयंसिद्ध आहे.

# -: ग्रंथसूची :-

## इंग्रजी ग्रंथ :


१) Ancient Civilization and Geography of Maharashtra (JBBRAS. No. २१).

२) Badhe, Raja & Mangrulkar, Arvind (१९८४), (Trnsltrs) Shefalika (Translation of Gatha Saptashati), Maharashtra Rajya Sahitya Sanskriti Mandal, Mumbai

३) Bhagwat, Durga (१९७१) [Ed], Rajaramshastri Bhagwat Marathyasambhandane Char Udgdaar, Vol. १,.Varada Prakashan, Pune

४) Bhagwat, Rajaram (१८८७)

५) Bhatt, S.C. and Bhargava, Gopal L (२००६) [Eds], People of Indian States and Union Territories, Vol. १६, Kalpaz Publications, Delhi

६) Bhave, H.A. (१९८०) [Trnsltr] Kathasaritsagar, Varada Prakashan,Pune

७) Bhave,V.L. (१९८२) (supplement by S.G.Tulpule) Maharashtra Saraswat, Khand १, Popular Prakashan, Mumbai

८) Bloch, Jules (१९१४) The Formation of Marathi Language, English Translation by Dr. Dev Raj Chanana [१९७०] Banarasi Das, Delhi The Formation Of The Marathi Language By J. Bloch

९) Burgess , Caves of Western India.

१०) Bhandarkar Oriential Research Institute, Pune, १९८९.

११) Beames Johon A Comparative Grammar of the modern Aryan Languages of India.

१२) Basak, Radhagovinda, (Edt and Trnslt), The Prakrit Gatha Saptasati The Asiatic Society, Kolkata, २०१०

१३) Dr.Bhandarkar R. G., Wilson :Philological Lectures.

१४) Dalal, Roshen (२००६) The Religions of India: A Concise Guide to Nine Major Faiths Penguin Books, New Delhi

१५) Date,Y.R. (१९६३), Maharashtra Bhashabhyas, (Maharashtra Shabdakosh Prastavana Sangrah),Maharashtra Kosh Mandal, Pune

१६) Desinamamala, Piscel, R. (१९३८), Of Hemachandra, Bhandarkar Oriental Research Institute, Pune

१७) Dhavalikar, M.K. (१९८०) Puratatvavidya, Maharashtra Rajya Sahitya Sanskriti Mandal, Mumbai

१८) Caldwell Rober, A Comparative Grammar of the Dravidian Languages, Rev.

१९) Dr.Chatterji S. K., The origin and Development of Bengali Language,

२०) Edward V. Arnold, Historical vedic Grammar, Prel.

२१) Enthoven R.E., Delhi, १९२२, The Tribes and Castes of Bombay, Volume १ to ४, Low price Publications, Delhi.

२२) Gathasaptasti, १९११, With a Commentary by Gangadhara, (Ed) by Durgaprasad and Pnasikar, २nd ed.Kavayamala Series, Bombay, Nirnaya Sagar Press. ---- १९३३ Edited With a Sanskrit commentary by Mathuranath Sastri, ३rd ed Bombay, Nirnaya Sagar Press.

२३) Ghatge, A.M.(Ed) (१९९६) A Comprehensive and Critical Dictionary of the Prakrit Languages with special reference to Jain Literature (Volume One), Bhandarkar, Oriental Research Institute, Pune

२४) Gaikwad Oriental Series (१९३८), No ८२, Suktimuktavali of Bhagdatta Jalhana, Ember Krishnamacharya (Ed), Baroda Oriental Institute

२५) Grierson, A.G. (१९०७) A Linguistic Survey of India, Vol. VII, Indo Aryan Family — Southern Group Specimens of the Marathi Language, Office of the Superintendent of Government Printing, Calcutta http://dsal.uchicago.edu/books/lsi/lsi.php?volume=७&pages=४२४#page/४/mode/१up (accessed on May १३, २०१३)

२६) Gune, P.D. (१९२२), Marathi Bhashecha Kalnirnay, Vividhdnyanvistar, Book ५३, Pune

२७) Hultzsch, Euger (१९०१), [Ed] Epigraphia Indica Vol. VI, (१९००-०१) Archaelogical Survey of India, New Delhi (Reprint १९८१)

२८) Hultzsch, Euger (१९०२-०३), [Ed] Epigraphia Indica Vol. VII,Archaelogical Survey of India, New Delhi (Reprint १९८१)

२९) Jamkhedkar, A.P. (२००९) Maharashtra: Itihas, Prachin Bhag, Khand १, Bhag १, Sthapatya, Darshanika Vibhag, Government of Maharashtra, Mumbai

३०) Joglekar, S.A. (Ed) (२०१२) Hala Satvahanachee Gatha Saptashati, Padmagandha Prakashan, Pune

३१) Joshee, S.B. (१९८०) Marathi Sanskriti: Kahi Samsya IInd Edn, (Ed. Dr. Vasant Joshi), Venus Prakashan, Pune

३२) Joshi, C. V. (००००) Vividh Dnyan Vistar ५९.१२)

३३) Joshi, R.B. (१९२३) Marathi Bhashechee Ghatana, (Second Edition), Madhav Ramchandra Joshi, Pune

३४) Karve (१९५३) Prasad, March १९५३, Pune

३५) Karve, Irawati (१९६२) Marathi Lokanchee Sanskriti, Deshmukh ani Company, Pune

३६) Ketkar, S.V. (१९३१) Prachin Maharashtra, Adiparva. Vijay, Pune [Venus Prakashan, Pune]

३७) Ketkar, S.V. (१९३५) Prachin Maharashtra, Karnataka, Mumbai

३८) Ketkar, S.V. (१९३५ ),Varada Prakashan, Pune

३९) Ketkar,S.V. (१९६३)

४०) Kochchad ,Harivansh (१९७१) Apbhransh Sahitya, Bharatiya Sahitya Mandir, Delhi

४१) Kolte, V.B. (१९५२) Shrichakradhar Charitra, Arun, Malkapur

४२) Kolte, V.B. (१९८७) Maharashtrateel Kahee Tamrapata va Shilalekh, Maharashtra Rajya Sahitya Sanskriti Mandal, Mumbai

४३) Kulkarni, K.P. (१९३३) Marathi Bhasha: Ugam ani Vikas, Modern Book Depot, Pune

४४) Karve Iravati, Maharashtra Land and its people, १९६८

४५) Language, Jesperson

४६) Mehrotra Arvind Krishna, Delhi, १९९९, The Absent Traveller, Prakrit Love Poetry from the Gathasaptasati of Satavahan Hala, (Selected and translated from the Prakrit), Penguin Books, Delhi.

४७) Maharashtra State Gazetteers History, १९६७ part-१, Govt. of Maharashtra.

४८) Mate, M.S. (००००) 'Marathi Raja Konas Mhanave?', Bharat Itihas Sanshodhan Mandal Traimasik, Vol ५४, Pune

४९) Mirashi, V.V. (१९४६). Yugwani, March //REFERENCE INCOMPLETE

५०) Mirashi, V.V. (१९५४). Sanshodhan Muktavalee (Sir Pahila), Madhya Pradesh Sanshodhan Mandal, Nagpur

५१) Mirashi, V.V. (१९७१) Satvahana ani Pashchimi Kshatraps yancha Itihas ani Koriv Lekh, Maharashtra Rajya Sahitya Sanskruti Mandal, Mumbai

५२) Mirashi V.V. (००००) 'zzzzz', Maharashtra Sahitya Patrika, Year ४३, (१६६), Pune

५३) Molesworth, J.T. (१८६३) A Compendium of Molesworth's Marathi and English Dictionary, Bombay Education Society's Press, Mumbai

५४) Parsons, Constance (१९३१) A Tour in the Mysore State (Melkote to Gersoppa), Oxford University Press, New York

५५) Pathan, U.M. (१९८९)[Ed] Marathwadyateel Marathi Shilalekh, Marathwada Vidyapeeth, Aurangabad

५६) Pawar, G.M, (१९९७) 'Medieval Marathi literature' in Medieval Indian Literature (Ed. K. Ayyappa Paniker, Vol ३, Sahitya Akademi, New Delhi

५७) Potdar, D.V. (१९५७) Marathi Gadyacha Ingrajee Avatar, Venus Prakashan, Pune

५८) Piscel R., Desinamamala of Hemachandra, Pune, १९३८,

५९) Patwardhan M.V., १९६९, Jayawallabha's Vajjalaggam, Edited with English translation and notes. Prakrit Text Series, Ahamedabad, Prakrit Text Society.

६०) Rajwade, Vishwanath Kashinath,

६१) Rice, B. L (१८९४) [Compiler] Epigraphia Carnatica, Vol ३. Mysore Government Central Press, Bangalore

६२) Rohman, Wakidur (२००५) Historical Development of Legal Literature on Customary Laws in Assam: A Critical Study, Kalpaz Publications, New Delhi

६३) Rajwade, V.K., (००००) REFERENCE INCOMPLETE

६४) Russell R.V., and Hira Lal, Delhi, १९१६, The Tribes and Castes of The Central Provinces of India, Low price Publications, Delhi

६५) Rice, B.L.(१९०९) Mysore and Coorg from the Inscriptions, Archibald Constable and Co, London, "नागर-कन्नड-तिगुळ-आरेवन ओडिसुव बालसिक्षे उपाध्यर जीवितक्के वर्ष १ क्के गदयाणं आरु") p-१७९.

६६) Singh K.S. (Ed), Mumbai, २००४, People of India, Maharashtra, Volume ३०, Part १ to ३, Popular Prakashan, Mumbai.

६७) Dr.Sarup, Nighantu and Nirukta of Yask,

६८) Tulpule S.G. and Anne Feldhaus, Mumbai, १९९९, A Dictionary of Old Marathi, Popular Prakashan, Mumbai.

६९) Sankalia, H.D. & Mate, M.S. (१९७६) Maharashtrateel Puratatva, Maharashtra Rajya Sahitya Sanskriti Mandal, Mumbai

७०) Smith, Vincent (१९०८) The Early History of India REFERENCE INCOMPLETE १९९९ edn (Third and enlarged, Atlantic Punlisher)

७१) Tulpule, S.G.(१९६३) Prachin Marathi Koreev Lekh, Pune Vidyapeeth, Pune

७२) Utgikar Narayan Bapuji; (Ed), Collected works of Sir R.G. Bhandarkar, Vol.IV, Bhandarkar Oriental Research Institute, Pune, १९२९, (Wilson Philological Lectures on Sanskrit And The Derived Languages, Delivered in १८७७)

७३) Utgikar Narayan Bapuji & Paranjpe Vasudeo Gopal; (Ed), Collected works of Sir R.G.Bhandarkar, Vol.I, Bhandarkar Oriental Research Institute, Pune, १९३३, (Comprising Miscellaneous Articles, Reviews, Addresses etc.)

७४) Utgikar Narayan Bapuji; (Ed), Collected works of Sir R.G.Bhandarkar, Vol.II, Bhandarkar Oriental Research Institute, Pune, १९२८, (Comprising Reports on Search for Sanskrit Mss. During १८८२-९१, Religious and Social Writings etc.)

७५) Utgikar Narayan Bapuji; (Ed), Collected works of Sir R.G.Bhandarkar, Vol.III, Bhandarkar Oriental Research Institute, Pune, १९२७, (Comprising Early History of The Deccan and Miscellaneous Historical Essays)

७६) Vangmayasuchi (००००)

७७) Varma Onkarprasad, The Yadavas and their Times

७८) Vaidya P.L., (Ed.), Poona, १९८०, Prakrit Grammar of Hemachandra, Bhandarkar Oriental Research Institute.

७९) Witzel M., Tracing the vedic dialects, Cambridge, Mass, Paris १९८९.

८०) Weber Albrecht, Leipzig, F.A.Brockhaus, (Ed), Das Saptacatakam des Hala. १८८१

८१) Dr.Wilson John, Preface to Moleswarth's Marathi into English Dictionary,

**हिंदी ग्रंथ :**

**१)** हरिवंश कोछड, फव्वारा-दिल्ली, १९७१, अपभ्रंश साहित्य, भारती साहित्य मंदिर.

**मराठी ग्रंथ :**

१) ओल्डेनबर्ग, विनयपीटक, पृ. ३१४

२) कुलकर्णी कृष्णाजी पांडुरंग, पुणे, १९५०, (प्र. आ. १९३३), मराठी भाषा उद्गम व विकास, मॉडर्न बुक डेपो.

३) कुलकर्णी श्री. रं. तेलंगणातील आरे मराठा समाज,

४) कर्वे इरावती, पुणे, १९६२, मराठी लोकांची संस्कृति, देशमुख आणि कंपनी.

५) केतकर श्रीधर व्यंकटेश, पुणे, १९३५/ १ जानेवारी, १९८९, प्राचीन महाराष्ट्र, (त्याचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास आणि तदर्थ जागतिक इतिहास विभाग एक व विभाग दोन आदिपर्व + शातवाहनपर्व) वरदा प्रकाशन, पुणे १६ (किंमत ५०० रु.)

६) केतकर श्रीधर व्यंकटेश, पुणे, १९६३, प्राचीन महाराष्ट्र, राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास शातवाहन पर्व विभाग दुसरा शातवाहनांच्या उदयापासून अंतापर्यंत) (संपादन व संकलन, नी.म.केळकर), व्हिनस प्रकाशन, पुणे भारत सरकारच्या साहित्य अकादमीने पुरस्कृत (किंमत २५० रु.)

७) केतकर डॉ.श्रीधर व्यंकटेश, संपादक, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग अठरावा, १९२६, महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लिमिटेड, पुणे

८) कोलते डॉ. वि. भि., मुंबई, १९८७, महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

९) कौशल्यायन भदंन आनंद (अनु.) नागपूर, २०००, महावंश, बुद्ध भूमी प्रकाशन.

१०) काळे, वऱ्हाडचा इतिहास.

११) काव्यादर्श, दण्डी

१२) खरे ग.ह.,दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, भा. १,२,३.
१३) घोडके ह. म., पुणे, २००५, महाराष्ट्र गाथा, भाग-२, राजहंस प्रकाशन.
१४) जोशी रा. भि., पुणे, १९२३, मराठी भाषेची घटना, माधव रामचंद्र जोशी.
१५) जोशी शं. बा., मऱ्हाटी संस्कृति (इ. स. १९५२)
१६) जोगळेकर स.आ., (संपा) पुणे, २०१२, हाल सातवाहनाची गाथा सप्तशती, पद्मगंधा प्रकाशन
१७) पाठक डॉ.अरुणचंद्र,(संपादक) मुंबई, २००९, महाराष्ट्र: इतिहास-प्राचीन भाग, खंड-१, भाग-२, स्थापत्य व कला, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन.
१८) ढवळीकर म. के., मुंबई, १९८०, पुरातत्त्वविद्या, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
१९) ढवळीकर म. के., पुणे, २०११, महाराष्ट्राची कुळकथा, राजहंस प्रकाशन.
२०) तुळपुळे शं. गो., पुणे, १९६३, प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ.
२१) तुळपुळे डॉ.शं.गो. (संपादक), ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील
२२) तुळपुळे शं. गो.,यादवकालीन मराठी भाषा, १९७३
२३) दाते य. रा., पुणे, १९६३, महाराष्ट्र भाषाभ्यास, (महाराष्ट्र शब्दकोश प्रस्तावना संग्रह), महाराष्ट्र कोश मंडळ
२४) दातार माधव, पुणे, २०१२, महाराष्ट्र: एका संकल्पनेचा मागोवा, राजहंस प्रकाशन
२५) दांडेकर वि.पां., महाराष्ट्र.
२६) देव शांताराम भालचंद्र, मुंबई, १९८४, महाराष्ट्र व गोवे शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
२७) देशपांडे ब्रम्हानंद, देवगिरीचे यादव, औरंगाबाद, शके १८९७
२८) नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०
२९) नेने, चक्रधर सिध्दांतसूत्रे

३०) पठाण डॉ.यू.म., (संपा.) औरंगाबाद, १९८९, मराठवाडयातील मराठी शिलालेख, मराठवाडा विद्यापीठ, (रु. १००)
३१) पागांरकर ल. रा., मराठी वाङ्.मयाचा इतिहास, खंड- १, पुणे, १९७२,
३२) पोतदार दत्तो वामन, पुणे, १९५७, मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, व्हीनस प्रकाशन.
३३) परांजपे वासुदेव गोपाळ, मराठी भाषेचा विकास, स्वत:, पुणे १९४१
३४) बढे राजा, अरविंद मंगरुळकर (अनु.), मुंबई, १९८४, शंफालिका, (गाथा सप्तशनीचा अनुवाद), म.रा.साहित्य संस्कृती मंडळ.
३५) भागवत दुर्गा (संपा.), पुणे १९७९, (प्र.आ. १८८७), राजारामशास्त्री भागवत खंड १, मऱ्हाठयांसंबंधाने चार उद्गार, वरदा प्रकाशन.
३६) भावे ह. अ. (भाषा.), पुणे, १९८०, कथासरित्सागर खंड १. वरदा प्रकाशन
३७) भावे वि. ल. (पुरवणी: शं. गो. तुळपुळे), मुंबई, १९८२, महाराष्ट्र सारस्वत, खंड-१, पॉप्युलर प्रकाशन.
३८) भांडारकर रा.गो., दख्खनचा इतिहास
३९) भगदत्त जल्हण, बडोदा, (?), सुक्तिमुक्तावली, गायकवाडस् ओरियंटल सेरीज, पृ. ४३
४०) भरताचे नाट्यशास्त्र
४१) मिराशी डॉ. वा. वि., नागपूर, १९५४, संशोधन मुक्तावली, (सर पहिला) मध्यप्रदेश संशोधन मंडळ.
४२) मिराशी डॉ. वा. वि., मुंबई, १९७९, सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
४३) माहुलकर दिनेश द., मुंबई, २०००, वृध्दि: भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन, राज्य मराठी विकास संस्था.
४४) मराठी भाषेचे व्याकरण, (वि.का.राजवाडे), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७९.
४५) मुंबई गॅझेटियर.

४६) राजवाडे वि.का., राधामाधवविलासचंपु, वरदा प्रकाशन, पुणे
४७) राजवाडे वि. का., ऐतिहासिक प्रस्तावना.
४८) राजवाडे-महाराष्ट्राचा वसाहतकाल (निबंध, इतिहास, ऐतिहासिक)
४९) रसेल व हिरालाल, कास्ट अॅन्ड ट्राइब्स ईन सेन्ट्रल प्रॉव्हीन्स.
५०) लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रमुख संपादक), मुंबई, १९७६, मराठी विश्वकोश,खंड-१, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
५१) वैद्य चिं. वि.,निबंध आणि भाषणे.
५२) वैद्य चिं. वि.-पां. दा. गुणे, मराठी भाषेचा कालनिर्णय (विविधज्ञान विस्तार, पुस्तक ५३ वे) पुणे, १९२२
५३) वैद्य, मध्य भारत.
५४) सांकलिया डॉ.हसमुख धीरजलाल, म. श्री. माटे, मुंबई, १९७६, महाराष्ट्रातील पुरातत्त्व, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
५५) सांकृत्यायन राहुल, नागपूर, २००६, विनयपीटक, चिपिटक प्रकाशन प्रतिष्ठान
५६) सहस्रबुद्धे पु.ग.,महाराष्ट्राची संस्कृती,पुणे, १९७९
५७) सरदेसाई गोविंद सखाराम, मराठी रियासत, खंड १ ते ८, मुंबई १९०२/२०१०, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. (संपादक, स.मा.गर्गे)
५८) हर्षे रा. ग., ज्ञानेश्वरी प्रस्तावना
५९) ह्युएन त्संगची प्रवासवर्णने.
६०) बृहत्संहिता.
६१) ज्ञानेश्वरी
६२) उद्योतनसुरी, कुवलयमाला

## नियतकालिके :

१) राजवाडे वि.का., शक ९०५ मधील शिलालेख
(विश्ववृत्त, वर्ष २, अंक १ जुलै १९०७)
२) राजवाडे वि.का., शक १०५१ मधील काही मराठी पदे ('विश्ववृत्त' वर्ष २, अंक १)
३) कर्वे इरावती, महाराष्ट्र एक अभ्यास

(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक  १७४ व १७५)

४) माटे म.श्री., मराठी राजा कोणास म्हणावे ?

(भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक ५४.१-२)

५) कुंभार आनंद ना., ‘सोडवी’ कार हेमाडी पंडित,

(मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक १९७५)

६) भागवत राजारामशास्त्री यांचे मराठ्यासंबंधी विविध ज्ञान विस्तारातील लेख.

७) युगवाणी, मार्च, १९४६

८) मराठीचे माहेर-विक्रम स्मृति, पृ. ४७९

***********